

संगीताच्या तालावर रंगले रॅम्प वॉक

P3 एस डब्लू एम कॉर्प - 'अ पॅन इंडिया कॉर्प' या कॉर्पोरेट बिझनेस ग्रुपच्या सहकार्याने राष्ट्र संचार आयोजित आणि राज मसाले प्रायोजित 'ती' चे हळदी-कुंकू

• पुणे, शनिवार, १ फेब्रुवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 66 • वर्ष ४ थे, अंक ६६ • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News

'सिंहगड इन्स्टिट्युटस' मध्ये ७६ वा प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा १२




# जगभरात मराठी माणसांचे अस्तित्व : ना फडणवीस

मराठी भाषा ही प्राचीन आहेच ,ती अभिजात देखील होतीच परंतु नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये याला अभिजात दर्जा प्राप्त झाला आणि याला राजमान्यता मिळाली. मुघलांनी पारसी भाषेचा प्रचार केला परंतु त्याही काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठीतून आज्ञापत्र जारी करून या भाषेला एक प्रकारे राजमान्यता देण्याचा प्रयत्न केला होता , जगभरात पोहोचलेल्या मराठी माणसाच अस्तित्व यामुळे अधिक उजळणार आहे , जगभरात मराठी माणसांचा अस्तित्व जाणवतंय हे देखील अभिमानाची बाब आहे , अशा भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यातील विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून बोलताना व्यक्त केल्या . #रा

## पुण्यात विश्व मराठी संमेलनाचे दिमाखदार उद्घाटन



पुणे **मराठी भाषेचे संवर्धन:** तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आ. बापू पठारे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, राजेश पांडे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, रंगनाथ पठारे, डॉ. राजा दीक्षित आदी उपस्थित होते. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित केले.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सध्या आर्टीफिशियलचा जमाना आहे. त्याचा सगळीकडे बोलबाला पाहायला मिळत आहे. तंत्रज्ञान घोड्यासारखे असते. त्याला घाबरून चालणार नाही आणि नाकारून सुद्धा चालणार नाही. तंत्रज्ञानावर ठाण मांडून बसायचे आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग प्रसार आणि प्रचारासाठी करून, मराठीला ज्ञान भाषेत परावर्तीत करण्याचा प्रयत्न करतोय,' असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले. दरम्यान, पुढच्या पाच वर्षात एक विश्व मराठी संमेलन परदेशात घेऊन मराठीचा डंक्का वाजविण्यात येईल असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार श्रीरंग बारणे, आ. बापू पठारे, भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, राजेश पांडे, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे, डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, रंगनाथ पठारे, डॉ. राजा दीक्षित आदी उपस्थित होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक यांना साहित्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

फडणवीस म्हणाले, "आज आपण एआयच्या युगात आहोत. वेबसाइटवर साहित्यिकांचे साहित्य उपलब्ध करून देण्याऐवजी स्मॉल लॅग्वेज मॉडेल तयार करावे. त्यात सर्व साहित्यिकांचे साहित्य टाकले पाहिजे. चॅट जीपीटीला प्रश्न विचारतो, तसा एक प्रश्न या मॉडेला विचारल्यास संबंधित सर्व माहिती » पान ७ वर



मराठी भाषेवर, मराठी साहित्यावर आणि मराठी संस्कृतीवर प्रेम करणारी, महाराष्ट्राच्या इतिहासाबद्दल स्वाभिमान बाळगणारी माणसे जगाच्या कानाकोपऱ्यातून या संमेलनासाठी आली. परदेशातूनही मराठी प्रेमी येथे आले आहेत. प्रत्येक जण आपापल्या परीने मराठी भाषेसाठी योगदान देत असतो." तसेच, दिल्लीतील मराठी शाळेला महाराष्ट्र सरकारकडून मदत केली जाईल

— **अजित पवार,** उपमुख्यंत्री



मराठी भाषेला अडीच वर्षांपूर्वी अभिजात दर्जा मिळाला, हा राज्यातील जनतेच्या अस्मितेचा विषय आहे. आपल्या भाषेत उत्तम साहित्य निर्माण होते, हे आपण दाखवून दिले आहे. आम्ही राजकीय कार्यकर्ते, तसेच भाषेचेही कार्यकर्ते आहोत. आम्ही मराठी भाषेसाठी जे जे काही करता येईल, ते आम्ही सरकारच्या माध्यमातून करू.

— **एकनाथ शिंदे,** उपमुख्यंत्री

### विश्व संमेलनाला मी पुन्हा येईन...'

• जगाच्या पाठीवर एकही असा देश नाही जिथे मराठी माणूस पोहचला नाही. आम्ही दावोसला गेलो, तिथे मराठी माणसे स्वागतासाठी आली होती. यावेळी लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी हे गाणे ऐकल्यावर आनंद झाला. मराठी माणूस इतक्या वर्षांपासून बाहेर असला तरीही माय मराठीपासून दुरावलेली नाही. त्यांच्या मनात मराठी असून पुढच्या पिढीपर्यंत भाषा पोहचविण्याचे काम करत आहेत. मी कुठेही गेलो तरी पुन्हा येईन, असे म्हटले जाते. अलिकडच्या काळात याला चांगल्या अर्थाने म्हटले जात आहे. शेवटी एखाद्या शब्द चिकटला, तर काळ आणि वेळेप्रमाणे त्याचे अर्थ बदलत जातात. जेव्हा जेव्हा विश्व संमेलन होईल त्यावेळी तुम्ही सर्वांनी पुन्हा येईल असे म्हणायला हवे,' असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# विकसित भारत हेच आमचे ध्येय!

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू : अर्थसंकल्पीय अधिवेशन अभिभाषण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या गोंधळात शुक्रवारी संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले. यादरम्यान, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीला संबोधित केले. खासदारांना संबोधित करताना त्यांनी देशाला विकसित भारताचा संदेश दिला. यासोबतच त्यांनी प्रयागराज महाकुंभात झालेल्या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. राष्ट्रपतींनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनाही श्रद्धांजली वाहिली.

राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या भाषणात म्हटले की, संसदेच्या या बैठकीला संबोधित करताना मला खूप आनंद होत आहे. दोन महिन्यांपूर्वीच, आपण संविधान स्वीकारल्याचा ७५ वा वर्धापन दिन साजरा केला आणि काही दिवसांपूर्वीच, भारतीय प्रजासत्ताकाने ७५ वर्षांचा प्रवास पूर्ण केला. हा प्रसंग लोकशाहीची जननी म्हणून भारताच्या वैभवाला नवीन उंची देईल. आज, माझे सरकार अभूतपूर्व कामगिरीद्वारे » पान ७ वर

**आज बजेट**

### नवीन रोजगार संधी निर्माण करण्यावर लक्ष

• तरुणांच्या शिक्षणावर आणि त्यांच्यासाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. उच्च शिक्षणासाठी गुणवंत विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यासाठी पंतप्रधान विद्या लक्ष्मी योजना सुरू करण्यात आली आहे. एक कोटी तरुणांना टॉप ५०० कंपन्यांमध्ये इंटर्नशिपच्या संधीही दिल्या जातील. ते म्हणाले की, माझे सरकार महिलांच्या नेतृत्वाखाली म्हणजेच महिलांच्या नेतृत्वाखालील विकासावर देशाला सक्षम बनवण्यावर विश्वास ठेवते. नारी शक्ती वंदन कायद्याद्वारे लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना आरक्षण देणे हे या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत ९१ लाखांहून अधिक बचत गटांना सक्षम केले जात आहे.



मी संपत्ती आणि समृद्धीची देवता माँ लक्ष्मीला नमन करतो. आई लक्ष्मी आम्हाला समृद्धी आणि कल्याण देते. देशातील प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीयांवर माँ लक्ष्मीची विशेष कृपा राहो, माझ्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिला पूर्ण अर्थसंकल्प आहे. मी आत्मविश्वासाने सांगू शकतो की २०४७ मध्ये जेव्हा भारत स्वातंत्र्याची १०० वर्षे पूर्ण करेल, तेव्हा भारत विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण करेल आणि हा अर्थसंकल्प राष्ट्राला नवीन ऊर्जा आणि आशा देईल.

— **नरेंद्र मोदी,** पंतप्रधान

## जीबीएसमुळे दगावला पहिला रुग्ण!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पुण्यानंतर आता पिंपरी-चिंचवडमध्ये एका ३६ वर्षीय तरुणाचा जीबीएस आजारामुळे मृत्यू झाला आहे. मृत तरुण हा पिंपळे गुरव रहिवासी आहे. पुणे जिल्ह्यात जीबीएसने थैमान घातले आहे. जीबीएसमुळे पुण्यात एकाचा मृत्यू झाला होता. त्यानंतर आत्ता पिंपरी चिंचवडमध्ये देखील जीबीएसने एका ३६ वर्षीय तरुणाचा बळी घेतला आहे. हा तरुण पिंपळे गुरवचा रहिवाशी असून तो २१ जानेवारीला पालिकेच्या वायसीएम रुग्णालयात दाखल झाला होता. दवाखान्यात दाखल झाल्यापासून तो व्हेंटिलेटरवर होता. त्याला वाचवण्यासाठी डॉक्टरांनी प्रयत्नांची परकष्टा केली. मात्र, त्याचा मृत्यू झाला. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रात गुलेन बार्रे सिंड्रोमच्या रुग्णांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. » पान ७ वर

# भगवानगड धनंजय मुंडेंच्या पाठिशी -डॉ.नामदेव शास्त्री

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**परळी :** आम्ही धनंजय मुंडे यांच्या भक्कमपणे पाठिशी आहोत. तसेच बीडच्या घटनेत जे गुन्हेगार आहे त्यांचा शोध सुरु आहे", असल्याचे मत नामदेव महाराज शास्त्री यांनी सांगितले आहे.

मला माध्यमांना असे विचारावसे वाटते की ज्या लोकांनी मस्साजोगचे प्रकरण केले. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या केली. त्यांची मानसिकता का बिघडली हे माध्यमांनी का दाखवले नाही? कारण आधी जी मारहाण केली ती देखील दखल घेण्यासारखी आहे. त्यांच्या गावाचा मुद्दा आहे. मात्र, त्याला राजकीय हवा देऊन सामाजिक सलोखा बिघडवण्याचा हा प्रयत्न आहे. आज ज्यांच्यावर आक्षेप घेतला जात आहे



ते नेते खंडणीवर जगणारे नाहीत. गेले जवळपास ५३ दिवस झाले आहेत मीडिया ट्रायल चालवले जात आहेत. धनंजय मुंडे हे खंडणीवर जगणारा माणूस नाही. मात्र, त्यांना तशा पद्धतीचं ठरवण्याचा प्रयत्न सुरु आहे. त्यांची पार्श्वभूमी तशी नाही", असंही नामदेव महाराज शास्त्री यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे भेटीला आले होते. त्यांच्याबरोबर आमची दोन तास सविस्तर चर्चा झाली. राजकीय, सामाजिक विषयांवर चर्चा झाली. मी त्यांच्या मानसिकतेचा आढावा घेतला. सर्व समजून घेतल्यानंतर मला असं जाणवलं की जो मुलगा राजकीय घराण्यामध्ये जन्माला आलेला आहे. तसेच पक्षाचे सर्व नेते त्यांचे बालमित्र आहेत. मग असं असताना आणि त्यांची गुन्हेगारी पार्श्वभूमी नसताना त्यांना गुन्हेगार का ठरवले जाते? कारण ते एवढ्या वर्षांपासून आमच्या जवळ आहेत.

तसेच ते गोपीनाथ मुंडे यांचे पुतणे आहेत. तरीही त्यांना गुन्हेगार का ठरवत आहेत? जाणीवपूर्वक गुन्हेगार ठरवण्यात येत आहे असंही मला वाटतंय. यात आमच्या साप्रदायाचं मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. जातीयवाद नष्ट होत असताना काही राजकीय स्वार्थी लोकांनी जातीवाद पुन्हा उफाळून आणला आहे", असे महंत डॉ.नामदेव महाराज शास्त्री यांनी म्हटले आहे.

## पोषण आहारात मसाले भात, व्हेज, अंडा पुलाव

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** शालेय विद्यार्थ्यांना आता माध्यान्ह भोजनात व्हेजिटेबल पुलाव, मसाले भात, मटार पुलाव, अंडा पुलाव सोबतच गोड खिचडी, नाचणीचे सत्त्व मिळणार आहे. यापूर्वी दिल्या जाणाऱ्या पोषण आहारासंदर्भात तक्रारी आल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने आहार पद्धतीत सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात १२ प्रकारच्या पाककृतींचा समावेश करण्यात आला आहे.
केंद्रपुरस्कृत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत राज्यातील पात्र शाळांमधील इयत्ता 1 ली ते 8 वीच्या विद्यार्थ्यांना पोषण आहाराचा लाभ देण्यात येतो. या योजनेंतर्गत 1 ली ते 5 वीच्या प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 450 उष्मांक आणि 12 ग्रॅम प्रथिनेयुक्त, » पान ७ वर



छगन भुजबळांची स्पष्टोक्ती

# तोंडाला कुलूप लावण्याचा प्रकार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यपाल हे अतिशय मानाचे पद आहे. त्या पदाचा मी मान राखतो परंतु माझा स्वभाव हा अन्यायाविरोधात बोलण्याचा आणि संघर्ष करण्याचा आहे राज्यपाल होऊन मी सर्वसामान्यांसाठी बोलू शकत नाही, मला राज्यपाल करणे म्हणजे एक प्रकारे छगन भुजबळांच्या तोंडाला कुलूप लावण्याचा प्रकार आहे. त्यामुळेच मी राज्यपाल पद स्वीकारू शकत नाही असे छगन भुजबळ यांनी एका कार्यक्रमात स्पष्ट केले.

सन २०१४ मध्ये शरद पवार यांनी भाजपला बाहेरून पाठिंबा दिला. त्यानंतरही अनेक वर्ष भाजपाला पाठिंबा देण्यासंदर्भात तळ्यात मळ्यात भूमिका होती. अखेर मी अजित पवारांसोबत राहण्याचा निर्णय घेतला. आम्ही सध्या राष्ट्रवादी पक्ष म्हणून राजकीय दृष्ट्या भाजपसोबत आहोत. आम्ही भाजपसोबत लग्न केलेले नसल्याचे त्यांनी सांगितले.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांमुळे मी सर्वसामान्य भाजी विक्रेत्याचा राज्याचा उपमुख्यमंत्री होऊ शकलो. त्यानंतर मंडल आयोगाला पाठिंबा देण्याच्या भूमिकेसंदर्भात त्यांच्याशी वैचारिक मतभेद झाल्यामुळे शिवसेनेतून बाहेर पडलो. मी जर शिवसेनेतून बाहेर पडलो नसतो, तर त्याचवेळी राज्याचा मुख्यमंत्री झालो असतो. तसेच काँग्रेसमध्ये राहून काम केले असते आणि शरद पवार यांच्यासोबत जाऊन राष्ट्रवादी पक्ष स्थापन केला नसता, तर त्यावेळी सुद्धा मुख्यमंत्री होण्याची मला संधी होती. परंतु ओबीसींच्या लढ्यासाठी मुख्यमंत्री होण्याच्या दोन संधी सोडून दिल्या. माझ्यासाठी पद महत्त्वाचे नाही तर ओबीसींचे प्रश्न महत्त्वाचे आहेत, त्यासाठी मी आजही पद नसताना लढत राहणार आहे.

ते पुढे म्हणाले, तेलगी प्रकरणाशी काहीही संबंध नसताना शरद पवार यांनी माझा गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा घेतला, परंतु त्यानंतर झालेल्या चौकशीमध्ये माझ्यावर कोणतेही आरोप झालेले नाहीत व ते सिद्धही झाले नाही त्यामुळे एक प्रकारे शरद पवार यांनी माझा राजीनामा घेण्याची घाई केली.

राष्ट्रवादीच्या स्थापनेपासून असणारा मी ज्येष्ठ नेता आहे, तरीही अजित पवार यांच्यासोबत गेल्यानंतर आज मला आज मंत्रिपद का मिळाले नाही ? याची खंत वाटते. मला मिळणारे पद महत्त्वाचे नाही, परंतु मानसन्मान जर मिळाला नाही तर माणूस दुःखी होतो, अशी खंतही छगन भुजबळ यांनी यावेळी व्यक्त केले.

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनामध्ये मी ओबीसींच्या बाजूने भूमिका घेतल्यामुळे मराठा समाजाच्या मनामध्ये माझ्याबद्दल जी भावना निर्माण » पान ७ वर

## सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**VIP दर्शन**

**नवी दिल्ली :** देशातील मंदिरांतील व्हीआयपी प्रवेश पद्धतीला आव्हान देणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळून लावली. तसेच याबाबत कोणतेही निर्देश देण्यासही न्यायालयाने नकार दिला. जरी ते याचिकेत नमूद केलेल्या मुद्द्याशी सहमत असले तरी, या प्रकरणी न्यायालय कोणताही निर्णय देऊ शकत नाही अथवा कोणतेही निर्देश देऊ शकत नाही, असे सरन्यायाधीश (CJI) संजीव खन्ना यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने स्पष्ट केले. पण मंदिरांमध्ये अशी 'विशेष सुविधा' मनमानी स्वरुपाची असल्याचे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे.

# सचिन तेंडुलकरला 'सीके नायडू जीवनगौरव' पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** क्रिकेटचा देव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सचिन तेंडुलकरला बीसीसीआयकडून सन्मानित केले जाणार आहे. मंडळातर्फे मास्टर-ब्लास्टरला सीके नायडू जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार मिळवणारा सचिन हा ३१ वा क्रिकेटपटू ठरणार आहे. शनिवारी मुंबईत होणाऱ्या मंडळाच्या वार्षिक समारंभात सचिनला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

बोर्डाच्या एका अधिकाऱ्याने पीटीआयला याबाबत माहिती दिली. भारतासाठी 664 आंतरराष्ट्रीय सामने खेळलेल्या 51 वर्षीय सचिनच्या नावावर क्रिकेटच्या इतिहासात सर्वाधिक कसोटी आणि एकदिवसीय धावा करण्याचा विक्रम आहे. त्याने



सर्वाधिक 200 कसोटी आणि 463 एकदिवसीय सामने खेळले आहेत. यात त्याने अनुक्रमे 15,921 आणि 18,426 धावा कुटल्या आहेत.

सचिनने आपल्या शानदार कारकिर्दीत फक्त एकच टी-20 आंतरराष्ट्रीय सामना खेळला आहे. आपल्या काळातील महान फलंदाज मानला जाणारा तेंडुलकर प्रत्येक परिस्थितीत सहज धावा काढण्यासाठी ओळखला जात असे. त्याने वयाच्या 16 व्या वर्षी 1989 मध्ये पाकिस्तानविरुद्ध कसोटी पदार्पण केले आणि पुढील 24 वर्षांत त्याने जगभरातील गोलंदाजांविरुद्ध धावा केल्या. कसोटी आणि एकदिवसीय मिळून 100 शतके करण्याचा विक्रमही त्याच्या नावावर आहे.

# यंदा १०८ लाख क्विंटल साखरेचे कमी उत्पादन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बदलत्या हवामानाचा फटका ऊसक्षेत्राला बसला असून, यावर्षीच्या गाळप हंगामावर त्याचा परिणाम झाला आहे.राज्यामध्ये गाळप हंगाम मध्यावर आला आहे. गतवर्षीच्या गाळपाच्या तुलनेत यावर्षी जवळपास ८३ लाख टन उसाचे गाळप कमी झाले आहे. तर आत्तापर्यंतच्या हंगामात गतवर्षीच्या तुलनेत जवळपास १०८ लाख क्विंटल साखरेचे कमी उत्पादन झाले आहे.

**» उत्पादनात घट**

राज्यात आत्तापर्यंत ९८ सहकारी आणि ९८ खासगी अशा १९६ कारखान्यांच्या माध्यमातून गाळप हंगाम सुरू आहे, गतवर्षी ही संख्या २०६ होती.



म्हणजेच यावर्षी दहा कारखाने सुरूच झालेले नाहीत. त्यामध्ये चार सहकारी आणि सहा खासगी कारखान्यांचा समावेश आहे.

आत्तापर्यंत ५७३ लाख ९४ हजार टन उसाचे गाळप पूर्ण झाले असून, त्यातून ५१५ लाख ५७ हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले आहे. तर गतवर्षी यादरम्यान ६५६ लाख ९४ मेट्रीक टन गाळप पूर्ण होऊन ६२३ लाख ६८ » पान ७ वर

# मेट्रो आणखी सुसाट; २७६ कि.मी. लांबीचा नवा प्रस्ताव

**रस्त्यांवर होणारी गर्दी कमी करण्यासाठी पुण्यातल्या वाहतूक खोळंब्यावर उपाय म्हणून आता पुणेकरांसाठी तब्बल २७६ किलोमीटर लांबीचे नवे मेट्रो मार्ग प्रस्तावित करण्यात आले आहेत. यामध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड आणि आसपासच्या ठिकाणांना जोडणाऱ्या मेट्रो मार्गिकांचा समावेश आहे.**
**पुणे शहरासह जिल्ह्यातील वाहतूक व्यवस्थेवर दीर्घकालीन उपाययोजना करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पुढच्या ३० वर्षांसाठीचा आराखडा सादर करण्यात आला.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** नुकताच झालेल्या बैठकीत सादर झालेल्या या सर्वंकष योजनांचा एकूण खर्च तब्बल १ लाख २६ हजार ४८९ कोटींच्या घरात जाईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पुढील तीस वर्षांत हा खर्च तीन टप्प्यांमध्ये केला जाणार असून त्यानुसार योजना राबवल्या जातील .या नियोजनामध्ये पुण्यातील एकूण २० हजार ५५० चौरस मीटरचा परिसर मेट्रोच्या नव्या मार्गिकांनी जोडला जाणार आहे. २७६ किलोमीटर लांबीच्या या नव्या मार्गिका असतील. त्याशिवाय, पुढच्या तीन दशकांमध्ये पुण्यात एकूण सहा नवे बीआरटी कॉरिडॉर तयार करण्यात येणार आहेत.
दहा माहिकांमध्ये प्रत्यक्ष पुणे शहरातच फिरणाऱ्या मार्गिकांसोबतच पुण्यातील मेट्रो स्थानकांना पुणे शहराबाहेरील ठिकाणांशी जोडणाऱ्या मार्गिकांचाही समावेश आहे. या सर्व मार्गिकांची मिळून लांबी २७६ किलोमीटर आहे. यातील वनाज ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली मेट्रो मार्गिकांचा प्रस्ताव मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवण्यात आला आहे.
मेट्रोप्रमाणेच शहरांतर्गत वाहतूक व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी पीएमपीएमएलसाठी नव्या बसेसचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. सध्या पीएमपीएमएल फक्त १० टक्के प्रवाशांना वाहतुकीची व्यवस्था पुरवते. हे प्रमाण ६० टक्क्यांपर्यंत नेण्याचं प्रशासनाचं नियोजन आहे. त्यासाठी पीएमपीएमएलसाठी ६ हजार नव्या बसेसची आवश्यकता असेल.

त्यात १६२५ इलेक्ट्रिक बसेसचाही समावेश आहे. त्यामुळे पुढील ३० वर्षांत म्हणजेच २०५४ पर्यंत पुण्यातील बसेसची संख्या ११ हजार ५६४ पर्यंत पोहोचेल. याशिवाय, या प्रस्तावात नवे ६४१ बस मार्ग, १८ अतिरिक्त करिडॉर आणि २० नव्या बस स्थानकांचा समावेश आहे. यासह पीएमआरडीएकडून » पान ७ वर #रा

### नव्या प्रस्तावित मेट्रो मार्गिका

- १. वनात ते चांदणी चौक
- २. रामवाडी ते वाघोली
- ३. जि.न्यायालय ते येवलेवाडी
- ४. विद्यापीठ चौक ते देहू रोड
- ५. खराडी ते खडकवासला
- ६. निगडी ते चाकण
- ७. हडपसर ते सासवड रोड
- ८. हडपसर ते लोणी काळभोर
- ९. जिल्हा न्यायालय ते आळंदी
- १०. वाकड चौक ते शेवलेवाडी



महा मेट्रो PUNE METRO

# शहरात दिवसाला सुमारे २ कोटींची फसवणूक

## सावधान...! पोलिस उपनिरीक्षक संदीप कदम यांचे नागरिकांना आवाहन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुण्यात ऑनलाईन फसवणूक होत असल्याची प्रकरणं दिवसेंदिवस वाढत चालली आहेत. ओटीपीची मागणी करुन, बँक डिटेल्स मागून खात्यातले सर्व पैसे गायब करण्याचं काम या लुटारु टोळ्या करत असतात. नागरिकांची फसवणुक करण्यासाठी नवनवीन प्रकार, युक्त्या आखल्या जातात. महाराष्ट्रातील पुणे शहरात दिवसाला सुमारे २ कोटी रुपयांच्या सायबर चोरट्यांनी फसवणूक केल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी आपली फसवणूक टाळण्यासाठी आपणच सावधगिरी बाळगली पाहिजे. असे आवाहन पुणे शहर सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक संदीप कदम यांनी केले आहे.

लोणी काळभोर (ता.हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात नवीन कायदेविषयक व सायबर गुन्हेसंदर्भात जनजागृती कार्यशाळेचे आयोजन आज शुक्रवारी (ता.31) सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास करण्यात आले होते. यावेळी बोलताना वरील आवाहन संदीप कदम यांनी केले आहे. यावेळी विधी तज्ज्ञ ॲड. आर. बि. खंदारे, कायदेशीर सल्लागार ॲड. पिंकी राजगुरू लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य अंबादास मंजुळकर, प्राचार्य सीताराम गवळी, डॉ. संभाजी निकम, पोलिस उपनिरीक्षक अनिल जाधव, पूजा माळी, अमोल घोडके, रत्नदीप बिराजदार, सर्जेराव बोबडे, गोपनीय विभागाचे प्रमुख पोलिस हवालदार रामदास मेमाणे, रवी आहेर, पोलिस पाटील प्रियंका भिसे, पोलिस पाटील मिलिंद कुंजीर, महिला दक्षता समितीच्या सदस्या, पोलिस कर्मचारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.




### ऑनलाईन फसवणूक झाल्यास काय कराल?

● ऑनलाईन फसवणूक झाल्यास सर्वप्रथम तुमच्या जवळच्या पोलिसांत याविषयी तक्रार नोंदवा. त्यानंतर त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी बँकेत जाऊन फसवणुकीची तक्रार द्यावी. त्यासोबत पोलिसांत दिलेली तक्रारदेखील जोडावी. या दोन्ही तक्रारींची सॉफ्ट कॉपी रिझर्व्ह बँकेच्या crpc@rbi.org.in या ईमेल आयडीवर तसेच तुमच्या बँकेच्या ईमेल आयडीवर पाठवावी. ही सर्व प्रक्रिया तुमची फसवणूक झाल्यापासून 3 दिवसांच्या आत व्हायला हवी.

" एका महत्त्वाच्या वाटचालीत, भारताने आपल्या फौजदारी न्याय व्यवस्थेत तीन महत्त्वपूर्ण कायदे कायदे लागू केले आहे. भारतीय दंड संहिता १८६०, फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ आणि भारतीय पुरावा कायदा १८७२ ची जागा भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, आणि भारतीय साक्ष्य अधिनियम यांनी घेतली आहे.
— **ॲड. पिंकी राजगुरू**

नव्या भारतीय न्याय संहितेत नवीन गुन्ह्यांचाही समावेश आहे. लग्नाचे आश्वासन देऊन फसवणूक झाल्यास 10 वर्षांपर्यंत तुरुंगवास हा त्यापैकी एक आहे. तसंच वंश, जात, समुदाय किंवा लिंग याच्या आधारावर मॉब लिंचिंग झाल्यास जन्मठेपेपर्यंतची तसंच सोनसाखळी किंवा पाकिट हिसकावणे अशा गुन्ह्यांसाठी शिक्षा तीन वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद आहे.

दरम्यान, या कार्यक्रमाचे आयोजन लोणी काळभोर पोलीस ठाणे, समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालय व पृथ्वीराज कपूर मेमोरियल हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज च्या वतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोलिस अंमलदार मंगेश नानापुरे यांनी केले तर आभार पोलिस उपनिरीक्षक अमोल घोडके यांनी मानले.

" या सायबर फ्रॉडच्या फसवणुकीमध्ये समाजातील प्रतिष्ठित नागरिकांचा समावेश आहे. यामध्ये वकील, डॉक्टर, व्यावसायिक, बँकेचे अधिकारी, शिक्षक व पोलिसांचाही समावेश आहे. त्यामुळे आपल्या बँकेची कोणालाही माहिती देऊ नये. कारण धोका तो वही देता है! जिसमे जादा विश्वास होता है! आजची मुले ही उद्याची सुज्ञ नागरिक असणार आहेत. त्यांच्या हाती देश चालवण्याची जबाबदारी असणार आहे. त्यामुळे या प्रकारच्या फ्रॉड पासून सावध राहण्याची सर्वांना गरज आहे.
— **संदीप कदम,** पोलिस उपनिरीक्षक सायबर पोलिस ठाणे

## ? पुण्यात काय घडतंय...

### अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन

● **विषय :** पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला असल्याने पाली भाषेच्या प्रचार आणि प्रसारासाठी पद्मपाणि फाउंडेशन संचलित अभिजात पाली भाषा संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्यावतीने तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली आणि बौद्ध अध्ययन विभागाच्या सहकार्याने अखिल भारतीय पाली साहित्य संमेलनाचे आयोजन केले आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी कोलकात्ता विद्यापीठाच्या पाली विभागाचे प्रमुख अरुण कुमार यांची निवड करण्यात आली असून या संमेलनात भारतासह म्यानमार, श्रीलंका, व्हीएतनाम, जर्मनी, स्वित्झर्लंड, साऊथ कोरिया, थायलंड या देशातील पाली विषयातील तज्ज्ञ सहभागी होणार आहेत.

अखिल भारतीय पाली साहित्य संमेलन

● **हस्ते :** डॉ. अतुल पाटणे, प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य मंत्रालय, महाराष्ट्र शासन

● **प्रमुख पाहुणेः**- डॉ. जेम्स वू हार्टमन, जागतिक कीर्तीचे भाषा तज्ज्ञ, जर्मनी

● **प्रमुख उपस्थिती**- डॉ. महेश देवकर, प्रमुख, पाली व बौध्द अध्ययन विभाग, डॉ. आर. व्ही. सिंग, दिल्ली, शास्त्रज्ञ आणि पाली भाषेचे प्रसारक, डॉ. रमेश वानखेडे, प्रमुख, पाली विभाग, रांची विद्यापीठ, मध्य प्रदेश , डॉ. दिपक चांदणे, प्रमुख, प्रतिमा प्रकाशन, डॉ. धम्मदीप वानखेडे, पाली विभाग, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली

● **कुठे :** सावित्रीबाई फुले सभागृह, भावनी पेठ, पुणे येथे

● **कधी :** शनिवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी

सकाळी १०.३० वाजताः संमेलन उद्घाटन

सकाळी १०.३० ते संध्याकाळी ६.०० या वेळेत सावित्रीबाई फुले सभागृह, भावनी पेठ, पुणे

सकाळी १०.०० वाजता- ग्रंथ दिंडी- महात्मा फुले वाडा ते सावित्रीबाई फुले सभागृह

# महात्माजींचे विचार मारण्याचा आजही प्रयत्न : यशोमती ठाकुर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महात्मा गांधी यांना आजच्या दिवशी ठार मारण्यात आले. परंतु महात्मा गांधी ही केवळ व्यक्ती नव्हती तर तो एक विचार होता. महात्मा गांधी यांना गोळ्या घालून त्यांचे विचार संपतील हा गैरसमज आहे. आजही महात्मा गांधींच्या विचारांविरोधातील लोक त्यांचे विचार मारण्याचा रोज प्रयत्न करत आहेत, ते लोक संपतील पण महात्मा गांधींचे विचार संपणार नाही. असे मत महाराष्ट्र राज्याच्या माजी महिला व बालकल्याण मंत्री यशोमती ठाकूर यांनी व्यक्त केले

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात आयोजितकरण्यात आलेल्या आठव्या युवा संसद मध्ये 'राजकारणातील व समाजकारणातील महिलांचा सहभाग' या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रामध्ये यशोमती ठाकूर बोलत होत्या. महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, अहिल्या फाउंडेशनच्या अध्यक्ष रमाबाई लटपटे, इन्स्टिट्यूट चे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर आदी यावेळी उपस्थित होते. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य पूजा पारगे यांना आदर्श जिल्हा परिषद सदस्य पुरस्काराने गौरवण्यात आले.



" महिला आरक्षणामुळे समाजकारण आणि राजकारणातील महिलांचे प्रमाण वाढत आहे, परंतु ते प्रमाण पुरेसे नाही. महिलांच्या नावाने पुरुष सत्तेचा उपभोग घेत असेल तर या आरक्षणाचा उपयोग होणार नाही. त्यासाठी महिलांनी सबलीकरण केले पाहिजे आणि स्वतःचा कारभार स्वतः चालवण्यासाठी सक्षम असले पाहिजे. महिलांच्या पाठीशी पुरुष समर्थपणे उभे राहिले तर महिला सशक्तीकरणाच्या लढ्याला अधिक गती येऊ शकेल आणि तरच खऱ्या अर्थाने पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार होऊ शकेल.
- **रूपाली चाकणकर**

● महिला जेव्हा समाजकारण आणि राजकारणामध्ये काम करतात तेव्हा त्यांना प्रथम विरोध होतो त्यानंतर त्यांना धमक्या दिल्या जातात आणि त्यापुढे जाऊन त्यांचे चारित्र्य बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो. या सर्व प्रकारांना सामोरे जाण्यासाठी महिलांनी मानसिकरित्या तयार असले पाहिजे. आजही महिलांना मंदिरामध्ये प्रवेश मिळण्यासाठी लढावे लागत आहे हे पुरोगामी महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. महिलांनी स्वतःच्या मनातील भीती दूर करून स्वतःचे अस्तित्व दाखवण्यासाठी पुढे आले तरच खऱ्या अर्थाने त्यांचे अस्तित्व समाजाला दिसू शकेल.

# विद्यापीठ उभारणीसाठी नवे निकष ?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** देशातील उच्च शिक्षणसंस्थांचे किमान ३ हजार विद्यार्थ्यांसह बहुविद्याशाखीय विद्यापीठे, समूह विद्यापीठे, ज्ञान केंद्रांमध्ये रूपांतर करण्याची शिफारस उच्च शिक्षण धोरणात आहे. नव्या उच्चशिक्षण संस्थांची स्थापना करून देशाच्या सर्व भागांमध्ये शिक्षणाची उपलब्धता, सर्वसमावेशकता आणि समानता साध्य करण्यावर भर आहे. त्यानुसार २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मोठी बहुविद्याशाखीय उच्चशिक्षण संस्था असली पाहिजे, असे नव्या शैक्षणिक धोरणात नमूद करण्यात आले आहे.

आता विद्यापीठ स्थापन करण्यासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या निकषात बदल करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घेतला आहे. शहरी भागात दहा एकर, तर मुक्त विद्यापीठ आणि ऑफ कॅम्पससाठी पाच एकर जमीन असणे अनिवार्य असणार आहे.

UGC
University Grants Commission

या पार्श्वभूमीवर विद्यापीठ स्थापनेसाठी नव्या निकषांची शिफारस करण्यासाठी यूजीसीने ६ सदस्यांची समिती नियुक्त केली होती. त्यात राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांचाही समावेश होता. समितीने सर्व राज्यांतील कायदे, जमीन आवश्यकतेचे नियम, विविध शिखर संस्थांचे निकष यांचा अभ्यास करून नवे निकष प्रस्तावित केले आहेत. त्यासाठी बहुविद्याशाखीय शिक्षण, जमिनीची उपलब्धता, ऑनलाइन शिक्षण, मोकळ्या जागा असे घटक विचारात घेण्यात आले. याबाबतचे परिपत्रक यूजीसीने प्रसिद्ध केले आहे.

### 'व्हर्टिकल' विस्तार करणेही शक्य

● मुक्त विद्यापीठ आणि ऑफ कॅम्पससाठी पाच एकर जागा असणे आवश्यक आहे. शहरी आणि डोंगराळ भागात विद्यापीठ स्थापन करण्यासाठी किमान १० एकर जागा उपलब्ध असली पाहिजे. त्यातील तीन एकर जागा मोकळी असणे गरजेचे आहे. ही जमीन विखुरलेली असली, तरीही परवानगी दिली जाऊ शकते. कायद्याने परवानगी असलेल्या ठिकाणी 'व्हर्टिकल' विस्तार करणेही शक्य आहे. त्यानुसार बांधकामाचे क्षेत्र कमी होऊ शकते. मात्र, हरित संकुलासाठी किमान तीन एकर मोकळी जागा असली पाहिजे, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# आरटीईच्या प्रवेशांसाठी शिक्षण विभागाकडून समितीची स्थापना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिक्षण हक्क कायदा (आरटीई) आणि आरटीई प्रवेश प्रक्रिया यात वेळोवेळी केलेल्या सुधारणा एकत्रित करून त्यात आवश्यक त्या सुधारणा करण्यात येणार आहेत. त्यासाठी शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यांची समिती नियुक्त केली असून, समितीला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागाने या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला. अधिनियमात केंद्र सरकारने केलेल्या सुधारणांनुसार राज्य शासनानेही वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत. मात्र, आरटीईअंतर्गत २५ टक्के राखीव जागांवरील प्रवेश प्रक्रिया राबवताना निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत कालानुरूप सुधारणा करणे, प्रवेश प्रक्रिया पारदर्शी पद्धतीने राबवण्यासाठी सर्व नियमांचा एकत्रित समावेश करून नवीन अधिसूचना प्रसिद्ध करणे आवश्यक असल्याचे नमूद करून समिती नियुक्त करण्यात आली आहे.




# एमआयटीतर्फे 'मेल टू महात्मा' अभिनव संकल्पना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राष्ट्रपिता महात्मा गांधीजीचे विचार प्रत्येकाने अंमलात आणावे तसेच विश्व शांतीचा प्रचार व प्रसार व्हावा. हा मुख्य उद्देश्य ठेवून माईर्स एमआयटी शिक्षण समूह आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी तर्फे 'मेल टू महात्मा' ही अभिनव संकल्पना चालविली जाणार आहे. यामध्ये समूहातील ७२ हजार विद्यार्थी व ३ हजार शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी युनायटेड नेशन्स, युनेस्को आणि जगभरातील सर्व प्रमुख देशांच्या राष्ट्र प्रमुखांना पत्र लिहिण्याचा संकल्प सोडला आहे. यामध्ये असे नमूद करण्यात येणार आहे की, म. गांधीजींचे विचार अमलात आणून, हिंसाचार, रक्तपात, सीमावाद थांबवून शांतता नांदण्यासाठी पुढाकार घ्यावा. त्यासाठी सर्वांना समोर येण्याचे आवाहन माईर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ कराड यांनी केले आहे.



राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या ७८ व्या पुण्यतिथी निमित्त एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित आदरांजली कार्यक्रमात विश्वधर्मी प्रा.डॉ.विश्वनाथ दा कराड यांनी हा संकल्प सोडला आहे. या वेळी डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, प्र कुलगुरू डॉ.मिलिंद पांडे, डॉ. संजय उपाध्ये, प्रा. दत्ता दंडगे, डॉ.मिलिंद पात्रे, डॉ. महेश थोरवे यांच्यासह विद्यार्थी परिषदेचे सर्व पदाधिकारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

म. गांधीजींनी सतत आत्मपरीक्षण केले आहे. त्यांचा विचार जीवनात उतरविणे गरजेचे आहे. त्यांच्या तत्वांवर विचार करण्याची वेळ आली आहे, असे मत डॉ. विश्वनाथ कराड यांनी व्यक्त केले.

# सामाजिक न्याय मंत्र्यांकडून विविध योजनांचा आढावा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी असे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले.

समाज कल्याण आयुक्तालयामध्ये आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरीया, पुणे विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, सहायक आयुक्त समाज कल्याण विशाल लोंढे आदी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागातील विविध योजनांचा आढावा घेऊन मंत्री शिरसाट म्हणाले, अंमलबजावणी यंत्रणेने योजनांची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींची माहिती सादर करावी, जेणेकरून त्यावर उपाययोजना करता येतील. जिल्हास्तरावर अनुसूचित जाती उपयोजनेच्या गतिमान अंमलबजावणीसाठी विविध विभागांशी योग्य समन्वय ठेवण्यात यावा. योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणेसाठी आवश्यक त्या शासन निर्णयांमध्ये बदल करण्यात येईल. या वेळी समाज कल्याण विभागातील कर्मचारी आणि शासकीय वसतिगृतील विद्यार्थी उपस्थित होते.



" राज्यामध्ये २५ हजार विद्यार्थ्यांसाठी नव्याने वसतिगृहे सुरु करण्याचा मानस आहे. बैठकीनंतर मंत्री श्री. शिरसाट यांनी सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी, येरवडा पुणे येथील युनिट क्र. ३ व ४ च्या शासकीय वसतिगृहाच्या इमारतीची पाहणी करुन सार्वजनिक बांधकाम विभाग व पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना या इमारतीचे भोगवटा प्रमाणपत्र तात्काळ निर्गमित करणेबाबत आदेश दिले. तसेच हे वसतिगृह सुरु करणेसाठी वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया त्वरित पूर्ण करणेबाबत समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत."
— **संजय शिरसाट** सामाजिक न्याय मंत्री

# ग्लोबल आडगाव' चित्रपटाला राज्य शासनाच्या पुरस्काराची चार नामांकने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** उद्योजक व सर्जशील चित्रपट निर्माते मनोज कदम यांनी निर्मिती केलेल्या ग्लोबल आडगाव चित्रपटाला महाराष्ट्र राज्य शासनाच्या सन २०२२ च्या ६० व्या चित्रपट पुरस्कारासाठीच्या नामांकनांची सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी घोषणा केली.

मराठवाड्याच्या मातीतील निर्मिती असलेला बहुचर्चित 'ग्लोबल आडगाव' या चित्रपटात चार नामांकने मिळाली आहेत. यामुळे चित्रपटसृष्टीच्या इतिहासात मराठवाड्याला पहिल्यांदाच मोठा बहुमान मिळाला आहे.



या सिनेमांमधून शेती, माती, ग्रामसंस्कृती त्याचबरोबर ग्लोबलायझेशनच्या विळख्यात अडकलेला शेतकरी, ग्लोबलायझेशन मुळे शेतीचे झालेले नुकसान अशा महत्त्वाच्या विषयावर या सिनेमाच्या माध्यमातून भाष्य करण्यात आलेले आहे.

# वीज खाजगीकरणा विरोधात जनआंदोलन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** वीज ग्राहकांना वीजेचा नक्की वापर कळावा, वीज बील वेळेत भरता यावे व वीजेची बचत करून वीज वापरावरील खर्च कमी करता यावा. यासाठी प्रीपेड स्मार्ट मिटर बसविण्याचा उद्देश केंद्र सरकार व राज्य सरकारने जाहिर केले आहे. मात्र महावितरणची सध्या अस्तित्वात असलेली मिटर प्रणाली ही स्मार्टच व डिजीटल असुन वीज ग्राहकाला त्याचा दैनदिन वापर मिटर रिडींगवरून अवगत करता येतो. सरकारने महावितरणाच्या सर्व वीज ग्राहकांना सक्तीने प्रीपेड मीटर लावण्याच्या निर्णयाच्या विरोधात पुण्यात १७ संघटनांनी रस्त्यावर उतरून सरकारच्या या निर्णयाला तीव्र विरोध दर्शविला आहे. पुण्यातील रास्ता पेठेतील पॉवर हाऊस येथे काल कामगार संघटना, सामाजिक संस्था व ग्राहकांनी जण आंदोलन केले. या आंदोलनात अनेक संघटना सहभागी झाल्या होत्या.

यावेळी महावितरण पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांना संघटनांच्या वतीने निवेदन देण्यात आले. स्मार्ट प्रीपेड मिटर बसवण्याची योजना ही केंद्र सरकारच्या दबावामुळे राबविण्यात येत असलेली खर्चिक व वीज उद्योगाला आर्थिक आरिष्टात ढकलणारी योजना आहे, असे निवेदनात नमूद केले आहे.

# मनसेच्या आंदोलक पवित्र्याने निवडणुकीची चाहूल ?

**शहरातील नागरी प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या दारी जाऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यास सुरुवात केली आहे. 'प्रश्न जेथे जनतेचा, मार्ग तेथे मनसेचा' हे ब्रीदवाक्य घेऊन या अभियानाद्वारे पुणेकरांशी संपर्क साधण्याचे नियोजन करण्यात आले आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांनंतर नेहमीप्रमाणे मनसे शांत होती. आता अचानक आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यामुळे महापालिका निवडणुका जवळ आल्याची चाहूल लागली आहे. या वेळी 'हिंदुत्व आणि मराठी माणूस' हा विषय घेऊन आक्रमक भूमिका घेण्याचा आदेश पक्षश्रेष्ठींकडून देण्यात आल्याने मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते कामाला लागले आहेत. त्याची सुरुवात 'मनसे आपल्या दारी' या अभियानाने करण्यात आली आहे.



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) अस्तित्व जाणवू लागले, की समजायचे कोणत्या तरी निवडणुका जवळ आल्या. निवडणूक आल्यावर आक्रमक होणारा हा पक्ष पुण्यात मागील पाच वर्षांपासून निद्रिस्तावस्थेत असल्यासारखा होता.

आता 'हिंदुत्व आणि मराठी माणसासाठी लढा' असा पक्षश्रेष्ठींचा आदेश आल्याने मनसैनिक जागे झाले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा मराठीचे स्मरण करत या पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मराठी माणसासाठी लढ्याला तयार झाल्याचे आश्वासक चित्र पुण्यात सध्या तरी निर्माण झाले आहे.

शहरातील नागरी प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या दारी जाऊन त्यांचे प्रश्न सोडविण्यास सुरुवात केली आहे. 'प्रश्न जेथे जनतेचा, मार्ग तेथे मनसेचा' हे ब्रीदवाक्य घेऊन या अभियानाद्वारे पुणेकरांशी संपर्क साधण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ही एक चांगली बाब म्हणावी लागेल. पाच वर्षांनी का होईना मनसे नागरिकांच्या दारी जाऊन समस्या सोडविण्यासाठी मदतीचा हात पुढे करत आहे, हेही नसे थोडके. महापालिका निवडणुकांना लांबणीवर पडल्या असल्या, तरी या अभियानाच्या निमित्ताने पुन्हा सुखावह काळ येण्यासाठी मनसेची ही पायाभरणी साहाय्यभूत ठरणार आहे.

#रा

# संगीताच्या तालावर रंगले रॅम्प वॉक



## 'ती'चे हळदी-कुंकू

### एस डब्लू एम कॉर्प - 'अ पॅन इंडिया कॉर्प' या कॉर्पोरेट बिझनेस ग्रुपच्या सहकार्याने राष्ट्र संचार आयोजित आणि राज मसाले प्रायोजित 'ती' चे हळदी-कुंकू

## आमची भूमिका

महिला संघटन बळकटीकरण आणि व्यक्त करण्याचा विकास (स्टेज डेरिंग) या हेतूने 'ती' चे हळदी कुंकू हा उपक्रम होत आहे. संक्रांतीचा सण हा महिलांचा आवडीचा सण असतो या सणाच्या निमित्ताने अनेकविध उपक्रमांमध्ये मोठ्या उर्जेने महिला सहभागी होतात. घरगुती हळदी कुंकाचे स्वरूप आता सामाजिक आणि सांस्कृतिक हळदीकुंकू समारंभामध्ये विस्तारत होत आहे. तथापि या विस्तारामध्ये महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा त्यांना प्रकट होता यावे, व्यक्त होता यावे, यासाठी हा उपक्रम शहरातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आला.

जेणेकरून शहरातील सर्वच भागातील महिलांना यामध्ये सहभाग घेता यावा हा उद्देश्य यामागे होता. या उपक्रमात राष्ट्र संचार आणि राज मसाले यांच्या वतीने प्रत्येक महिलेला वाण दिले जाते. तसेच आयोजित खेळातील विजेतीला विशेष बक्षीस देऊन प्रोत्साहित केले जाते. यातील पहिला उपक्रम हा मलाभार गोल्ड अँड डायमंड, लक्ष्मी रोड येथे पार पडला. तर दुसरा कार्यक्रम हा महर्षी नगर पुणे येथील अतिथी बँक्वेट हॉल मध्ये झाला .

'अ पॅन इंडिया कॉर्प' च्या कीर्ती राहुल शहा - लोहगांवकर अँड फ्रेंड्स, राज मसाले या व्यक्ती आणि संस्थांनी यासाठी सहकार्य केले आहे. राष्ट्र संचार डिजिटल ची टीम श्री. सोनावणे, मयूर हुडे, प्रशांत गायकवाड यांनी या कार्यक्रमासाठी मोठी मेहनत घेतली.

मुख्य संपादक अनिरुद्ध बडवे यांनी या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

**- सौ. सारिका रोजेकर**
समन्वयक,'ती'चे हळदी कुंकू



पुणे वन क्लिक : 'कीर्ती राहुल शाह यांच्या 'एस डब्लू एम कॉर्प - 'अ पॅन इंडिया कॉर्प' कॉर्पोरेट बिझनेस ग्रुप च्या सहकार्याने, राष्ट्र संचार आयोजित आणि राज मसाले प्रायोजित अतिथी बँक्वेट हॉल मधील हळदी कुंकू कार्यक्रमात महिलांनी लुटले आनंदाच्या क्षणांचे वाण....

वेगवेगळ्या फॅशनवीकमध्ये मॉडेल रॅम्पवर वॉक करताना आपल्याला दिसतात. या वॉकच्या वेळी त्यांचा एक वेगळा लूक पाहायला मिळत असतो. पण फॅशन वीक मध्ये नाही तर हळदी -कुंकू च्या कार्यक्रमात महिलांनी रॅम्प वॉक करून आनंद लुटला. निमित्त होते मकर संक्रांतीचा सणानिमित्त नाते दृढ करण्याच्या आणि नात्यातील गोडवा वाढविण्याचा .

राष्ट्र संचार च्या वतीने संक्रांती ते रथसप्तमी पर्यंत केल्या जाणाऱ्या हळद-कुंकू सोहळ्यात जी धमाल पहावयास मिळाली .

. 'अ पॅन इंडिया कॉर्प' च्या कीर्ती राहुल शहा - लोहगांवकर अँड फ्रेंड्स च्या सहकार्याने 'राष्ट्र संचार' आयोजित 'ती' चे हळदी कुंकू कार्यक्रमात महिलांनी आनंदाचे वाण लुटले .

महर्षी नगर पुणे येथील अतिथी बँक्वेट हॉल मध्ये हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात उपस्थित सर्व महिलांनी आपला शानभाग नोंदवला. सासू -सुनेचे आणि आई -मुलीचे रॅम्प वॉक करुकरांचे प्रमुख आकर्षण ठरले. उपस्थित महिलांनी एकमेकांना तीळगुळ देऊन गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर उर्वरित आयुष्य एकमेकींसोबत राहून एकमेकींना सामाजिक आधार देण्याचा संकल्प करण्यात आला.

### आर जे चा बहारदार परफॉर्मन्स

- एफएम रेडिओ चॅनल वरून अत्यंत सुरेल उत्साही आणि हजरजबाबी पणाची साक्ष देणारा भारदार आवाज आपण नेहमीच ऐकतो परंतु हाच आरजे म्हणजे रेडिओ जॉकी प्रत्यक्ष समोर ऐकण्याची गोष्ट न्यारीच !
- राष्ट्र संचारच्या या हळदीकुंकू सोहळ्याच्या निमित्ताने महिलांना आर जे राहुल यास प्रत्यक्ष अनुभवता आले.
- आर जे राहुल यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. हळदी - कुंकू समारंभामध्ये राष्ट्र संचार वर्तमानपत्राच्या माध्यमातून विविध प्रश्न विचारण्यात आले. सहभागी महिलांनी या प्रश्नोत्तर कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अगदी चाणाक्ष नजरेने महिलांनी राष्ट्र संचारचे वाचन करून तत्परतेने उत्तरे दिली आणि कार्यक्रमाचे वातावरण आनंदी केले.

**उपस्थित सर्व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**

**राष्ट्र संचारमधील वैविध्यपूर्ण बातम्यांवर आधारित प्रश्नमंजुषा**

**डोक्यावर पदर घेऊन पारंपरिक रॅम्प वॉक**

**सहभागी महिलांना आकर्षक बक्षीस**

**उखाण्यांतून दिला सामाजिक संदेश**

आयोजक

राष्ट्रसंचार Beyond the News

Since 1974 राज मसाले ®

SWM CORP A PAN INDIA CORP

प्रायोजक





पुणे प्रेमाचे वाण : कीर्ती राहुल शहा - लोहगांवकर यांना दैनिक राष्ट्र संचार च्या संचालक सौ. अंजली अनिरुद्ध बडवे राज मसाले चे गिफ्ट हॅम्पर देताना. यावेळी कार्यक्रम समन्वयक सारिका रोजेकर उपस्थित होत्या.

### उपस्थित महिलांची धमाल मस्ती आणि उत्स्फूर्त सहभाग ...

- या कार्यक्रमात कीर्ती राहुल शहा - लोहगांवकर यांच्या सहभागी सख्या महिलांनी अगदी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आनंद साजरा केला. तब्बल दोन ते अडीच तास रंगलेल्या कार्यक्रमात महिला दंग झाल्या होत्या. यामध्ये सुचिता चोरडिया, विद्या चौधरी, पलक जैन, अंजली जोशी, मानसी जोशी, प्रियांका जांभळे, उल्का देठे - पाटील, गौरी अल्लम, भावना अल्लम, आकांक्षा पहाडे, सोनल परमार, स्नेहा दुधाकिया, कृष्णा चावला, नीलम खेरुडकर, नीता फणसे, नैना भगत, मुस्कान भगत, परी भगत, रिया कोकाटे, रजनी लाड, आशालता जांभळे, वनिश्री चावंडे, ख़ुशी चावंडे, दिपाली चावंडे, कीर्ती चावंडे, श्रद्धा पटेल यांचा समावेश होता. महिलांना कुठेतरी मनमोकळे आनंद व्यक्त करण्याची संधी या कार्यक्रमामुळे मिळवुन दिली. सहभागी होऊन एक वेगळा आनंद घेण्याचा संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल राष्ट्र संचार चे आभार प्रत्येक महिलेने आवर्जून मानले. खेळ खेळताना महिलांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.















आपली संस्कृती या आधुनिक युगात कोठेतरी लोप पावत चालली आहे. त्यामुळे हळदी-कुंकू सारखे कार्यक्रम आजच्या काळात गरजेचे आहे. या आधुनिक युगात महिलांनी कोणता पोशाख करावा याबाबत काही मत नाही पण आपली संस्कृती सोडू नये. आपले महाराष्ट्राच्या संस्कृतीशी निगडीत संस्कार मुलींनी बदलू नयेत. हळदी-कुंकू हा सामाजिक, वैचारिक वारसा जपण्याचा, नाते संबध अधिक दृढ करण्याचा आणि देवाण- घेवाणीचा एक उत्तम मार्ग आहे.

**— कीर्ती राहुल शहा -लोहगावकर,** एस डब्लू एम कॉर्प - 'अ पॅन इंडिया कॉर्प' कॉर्पोरेट बिझनेस ग्रुप च्या सी इ ओ







## At a Glance

### आता नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र बंधनकारक

**पुणे :** राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी आरक्षण (एसईबीसी) अधिनियम, २०२४ मधील अधिनियमान्वये राज्यात अंमलात आला असून, याअन्वये राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील व पदांवरील सरळसेवांमधील नियुक्तीसाठी व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी १० टक्के आरक्षण लागू करण्यात आले होते. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गासाठी आरक्षण अंमलबजावणीच्या अनुषंगाने द्यावयाचे जात प्रमाणपत्र आणि नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द करण्यात आली असून, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाने राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्यताप्राप्त खासगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये, तंत्रनिकेतने आणि शासकीय विद्यापीठात विनाअनुदानित तत्त्वावर सुरू असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला सादर करण्याची अट रद्द केली.

# जागा न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या : विस्तारीकरणाची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाच्या शेजारील मंगळवार पेठ, सि.स.नं. ४०५ क्षेत्र अं.८९०० चौ.मी. ही जागा भवनाच्या विस्तारीकरणासाठी मिळावी यासाठी शिव, फुले, शाहू व आआंबेडकरी जनतेच्या वतीने शुक्रवार ७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे भव्य धरणे आदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात पुणे शहर, जिल्हा, पिंपरी चिंचवड मधील सर्व शिव, फुले, शाहू व आआंबेडकरी चळवळीतील पक्ष संघटना मोठ्या प्रमाणात सहभागी होणार आहेत, अशी माहिती भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन विस्तारीकरण कृती समिती पुणे च्या वतीने करण्यात आली आहे.

पुणे महानगरपालिका पुणे स्टेशन जवळील मालधक्का चौकात डॉ बाबासाहेब आबेडकर सांस्कृतिक भवन उभारले आहे. या भवनामध्ये केवळ ३०० आसनी प्रेक्षागृह, अभ्यासिका आहे सदरचे भवन हे केवळ १० गुंठे क्षेत्रामध्ये वसलेले आहे ज्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहिली, ज्यांचा देशाच्या जडणघडणीत सिंहाचा वाटा आहे त्या महामानवाचे विचाराचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सध्याचे डॉ बाबासाहेब आबेडकर सांस्कृतिक भवन हे खूप अपूरे पडत आहे त्यामुळे या भवनाचे विस्तारीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.

या भवनाच्या पुर्वेला सार्वजनिक बांधकाम विभागाची (PWD) सि सन ४०५ एकुण क्षेत्र ८९०० चौ मी जागा आहे परंतु सदरची जागा/भूखंड शासनाने शाखन निर्णय क सा.बा. विभाग १०९७ (१६९)/रस्ते-८/दि २६/०६/१९९८ नुसार सदरचा भूखंड हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास (MSRDC) ९९ वर्षाच्या भाडेपट्टयाने दिलेला आहे. त्यामुळे मालमत्ता पत्रकावर महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे नाव दिसत आहे. त्याचाच गैरफायदा घेवून तसेच व्यावसायिक दृष्टीकोन डोळयासमोर ठेवून MSRDC ने सदरचा भूखंड हा खाजगी बिल्डरच्या घशात घालण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. त्याकरीता निविदा/टेंडर काढले असून सदरचा भूखंड कवडी मोल भावाने खाजगी बिल्डरला ६० वर्षाच्या भाडेपटट्याने देण्याचे MSRDC ने निश्चित केले आहे त्यामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असून, त्यामध्ये MSRDC चे वरिष्ठ अधिकारी सामील आहेत. सदर भूखंडावर व्यावसायिक गाळे उभारून कोट्यावधी रूपये कमविण्याचा खाजगी बिल्डर व MSRDC चे वरिष्ठ अधिकारी यांचा डाव आहे त्यामध्ये सामान्य पुणेकरांचा काहीही फायदा नाही त्यामध्ये संबंधित बिल्डर व MSRDC चे अधिकारीच मालामाल होणार आहेत, असे आरोप विस्तारीकरण कृती समिती पुणे ने केले आहे.

आंबेडकरी पक्ष, संघटनांनी सदरची जागा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाकरीता देण्याची वेळोवेळी शासन दरबारी मागणी केली. सन २०१६ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील सदरची जागा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवना करीता देण्यास परवानगी दयावी, असा आदेश दिला परंतु त्यांच्याही आदेशाची अंमलबजावणी शासनाने केलेली नाही.

सबब वर नमुद सि.स.नं.४०५ अंदाजे क्षेत्र ८९०० चौ.मी ही MSRDC चे मालकीची जागा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे विस्तारीकरण करणेकरीता मिळाल्यास त्यावर पुणे महानगरपालिकेच्या वतीने आंबेडकरी विचारांचे प्रचार व प्रसार केंद्र, संशोधन केंद्र, स्पर्धा परिक्षा केंद्र, अभ्यासिका, प्रदर्शनी इ. उपकम उभारता येवू शकतील. त्या माध्यमातून पुणे शहरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उचित स्मारक होईल व ते पुण्याचे वैभवात भर घालणारे ठरेल. या बाबतीत आंबेडकरी जनतेच्या भावना तीव्र असून वर नमुद जागेवर डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे विस्तारीकरण झालेच पाहीजे,




● सध्याचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन हे केवळ १० गुंठे जागेमध्ये साकारले आहे या भवनाचे उद्घाटन ९ एप्रिल २००० रोजी तत्कालिन मुख्यमंत्री विलासराव देशमूख यांच्या हस्ते झाले होते. त्यावेळी त्यांनी वर नमूद PWD ची जागा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे विस्तारीकरणासाठी देण्याचे तत्वतः मान्य केले होते. त्यांनतर पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने २०/०७/२००० रोजी ठराव क. १०३ अन्वये सदरची जागा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्क्तिक भवना करीता घेण्याचा ठराव एकमताने मंजूर केला होता परतू दुर्देवाने पुणे महानगरपालिकेने सदर ठरावाचे अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही केली नाही त्यामुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवनाचे विस्तारीकरण होवू शकले नाही.

**या आहेत मागण्या**

- अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन, मंगळवार पेठ, पुणे ११ शेजारील सि.स.नं.४०५ अं. क्षेत्र ८९०० चौ.मी ही जागा भवनाचे विस्तारीकरणासाठी पुणे महानगर पालिकेकडे त्वरीत हस्तांतरीत करण्यात यावी.
- ब) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने सदरचा भूखंड खाजगी बिल्डरला देण्याकरीता काढलेली निविदा त्वरीत रद्द करण्यात यावी.
- क) पुणे महानगरपालिकेने मुख्य सभेत केलेल्या ठराव क. १०३ ता. २०/०७/२००० ची अंमलबजावणी करण्यात यावी
- ड) सदर भूखंडावर बिल्डरने चालू केलेले विकसनाचे काम त्वरीत थांबविण्यात यावे.

# वाहतूककोंडी उपाययोजनांचा समावेश करा : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध सामाजिक संस्था, नागरिकांना विश्वासात घेऊन संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे. यासंबंधात आलेल्या सूचनाही विचारात घ्याव्यात. १०० दिवसांच्या कार्यक्रमात वाहतूककोंडी सोडविण्याच्या उपाययोजनांचा समावेश करण्यात यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

**निर्देश**

विधानभवन येथे आयोजित वाहतूक समस्येबाबत आढावा बैठकीत बोलताना अजित पवार म्हणाले, " पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या विचारात घेता वाहतूककोंडी कमी करण्याकरिता पुढाकार घ्यावा. रस्त्यावरील अतिक्रमणाची ठिकाणे निश्चित करुन महानगरपालिकेने ते अतिक्रमण तात्काळ काढावेत. रस्ते आणि वाहतुकीच्या प्रकल्पांसाठी आवश्यक भूसंपादनाच्या कार्यवाहीला गती द्यावी.

याकरिता आवश्यकतेप्रमाणे पोलीस विभागाची मदत घ्यावी. याकरिता अत्याधुनिक साधने, कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या नवनवीन तंत्रज्ञानाची तसेच या विषयाशी निगडित तज्ज्ञ व्यक्तींची मदत घ्यावी. भूसंपादनाची प्रलंबित असलेली न्यायालयीन प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कार्यवाही करावी."

चाकण परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्याकरिता पिंपरी-चिंचवड महापालिका, पोलीस आयुक्तालय आणि महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने मिळून कार्यवाही करावी. वाहतूक सुरळीत राहण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा उभाराव्यात. यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही", असे अजित पवार यांनी म्हंटले आहे.

**अशा करा उपाययोजना**

" पुणे शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्याकरिता पुणे महापालिकेकडे असलेली वाहतूक सिग्नल यंत्रणा पोलीस आयुक्तालयाकडे हस्तांतरित करावी. नवले पुलाचे प्रलंबित कामे गतीने पूर्ण करावीत. स्मार्ट सिटी कार्यालयातील वाहतूक व्यवस्थापन यंत्रणेंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांची सेवा पोलीस आयुक्ताकडे वर्ग करावी. अहिल्यानगर व सोलापूर महामार्गावर प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी ट्रॅव्हॅल्स थांब्याकरिता जागा निश्चित कराव्यात. सुरक्षिततेच्या दृष्टीने त्याठिकाणी सीसीटीव्ही, वीज आणि शौचालय, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

**-उपमुख्यमंत्री , अजित पवार**

# देशातील कलाकारांचे 'सप्तरंगी कला प्रदर्शन' सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशभरातील ४० हून अधिक कलाकारांच्या कलाकृती असलेल्या 'सप्तरंगी' कला प्रदर्शनाला आज (शुक्रवार) पासून सुरुवात झाली आहे. कला, भारतीय संस्कृती आणि पर्यावरणाला समर्पित हिसारच्या टैलेंटिला फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने यशवंतराव चव्हाण नाट्यगृह आर्ट गॅलरी येथे या कला प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून हे प्रदर्शन २ फेब्रुवारी पर्यंत सुरू राहणार आहे. दुपारी १२ ते रात्री ८ पर्यंत सुरू राहणार असून मोफत प्रवेश आहे.

सप्तरंगी कला प्रदर्शनाचे उद्घाटन सहभागी महिला कलाकारांच्या हस्ते करण्यात आले. या कला प्रदर्शनात देश-



विदेशातील प्रसिद्ध कलाकार हरिप्रिया नरसिंहान, सोनल सक्सेना, मोनिता ढींगरा, केदारनाथ भागवत, राखी कुमारी, दत्तात्रय खेळकर, सुधीर करण्डे, अर्चना श्रीवास्तव, रचना सिंह, हेरिबेर्टो नोपनी, नरेंद्र गंगाखेडकर, सतीश पोटदार, धात्री थानकी, कारमेला न्यूनेज, संजय उमरानीकर, निहारिका श्रीवास्तव, जयश्री पाटील, क्रेजेंटा कदम, आर्या कुलकर्णी, माधुरी गयावाल, विनय जोशी, हीरालाल गोहिली, प्रीती राऊत, विभावरी देसाई, इशिता रामाप्रसाद, अंजन रॉय, सोलेदाद बुरगालेता, भाग्यश्री गोडबोले, डॉ बाय एस कुलकर्णी, दत्तात्रेय खेडकर आदींसह ४० कलाकारांच्या चित्रांचा समावेश आहे.

### लाईव्ह आर्ट डेमो

● टैलेंटिला फाउंडेशनच्या संस्थापक आणि संचालक अनुराधा खरे आणि विनीत खरे यांनी सांगितले की, आमच्या संस्थेचे पुण्यातील हे दुसरे कला प्रदर्शन आहे. या कला प्रदर्शनात विविध प्रकारच्या कलांचे प्रदर्शन करण्यात आले आहे, तसेच देशातील प्रसिद्ध कलाकार संजय उमरानीकर, मोनिता ढींगरा, विभावरी देसाई, केदारनाथ भागवत लाईव्ह आर्ट डेमो देणार आहेत.

# टँकरच्या पाण्यात आढळला इकोलाईल विषाणू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** धायरी, नांदोशी, किरकटवाडी, नांदेड या गावांसह काही गावांमध्ये जीबीएसचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळले आहेत. त्यामुळे, महापालिका प्रशासनाच्या पाणीपुरवठा विभागाने उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. गुईलेन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) या आजाराच्या पार्श्वभूमीवर पाण्यांची तपासणी केली असता एका टँकरच्या पाण्यात इकोलाईल विषाणू आढळला आहे. त्यामुळे टँकरचालक-मालक, विहिरी व इंधन विहिरी चालकांना पाणी शुद्धिकरणासाठी ब्लिचिंग पावडरचा वापर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याकडे दुर्लक्ष करणाऱ्यांना महापालिकेकडून नोटीस बजावण्यात आली आहे.

काही दिवसांपासून महापालिकेकडून खासगी टँकरमधील पाण्याचे नमुने घेतले जात आहेत. त्यापैकी एका टँकरमध्ये इकोलाईल विषाणू आढळला आहे. खबरदारी म्हणून पाणीपुरवठा विभागाने खासगी टँकर, खासगी विहीर, इंधन विहिरी येथे ब्लिचिंग पावडरचा वापर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पाणी शुद्ध करण्यासाठीची ब्लिचिंग पावडर महापालिकेकडून पुरविण्यात येत होती. त्यानंतरही, केवळ एका टँकरचालकाकडून ब्लिचिंग पावडर नेण्यात आली आहे. त्यामुळे पाणीपुरवठा विभागाने आता उर्वरित खासगी टँकरचालक, विहीरी, मालकांना नोटीस बजावली आहे.

> खासगी टँकर, आरओ प्लँटमधील पाण्याचेही नमुने तपासणीसाठी घेतले आहे. महापालिकेने आता खासगी टँकर पाणी भरणा केंद्र व खासगी पाणी शुद्धिकरण प्रकल्पातील (आरओ प्लँट) पाण्याचे नमुने घेण्यास सुरुवात केली.
> **— नंदकिशोर जगताप,** पाणीपुरवठा विभाग प्रमुख

# एस टी प्रवाशांना यूपीआय द्वारे तिकीट काढण्याची सुविधा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्य मार्ग परिवहन महामंडळा'च्या एसटी बसमध्ये प्रवाशांना तिकिटाची रक्कम ऑनलाइन देता येणार आहे. महामंडळाने प्रवाशांना 'क्यूआर कोड'च्या मदतीने तिकिटाचे पैसे देण्याची सोय केली आहे. त्यामुळे सुट्ट्या पैशांवरून होणारी वादावादी थांबणार असून, त्याचा फायदा प्रवाशांबरोबरच महामंडळालाही होणार आहे.

प्रवाशांच्या तक्रारी व वाहकांना होणारा त्रास यांची परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दखल घेऊन केलेल्या सूचनेनुसार सुट्ट्या पैशावरून वाहक आणि प्रवाशांच्या मध्ये वाद होऊ नये यासाठी एसटीने प्रवाशांना यूपीआय पेमेंट द्वारे तिकीट काढण्याचे आवाहन केले



आहे. एसटी महामंडळाने प्रत्येक वाहकाकडे अँड्रॉइड इलेक्ट्रॉनिक तिकीट इशू मशीन (ETIM) दिले आहेत. या मशीनच्या माध्यमातून यूपीआय पेमेंट द्वारे तिकीट काढले जाऊ शकते. त्यामुळे प्रवाशांनी तिकीट काढताना या यूपीआय पेमेंटचा वापर केल्यास सुट्ट्या पैशामुळे होणारे वाद टाळता येतील. अशी सूचना मंत्री सरनाईक यांनी केली होती. तसेच एका परिपत्रकाद्वारे सूचना देऊन वाहकांना कर्तव्यावर जाण्यापूर्वी आग्रधन म्हणून सुट्टे पैसे देण्यात यावेत, अशा सूचना महामंडळाने स्थानिक प्रशासनाला दिल्या आहेत.

# ठाकरे गटाचे सहा बडे नेते पक्षाला करणार रामराम !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात विधानसभा निवडणुकीत महायुतीने जोरदार मुसंडी मारत मोठं यश मिळवलं. त्यानंतर आता स्थानिक स्वराज्य पक्षाच्या निवडणुकीसाठी हे पक्ष सज्ज झाले असून त्य दृष्टीने पावले उचलण्यास सुरुवात झाली आहे. एकनाथ शिंदे यांनी पुन्हा ठाकरे गटासह आता काँग्रेसला सुद्धा मोठा धक्का देण्याची तयारी सुरू आहे. काँग्रेसचे कसबा पेटहेचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी मुंबईत एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे ते शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करणार या चर्चांना उधाण आले आहे. तर ठाकरे गटाचे देखील ३ माजी आमदार व ६ बडे नेते यांनी एकनाथ शिंदे याची भेट घेतल्याने उद्धव ठाकरे गटाचे देखील टेंशन वाढणार आहे.

**घडामोडी**

राज्यात सध्या पक्षपक्षांतरं, नव्या नेतृत्त्वाची निवड या सारख्या राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती पुन्हा महाविकास आघाडीला व विशेषत: ठाकरे गटाला जोरदार धक्का देण्याच्या तयारीत आहे. ठाकरेंनी स्वबळावर निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली असतांना शिंदे गटानं 'ऑपरेशन टायगर' सुरू केले आहे. याचा भाग म्हणून ठाकरे गटाचे ६ बडे नेते उदय सामंत यांच्या नेतृत्त्वाखाली शिंदेंच्या शिवसेनेच्या संपर्कात आले आहे. या सर्वांनी उदय सामंत यांची शनिवारी भेट घेतली. या अंतर्गत शिवसेनेचे व काँग्रेसचे माजी आमदारांचा शिवसेनेत प्रवेश घेण्याची शक्यता आहे.



> मी काल माझ्या कामासाठी एकनाथ शिंदेंना भेटलो. माझ्या वैयक्तिक कामानिमित्त मी त्यांना भेटलो. यावेळी त्यांच्या पक्षात जाण्याबाबतची काहीही चर्चा नाही झाली. तर यावेळी तुम्ही शिवसेनेत पक्ष प्रवेश करण्याची चर्चा सुरू असल्याचं विचारताच ते म्हणाले, ते राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत, माझा थोडा प्रॉब्लेम होता, त्यानिमित्त मी त्यांना भेटलो. मला वाटले तर मी अजितदादांना देखील भेटू शकतो. माझे त्यांच्याशी पूर्वीचे संबंध आहेत. मात्र, मी काँग्रेसमध्येच राहणार आहे शिवसेनेत प्रवेश करणार नाही,
> **— रवी धंगेकर**
> माजी आमदार

# मिळकत कराचे उत्पन्नाने दोन हजार कोटी रुपयांवर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिकेच्या मिळकत कराचे उत्पन्नाने दोन हजार कोटी रुपयांचा टप्पा पार केला. पुढील दोन महीन्यात उर्वरीत आठशे कोटी रुपयांचे उत्पन्न मिळविण्याचे आव्हान कर आकारणी व संकलन विभागासमोर उभे आहे. महापालिकेच्या चालू आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकात मिळकत कराचे सुमारे अठ्ठावीसशे कोटी रुपयांचे उत्पन्न गृहीत धरण्यात आले होते. या आर्थिक वर्षातील शेवटचे दोनच महीने शिल्लक असुन, अठ्ठावीसशे कोटी रुपयांचे उद्दीष्ट गाठण्यासाठी मिळकत कर विभागाला प्रयत्न करावे लागणार आहे. यासंदर्भात मिळकत कर विभागाचे उपायुक्त माधव जगताप यांनी बैठक घेतली. यामध्ये अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

# पहिले राज्यस्तरीय 'काव्य विश्व साहित्य संमेलन'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्यात प्रथमच कविता विषयाला वाहिलेले पहिले राज्यस्तरीय काव्यविश्व साहित्य संमेलनाचे' आयोजन करण्यात येत आहे. हे संमेलन काव्यमित्र संस्था आणि अपेक्षा मासिक परिवार, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, ९ फेब्रुवारी रोजी स. ९ ते संध्या. ६ वाजेपर्यंत सदाशिव पेठ येथील उद्यानप्रसाद कार्यालयात होणार आहे. अशी माहिती काव्यमित्र संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र सगर आणि अपेक्षा मासिक परिवारचे संस्थापक संपादक दत्तात्रय उभे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या संमेलनाचे उद्घाटन सकाळी ९.३० वा. होणार आहे. संमेलनाच्या अध्यक्षा ज्येष्ठ साहित्यिका व उद्योजिका सौ. चद्रलेखा बेलसरे व स्वागताध्यक्ष ज्येष्ठ समाजसेवक सुरेश कोते आहेत.

तसेच ज्येष्ठ समाजसेवक नंदकुमार वाळज उर्फ बाबुजी, समाजसेवक व कृषीअधिकारी श्री. सुरेश लुणावत, मनपा शिक्षण मंडळाच्या निवृत्त केंद्र प्रमुख श्रीमती उज्वला बडदरे, ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य श्याम भुर्के व श्री. दिनकर शिलेदार आणि सेवाभावी उद्योजक श्री. सुशिल बियाणी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# पं.मनीषा साठे यांना 'कला सारथी' पुरस्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** ज्येष्ठ कथक गुरू पं. मनीषा साठे यांना बंगळुरूमध्ये आयोजित 'भाव -२०२५' या भव्य सांस्कृतिक महोत्सवामध्ये 'कला सारथी' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार श्री श्री रविशंकर आणि केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्र शेखावत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.'भाव २०२५' हा भारतीय कला परंपरेला आधुनिक दृष्टिकोनातून सादर करणारा, 'आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटर' येथे आयोजित हा सोहळा दि.२३ ते २६ जानेवारी दरम्यान तीन दिवस चालला. या महोत्सवात भारतातील मान्यवर कलाकारांनी अप्रतिम सादरीकरणे केली. कथक गुरू मनीषा साठे यांच्या नृत्य सादरीकरणाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले.मनीषा साठे यांच्यासमवेत या नृत्य सादरीकरणात शांभवी दांडेकर,तेजस्विनी साठे,सर्वेश्वरी साठे,आलापी जोग यांनी सहभाग घेतला.

**सन्मान**

'मनीषा नृत्यालय'च्या संस्थापक असलेल्या,कथक नृत्याच्या क्षेत्रातील एक प्रेरक व्यक्तिमत्त्व असलेल्या गुरू पं.मनीषा साठे यांनी पाच दशकांहून अधिक कालखंडातील अप्रतिम योगदानाने रसिकांना मंत्रमुग्ध केले आहे.

# नव्या टर्मिनलवरुन ८ फेब्रुवारीपासून 'डिजीयात्रा' सेवा !

**सुविधा**

**काय आहे डीजी यात्रा सेवा**

**प्रवाशांचे चेक इन आणखी वेगाने होणार आहे. त्यामुळे रांगेत थांबण्याचा वेळ वाचणार आहे. या सेवेमुळे कमी वेळेत प्रवाशांना विमानापर्यंत जाता येणार आहे. ही सेवा देशातील सर्वच विमानतळांवर कार्यान्वित आहे. पुणे विमानतळावरील जुन्या टर्मिनलवर देखील ही सेवा सुरू करण्यात आली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनलवर येत्या ८ फेब्रुवारीपासून 'डिजीयात्रा' ही प्रणाली कार्यान्वित होणार असून यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या यांच्या उपस्थितीत या सेवेचा प्रारंभ केला जाणार आहे.

डिजीयात्रा ही सेवा पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जुन्या टर्मिनलवर




कार्यान्वित होती. मात्र नवीन टर्मिनलवर 'डिजीयात्रा'ची सेवा प्रतिक्षेत होती. या संदर्भातील सर्व परवानग्या आणि तांत्रिक प्रक्रिया पूर्ण झाल्या असून ही प्रणाली सेवेसाठी सज्ज होत आहे. देशांतर्गत प्रवाशांसाठी विमानतळ प्रवास सोपा आणि सोयीस्कर करण्यासाठी डिजीयात्रा सुविधा सुरू करण्यात आली आहे.

याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मुरलीधर म्हणाले, 'पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाचा कायापालट होत असून हे विमानतळ अधिकाधिक अद्ययावत सोईसुविधांयुक्त करण्यासाठी विविध पातळ्यांवर काम सुरु आहे. डिजीयात्रा प्रणाली कार्यान्वित करणे हा त्यापैकीच एक भाग आहे. डिजी यात्रा पूर्णपणे बायोमेट्रिक सेल्फ-बोर्डिंग सिस्टम देते, ज्यामुळे प्रवाशांना प्रवेशद्वारापासून विमानात पोहोचेपर्यंत सर्व प्रक्रिया पार पाडता येते'



> 'देशभरात १ डिसेंबर २०२२ पासून डिजीयात्रा सेवेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या प्रणाली अंतर्गत ८० लाखांहून अधिक उपभोक्ते जोडले गेले आहेत. तसेच ४ कोटींहून अधिक वेळचा प्रवास या सेवेतून झालेला आहे. त्यामुळे दिवसेंदिवस या डिजीयात्राचे वापरकर्ते वाढत आहेत. पुणे विमानतळावरुन प्रवास करणाऱ्या डिजीयात्री वापरकर्त्यांची संख्या अधिक असल्याने याचा मोठा फायदा पुणेकरांना विमान प्रवाशांना होणार आहे.
> **- मुरलीधर मोहोळ,** केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक मंत्री

# महापालिकास्तरावर होणार लोकशाही दिन

## आता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**पिंपरी,** : पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन शासनस्तरावर राबविण्यात येतो. लोकाभिमुख गतिमान प्रशासनाच्या दृष्टिने या उपक्रमाचे प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी तसेच महापालिका प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद वाढीसाठी आता महापालिकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार आहे. याबाबतचे परिपत्रक महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या स्वाक्षरीने सामान्य प्रशासन विभागाला निर्गमित केले आहे.

**महापालिका अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणार लोकशाही दिन**

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी आयोजित केला जाणारा हा लोकशाही दिन अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली राबवला जाणार आहे. महापालिका अतिरिक्त आयुक्त (१) यांच्याकडे फेब्रुवारी, मे, ऑगस्ट आणि नोव्हेंबर अशा चार महिन्यांचा कालखंड सोपवण्यात आला आहे. अतिरिक्त आयुक्त (२) यांच्याकडे मार्च, जून, सप्टेंबर आणि डिसेंबर यांच्या चार महिन्यांची जबाबदारी असेल. तर, अतिरिक्त आयुक्त (३) यांच्याकडे एप्रिल, जुलै, ऑक्टोबर आणि जानेवारी अशा चार महिन्यांचे अध्यक्षपद असेल. नागरी सुविधा केंद्राचे विभागप्रमुख हे लोकशाही दिनाचे समन्वय अधिकारी म्हणून कामकाज पाहतील. प्रशासकीय कामकाजाच्या अनुषंगाने आवश्यक तरतुदींचा अंतर्भाव करायचा असल्यास अथवा निर्णय घ्यायचे असल्यास त्याकरीता समन्वय अधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे. लोकशाही दिनाची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देणे, प्राप्त निवेदनावरील कार्यवाहीचे विविधस्तरावरील संनियंत्रण करण्यासाठी समन्वय अधिकाऱ्यांमार्फत आज्ञावली विकसीत केली जाणार आहे. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत लोकशाही दिनाकरीताचे विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच विहित नमुन्यातील अर्ज नागरी सुविधा केंद्राच्या बाहेर लावण्यात येतील. समन्वय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक महिन्याला कार्यक्रमाचे स्थळ आणि वेळ निश्चित करून त्याबाबत नागरिकांना विविध माध्यमांद्वारे अवगत केले जाणार आहे.

**अर्ज स्वीकृतीचे निकष**

लोकशाही दिनासाठी दाखल करावयाच्या अर्जाच्या विहित नमुन्यातील प्रती नागरिकांना सहजतेने विनामूल्य उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी समन्वय अधिकाऱ्यांची असेल. विहित नमुन्यातील अर्ज करताना यामध्ये नमूद तक्रारीवजा निवेदन वैयक्तिक स्वरूपाचे असावे. हा अर्ज अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८ यांच्या नावे असावा. नागरी सुविधा केंद्रांचे विभागप्रमुख तथा समन्वय अधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यातील अर्ज अर्जदाराने १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठवणे आवश्यक राहील. लोकशाही दिनाच्या दिवशी प्रत्यक्ष तक्रार अर्ज स्वीकारला जाणार नाही. महापालिकेच्या सारथी व क्षेत्रीय स्तरावरील जनसंवाद सभेच्या माध्यमातून तक्रार दाखल केली असल्यास तसेच अशा तक्रारीचे निराकरण झाले नसल्यास अशा तक्रारी लोकशाही दिनामध्ये स्वीकारल्या जातील.

**कोणत्या विषयावरील अर्ज स्वीकारले जाणार नाहीत?**

लोकशाही दिनासाठी न्यायप्रविष्ट प्रकरणे, महसूल/अपील प्रकरणे, सेवा व आस्थापना विषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व त्यासोबत आवश्यक कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. अंतिम उत्तर दिलेले आहे अथवा देण्यात येणार आहे, अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज, तक्रार अथवा निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर असे अर्ज लोकशाही दिनाकरीता स्वीकृत करता येऊ शकणार नाहीत. असे अर्ज संबंधित विभागाकडे आवश्यक कार्यवाहीसाठी आठ दिवसांमध्ये पाठवून त्याबाबत अर्जदारास कळविले जाईल.

**लोकशाही दिनास कोणत्या अधिकाऱ्यांनी हजर रहावे?**

महापालिका अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या लोकशाही दिनास जिल्हाधिकारी यांच्यावतीने अपर जिल्हाधिकारी वा निवासी उपजिल्हाधिकारी, वाहतूक शाखेतील वरिष्ठ पोलिस अधिकारी, महापालिकेच्या विभागांचे विभागप्रमुख तसेच प्रशासकीय आवश्यकतेनुसार लोकशाही दिन समन्वयक अधिकाऱ्यांनी आमंत्रित केलेले अधिकारी या लोकशाही दिनास हजर असतील.

**लोकशाही दिन केव्हा होणार नाही?**

निवडणूक कालावधीत आचारसंहिता लागू असताना लोकशाही दिनाचे आयोजन केले जाणार नाही. लोकशाही दिनातील नागरिकांकडून प्राप्त झालेल्या अर्जाची पोचपावती विहित नमुन्यात देण्यात येणार आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज स्वीकृत केल्यानंतर ज्या विभागाशी संबंधित तक्रार आहे, त्या विभागाच्या प्रमुखांकडे संबंधित अर्ज पाठविण्यात येईल. सदर विभागप्रमुख अर्जातील विनंतीबाबत केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह लोकशाही दिनी हजर राहतील. सदर अहवाल, अर्जदाराची विनंती, त्याबद्दलचे नियम, महापालिकेची भूमिका, तरतुदी याबाबींचा विचार करून लोकशाही दिन प्रमुख योग्य निर्णय देतील. लोकशाही दिनाकरीता अस्विकृत करण्यात आलेले अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी आठ दिवसांमध्ये संबंधित विभागाकडे पाठवले जातील.

**लोकशाही दिन कार्यक्रम आढावा**

ज्या आठवड्यात लोकशाही दिन झाला असेल, त्याच आठवड्यात संबंधित महापालिका अतिरिक्त आयुक्त हे लोकशाही दिन कार्यक्रमाचा सविस्तर आढावा अहवाल विभागीय आयुक्त आणि महापालिका आयुक्त यांना पाठवतील. अर्जदाराला अंतिम उत्तर लोकशाही दिनानंतर शक्य तितक्या लवकर एक महिन्याच्या आत देण्यात यावे, असे परिपत्रकात नमुद केले आहे.

### लोकशाही दिनाकरीता विहित नमुन्यातील अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे

- महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त यांच्या नावे अर्ज असावा. महापालिकेच्या सारथी व क्षेत्रीत स्तरावरील जनसंवाद सभेच्या माध्यमातून तक्रार दाखल केली असल्यास त्याचा टोकन क्रमांक अथवा संदर्भ क्रमांकाची प्रत. महापालिकेच्या सारथी व क्षेत्रीय स्तरावरील जनसंवाद सभेच्या माध्यमामधून दाखल तक्रारींबाबत संबंधित विभागप्रमुखाकडून अथवा क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या उत्तराची प्रत अर्जासोबत जोडावी.

### अर्जदारांकरीता सर्वसाधारण सूचना

- समन्वय अधिकाऱ्यांनी लोकशाही दिनाकरीता निश्चित केलेले स्थळी आणि वेळी अर्जदाराने मूळ अर्जासह उपस्थित राहावे. विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस आधी दोन प्रतींत समन्वय अधिकाऱ्यांकडे अर्जदाराने पाठविणे आवश्यक राहील. याबाबींची पूर्तता केली नसल्यास प्रत्यक्ष लोकशाही दिनी अर्ज सादर करता येणार नाही. प्रकरण थेट महापालिका कार्यालयाशी संबंधित असेल तर लोकशाही दिनातील टोकन क्रमांक व त्याची प्रत आवश्यक राहणार नाही.

**जाहीर नोटीस**

खालील तपशिलात नमूद केलेले दस्तावेज श्री. मंगेश शांताराम निकम रा. भैरव नगर, बीएसएनएल ऑफिससमोर, धानोरी, पुणे ४११०१५ यांनी पिरामल कॅपिटल अँड हाउसिंग फायनान्स लिमिटेड यांचेकडे सदर मिळकत तारण ठेवणे चे मान्य व कबुल केले आहे. परंतु मंगेश शांताराम निकम यांचे खालील नमूद सदर मिळकतीचे दस्त त्यांच्या ताब्यातून हरविले आहेत व गहाळ झाले आहेत व अथक प्रयत्न करूनही सदर दस्तावेज हे मिळून आले नाहीत. तरी सदर दस्तावेज हे कोणासही मिळाल्यास अथवा त्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्ता व मो. नं वर संपर्क करून सदर मूळ दस्तावेज वा माहिती द्यावी असे नम्र आवाहन असे.

मिळकतीचे वर्णन- गाव मौजे धानोरी, ता. हवेली, जि. पुणे येथील जमीन सर्व्हे नं. २७ हिस्सा नं. १अ/१/६४ मधील क्षेत्र ०० हे १.८५ आर पैकी असलेले क्षेत्र ९२.५० चौ.मी. व त्यावरील आर. सी.सी. बांधकाम अशी हि मिळकत.

हरवलेल्या दस्तावेजांचा तपशील : श्रीमती. आनंदी रामदास नायडू यांनी श्री. काशिनाथ भाऊ साळुंखे यांचे हक्कात लिहून दिलेले दि. ०६/०२/१९९० रोजीचे मा. दुय्यम निबंधक हवेली क्र. २ यांचे कार्यालयामध्ये अनु क्र. २२२३/१९९० अन्वये नोंदणीकृत झालेले खरेदीखत मूळ दस्त, मूळ पावती व इंडेक्स टू सह.

**ॲड. अजित बापू खामकर**
**ऑफिस नं.३, लक्ष्मीनारायण कॉम्प्लेक्स, चिंचवडगाव**
**मेन बस स्टॉप, चिंचवडगाव, पुणे ४११०३३**
**मो.नं. ८६६८४१६७५७.**

# एलिफंट टँक, इनोव्हेटेक्सद्वारे उद्योजक होण्याची संधी

## डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूट व द डेटा टेक्स लॅब यांचा संयुक्त उपक्रम



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूट, द डेटा टेक लॅब व जस्ट 4 आंत्रप्रेन्युअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने नवसंशोधन करणाऱ्या व भावी उद्योजक होऊ पाहणाऱ्या विद्यार्थांसाठी एलिफंट टँक, इनोव्हेटेक्स या दोन उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रमाचे आयोजन 31 जानेवारी व 1 फेब्रुवारी रोजी संस्थेच्या आकुर्डी येथील कॅम्पस मध्ये करण्यात आले आहे. याबाबतची माहिती डी वाय पाटील विद्यापीठाच्या पीजीडीएम इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. शलाका पारकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी कल्पेश कुवर आणि 'द डेटा टेक्स लॅब' चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमित आंद्रे उपस्थित होते.

या उपक्रमाला आतापर्यंत विविध महाविद्यालयातील साडेसातशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. यामध्ये अडीचशे पेक्षा अधिक विद्यार्थांना इंटर्नशिप ची संधी देखील मिळणार आहे. तर, उद्योजकतेसंदर्भात 100 पेक्षा अधिक नवकल्पना डी. वाय. पाटील प्रतिष्ठानच्या इनक्युबेशन सेंटरमध्ये स्वीकारल्या गेल्या आहेत. हा केवळ एक इव्हेंट नसून विद्यार्थ्यांना उद्योजकतेसाठी सक्षम करण्याचा चळवळीचा भाग असल्याचे त्यांनी सांगितले.

एलिफंट टँक हे उद्योजक विद्यार्थ्यांसाठी अनोखे व्यासपीठ असून तेथे त्यांना त्यांच्या वेगळ्या व्यापारी कल्पना सादर करण्याची स्पर्धा आहे. या सादरीकरणातून विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तज्ञ गुंतवणूकदार आणि मार्गदर्शकासमोर त्यांच्या स्टार्टअप कल्पना सादर करण्याची संधी मिळेल. त्यांचे मूल्यमापन निष्पक्षपणे मानवरहित यंत्रणेद्वारे केले जाईल आणि त्यांना योग्य गुण मिळतील, अशी माहिती आंद्रे यांनी दिली. एलिफंट टँक उद्योजकतेवर लक्ष केंद्रित करते, तर 'इनोव्हेटएक्स' हे विद्यार्थी आणि उद्योग क्षेत्रातील कंपन्यांना इंटर्नशिप, प्रोजेक्ट्स आणि करिअर संधी उपलब्ध करून देण्यासाठी विकसित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

**एलिफंट टँकचे मुख्य वैशिष्ट्येः**

- इनोव्हेटएक्स हे उद्योग आणि विद्यार्थ्यांना जोडणारे व्यासपीठ
- डेटा टेक लॅब्स ने एक प्रगत 'एआय' आधारित प्लॅटफॉर्म विकसित केला आहे. ज्यामुळे दस्तऐवज, व्हिडिओ आणि प्रेझेंटेशन स्वरूपात कल्पनांचे मूल्यमापन कृत्रिम बुद्धिमत्ता संचालित यंत्रणेदारे होईल.
- प्रत्येक कल्पना व्यवहार्यता, स्केलेबिलिटी (उपयुक्तता) आणि नाविन्य यावर आधारित प्रत्यक्ष मूल्यमापन केले जाते.
- विद्यार्थ्यांना, स्टार्टअप संस्थापक, गुंतवणूकदार आणि वरिष्ठ अधिकारी यांच्याकडून थेट मार्गदर्शन मिळते व निवडलेल्या कल्पनांना मार्गदर्शन, इनक्युबेशन आणि निधी मिळण्याची संधी.
- निवडलेल्या कल्पनांना गुंतवणूकदार आणि उद्योग क्षेत्रातील कंपन्यांसमोर सादर करण्याची संधी.
- इनोव्हेटएक्सद्वारे इंटर्नशिप आणि नोकरीच्या संधी उपलब्ध होतात. विविध क्षेत्रातील कंपन्या प्रशिक्षण आणि इंटर्नशिप संधी मिळतात
- थेट प्रकल्प-आधारित शिक्षण विद्यार्थ्यांना वास्तविक उद्योगातील समस्या सोडवण्याची संधी मिळेल.
- उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ विद्यार्थ्यांना करिअर कोचिंग, जॉब मार्केट ट्रेंड्स याबद्दल मार्गदर्शन मिळेल

"आमचे AI-आधारित मूल्यांकन विद्यार्थ्यांच्या कल्पनांना जागतिक मानकांशी जुळवून घेण्यास मदत करते. हे एक नवीन युगातील इनोव्हेशन आहे.
**— डॉ. अमित आंद्रे,** व्यवस्थापकीय संचालक आणि CEO, द डेटा टेक लॅब्स

"एलिफंट टँक विद्यार्थ्यांसाठी केवळ एक स्पर्धा नाही, तर हे त्यांच्यासाठी एक संधी आहे, जी त्यांना उद्योगात मोठे करण्यास मदत करेल"
**— तेजस पाटील,** ट्रस्टी, डी. वाय. पाटील प्रतिष्ठान

"उद्योग आणि शिक्षण एकत्र येणे अत्यंत आवश्यक आहे. इनोव्हेटएक्सच्या माध्यमातून आम्ही विद्यार्थ्यांना उद्योग जगताशी जोडत आहोत.
**— अमित विक्रम,** रिअर ॲडमिरल कॅम्पस डायरेक्टर, डी. वाय. पाटील आकुर्डी

"आंत्रप्रेन्युअरशिप म्हणजे केवळ व्यवसाय सुरू करणे नव्हे, तर समस्यांचे प्रभावीपणे निराकरण करणे आहे. एलिफंट टैंक हा त्यासाठी उत्तम प्लॅटफॉर्म आहे
**— डॉ. शलाका पारकर,** संचालक, डी. वाय. पाटील पीजीडीएम इन्स्टिट्यूट

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक 1) श्री. ज्ञानदेव श्रीरंग जराड 2) श्री. जालिंदर श्रीरंग जराड 3) श्री. दिलिप श्रीरंग जराड 4) श्रीमती इंदुबाई श्रीरंग जराड 5 ) श्री. प्रशांत जालिंदर जराड यांचे मालकीची असुन आजमितीस सदरील मिळकत त्यांचे मालकी हक्काची व ताबेवहिवाटीची आहे. सदरील प्लॉट मिळकती विक्री करणेबाबत आमचे आशिलांसोबत अंतिम टप्प्यात बोलणी चालु असुन आमचे आशिलांना सदरील मिळकती खरेदी देण्याचे ठरवुन त्यापोटी काही रक्कम विसार म्हणुन स्विकारलेली आहे. त्याकामी सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध, निजोखमी असल्याचा भरवसा व खात्री आमचे आशिलांस दिलेला आहे. त्याकामी आमचे आशिलांनी खात्रीसाठी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षीस, लीज, लिन, पोटगी, विसार, करार, साठेखत, खरेदी, जप्ती, वहीवाट, हिस्सा, कुलमुखत्यारपत्र किंवा इतर कोणताही हक्क व अधिकार असलेस अथवा इतर याबाबत काहीही हरकत, तकार, अडचण असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून खालील पत्त्यावर मुळ कागदपत्रानिशी ७ दिवसात (सात दिवसात) आमची लेखी खात्री करुन द्यावी. तसे न केल्यास सदर मिळकतीवर कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हरकत, हक्क व अधिकार नाहीत वा असलेस त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची लेखी अथवा तोंडी तक्रारीबाबत दखल घेतली जाणार नाही.

परिशिष्ट :- तुकडी व जिल्हा पुणे, पोट तुकडी तालुका बारामती व मे. दुय्यम निबंधक अधिकारी, बारामती यांचे हद्दीतील, तथा जिल्हा परिषद पुणे, तालुका पंचायत समिती बारामती यांचे कार्यकक्षेतील गांव मौजे साबळेवाडी ता. बारामती जि. पुणे येथील शेती जमीन मिळकती यांस

अ) गट नंबर २४९ क्षेत्र वहिती ४ हे. ७० आर + पोटखराब ० हे. ५९ आर एकुण ५ हे. २९ आर आकार १ रुपये ३१ पैसे

यांसी चतुः सिमा खालील प्रमाणे
पुर्वेस :- गाडीखेल शिव
दक्षिणेस :- शिव
पश्चिमेस :- गट नंबर २५०,
उत्तरेस :- गट नंबर २४८ व २५२ ची मिळकत.

यापैकी १) श्री. ज्ञानदेव श्रीरंग जराड २) श्री. जालिंदर श्रीरंग जराड ३) श्री. दिलिप श्रीरंग जराड ४) श्रीमती इंदुबाई श्रीरंग जराड यांचे समाईक समाईक मालकीचे व ताबेवहिवाटीस असलेले समाईकातील अविभक्त हिश्याचे संपुर्ण क्षेत्र १ हे. ७६.२५ आर पोटखराब ० है. २१.७५ आर चौ. मी.चौ.मी. + आर चौ.मी. क्षेत्राची शेत जमीन मिळकत

यांसी एकत्रित चतुः सिमा खालील प्रमाणे असे..
पुर्वेस:- शिर्सुफळ उंडवडी डांबरी रस्ता,
दक्षिणेस:- उंडवडी क.प. शिव
पश्चिमेस :- गट नंबर २५०
उत्तरेस :- याच गटातील बबन श्रीरंग जराड यांचे व गटातील इतर सहधारक यांचे क्षेत्र

ब) गट नंबर २५० क्षेत्र वहिती ३ हे. ९६ आर + पोटखराब १ हे. १६ आर एकुण ५ हे. १२ आर आकार १ रुपये १२ पैसे

यांसी चतुः सिमा खालील प्रमाणे
पुर्वेस :- गट नंबर २४९,
दक्षिणेस :- शिव,
पश्चिमेस :- गट नंबर २५१ व गट नंबर २५३,
उत्तरेस :- गट नंबर २५२,

यापैकी १) श्री. ज्ञानदेव श्रीरंग जराड २) श्री. जालिंदर श्रीरंग जराड ३) श्री. दिलिप श्रीरंग जराड ४) श्रीमती इंदुबाई श्रीरंग जराड यांचे ताबेवहिवाटीस असलेले समाईकातील अविभक्त हिश्याचे चौ.मी. + समाईक समाईक मालकीचे व संपुर्ण क्षेत्र १ हे. ०८.९० आर पोटखराब ० हे. ३१.९० आर चौ.मी. याप्रमाणे एकुण १ हे. ४०.८० आर चौ.मी. क्षेत्राची शेत जमीन मिळकत

यांसी एकत्रित चतुः सिमा खालील प्रमाणे असे.
पुर्वेस :- गट नंबर २४९ पैकी क्षेत्र,
दक्षिणेस :- उंडवडी क.प. शिव
पश्चिमेस :- गट नंबर २५१
उत्तरेस :- याच गटातील बबन श्रीरंग जराड यांचे व गटातील इतर सहधारक यांचे क्षेत्र

क) गट नंबर २५१ क्षेत्र वहिती ११ हे. १८ आर + पोटखराब ०३ है. ७८ आर एकुण १४ हे. ९६ आर आकार ३ रुपये ४६ पैसे

यांसी चतुः सिमा खालील प्रमाणे
पुर्वेस:- गट नंबर २५० ते २५३
दक्षिणेस :- शिव,
पश्चिमेस :- गट नंबर ३३२
उत्तरेस:- गट नंबर २५३, २५४, २५५,

यापैकी ज्ञानदेव श्रीरंग जराड यांचे स्वतंत्र मालकीचे संपुर्ण क्षेत्र १ हे. ४०.०० आर चौ. मी.+ पोटखराब ० हे. ४७.०० आर चौ.मी. असे एकुण १ हे. ८७.०० आर चौ.मी. तसेच दिलिप श्रीरंग जराड यांचे स्वतंत्र मालकीचे व ताबेवहिवाटीचे संपुर्ण क्षेत्र १ हे. ३९.०० आर चौ.मी. + पोटखराब ० हे. ४८.०० आर चौ.मी. असे एकुण १ हे. ८७.०० आर चौ.मी. तसेच प्रशांत जालिंदर जराड यांचे स्वतंत्र मालकीचे व ताबेवहिवाटीचे संपुर्ण क्षेत्र १ हे. ४०.०० आर चौ.मी. + पोटखराब ० हे. ४७.०० आर चौ.मी. असे एकुण १ हे. ८७.०० आर चौ.मी. असे एकुण क्षेत्र वहिती ४ हे. १९.०० आर चौ.मी. + पोटखराब १ हे. ४२.०० आर चौ. मी. याप्रमाणे एकुण ५ हे. ६१.०० आर चौ.मी. क्षेत्राची शेत जमीन मिळकत

यांसी एकत्रित चतुः सिमा खालील प्रमाणे असे.
पुर्वेस:- गट नंबर २५० पैकी क्षेत्र,
दक्षिणेस :- उंडवडी क.प. शिव
पश्चिमेस :- गट नंबर ३३२
उत्तरेस :- याच गटातील बबन श्रीरंग जराड यांचे व गटातील इतर सहधारक यांचे क्षेत्र

येणेप्रमाणे बिगरशेती प्लॉट जागा जमीन मिळकत रस्ता वहिवाट वापर करण्याचे हक्कासह त्यातील झाड, झाडोरा, दगड, माती, जल, तृण, काष्ठ, पाला, पाचोळा, इत्यादी तदंगभुत वस्तुसहीत व सर्व इजमेंटचे हक्कासह व अधिकारासह काहीएक राखुन न ठेवता संपुर्ण मिळकत.

कळावे

**ADV. USHATAI MAHENDRA NALE**
**Add:-** Jijau Niwas, A/P Somatne
Phata, Shirgaon Road, Tal - Maval
Dist Pune 410 506
**Mob.** 9922374256

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

# उद्योजकांना मूलभूत सुविधा द्याः अभय भोर



**भोसरी-** एमआयडीसी येथे फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनच्या उद्योजकांची बैठक संपन्न झाली या बैठकीत क प्रभाग अ प्रभाग स्पाईन रोड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक आणि उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते . एमआयडीसी परिसरात भेडसावणाऱ्या समस्यांबाबत आज श्री अभय भोर यांच्या अध्यक्षतेखाली उद्योजकांची बैठक संपन्न झाली. बैठकीत एमआयडीसीतील विविध प्रश्नांवर चर्चा झाली अनेक उद्योजकांनी आपल्याला भेडसावणाऱ्या समस्या या ठिकाणी मांडल्या. यावेळी एमआयडीसीतील कचरा समस्या वाहतूक समस्या ड्रेनेज सुविधा रोड लाईट ई.टी.पी प्लांट चोऱ्या आणि अतिक्रमणे चौक विस्तारीकरण याबाबत चर्चा करण्यात आल्या अध्यक्ष श्री अभय भोर यांनी महानगरपालिकेला येत्या दहा दिवसात उद्योजकांच्या प्रश्नांवर उत्तर नाही मिळाले तर महानगरपालिकेत भव्य आंदोलन घेणार असल्याचा इशारा दिला.

एमआयडीसी परिसराकडे शासनाच्या सर्वच विभागांचे पूर्ण दुर्लक्ष झाले असून फक्त कर रूपी पैसा जमा करण्याचे काम चालू आहे उद्योजकांच्या समस्या दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच चालल्याच्या दिसून येत आहे उद्योजकांना अनेक सोयी सुविधा या पैसे देऊन विकत घ्याव्या लागतात आणि परिसराला अतिक्रमण मोठ्या प्रमाणात झाले असून या ठिकाणीउद्यान विभागाच्या ढिसाळ कारभारामुळे परिसरात लाईटच्या खांबांवर आलेल्या फांद्यामुळे उजेड पडत नाही कित्येकदा सांगून देखील उद्यान विभागाचे दुर्लक्ष आहे या ठिकाणांच्या अनेक चौकांना लोकांनी वेगवेगळी नावे दिली आहेत.

याच्याकडे अप्रभात अधिकाऱ्यांचे देखील दुर्लक्ष असल्याचे सांगण्यात आले अनेक चौकांमध्ये विस्तारीकरण करणे गरजेचे असून उद्योजकांना वाहतुकीच्या समस्येला मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते या ठिकाणी बंद पडलेल्या टपऱ्या बंद पडलेली वाहने तसेच रस्त्यावर अनधिकृत पणे अनेक गैरव्यवहार भंगारची दुकाने चालू आहेत त्यामुळे चोऱ्यांच्या प्रमाणामध्ये मोठी वाढ झाली असल्याचे उद्योजकांनी सांगितले खूप मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत .पिंपरी चिंचवड शहरातील उद्योग टिकवायचे असतील तर महानगरपालिका एमआयडीसी पोलीस विभाग या सर्वच विभागांनी पुढाकार घेऊन उद्योजकांच्या समस्या सोडवाव्यात असे वक्तव्य केले या ठिकाणी क प्रभाग अधिकारी श्री कांबळे साहेब यांनी महानगरपालिकेतर्फे त्वरित याबाबत पावले उचलून लवकरच बैठक लावण्यात येईल आणि या बैठकीत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून यावरील उपाययोजना करण्यात येणार असल्याचे सांगितले यावेळी भोसरी स्पाईन रोड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक श्री किरण पाठारे साहेब यांनी परिसरामध्ये उद्योजकांना मार्गदर्शन केले आणि विविध उपायोजनांबाबत चर्चा केली तसेच उद्योजकांना कोणत्याही स्वरूपाचा त्रास जाणवल्यास त्वरित पोलीस स्टेशनला सांगितल्यास त्यावर कठोरात कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा आश्वासन दिले. या ठिकाणी एमआयडीसीतील अनेक प्लॉट धारक मॅन्युफॅक्चरर कंपन्यांचे उद्योजक उपस्थित होते.

## वधू - वर परिचय मेळावा

**पिंपरी :** मराठा समाजातील अविवाहित तरुण-तरुणींसाठी जोडी जमवा वधू-वर सूचक केंद्राच्यावतीने वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या रविवारी (दि. ०२ फेब्रुवारी) रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत हा मेळावा तळेगाव दाभाडे येथील वैशाली मंगल कार्यालयात होणार आहे. या मेळाव्याचे उद्घाटन आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते होईल, अशी माहिती जोडी जमवा वधू - वर सूचक मंडळाचे अध्यक्ष तुषार क्षीरसागर यांनी दिली.मंडळातर्फे वधू-वर परिचय मेळावा दरवर्षी आयोजित केला जातो. मराठा समाजातील विवाहेच्छुक युवक-युवती, तसेच त्यांच्या पालकांना अनुरूप स्थळ शोधून विवाह जुळवण्याची सुवर्णसंधी या निमित्ताने मिळते. या मेळाव्यामध्ये युवक - युवतींना आयुष्याचा जोडीदार कसा असावा, अपेक्षा या संदर्भात मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# मेट्रोच्या सुरक्षा रक्षक कंपनीचा ठेका रद्द करा!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**निगडी-** पिंपरी ते निगडी मेट्रो रेल्वे प्रकल्प काम सुरू असून त्या ठिकाणी खाजगी सुरक्षारक्षक कंपनी अनंत स्काय इन्फाटेक एजंसी ह्याचा सुरक्षा ठेका रद्द करण्यात यावा अशी मागणी पिंपरी चिंचवड भाजपाचे चिटणीस सचिन काळभोर यांनी केली आहे.

पुणे मेट्रोचे प्रकल्प अधिकारी श्रावण हर्डीकर यांना या संदर्भात सचिन काळभोर यांनी निवेदन दिले आहे. त्यात म्हटले आहे की, पिंपरी ते निगडी मेट्रो रेल्वे प्रकल्प काम सुरू असलेल्या ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक कंपनीचे कामगार गुंड प्रवृत्तीचे असून त्या खाजगी सुरक्षा रक्षकांनी निगडी येथील भक्ती शक्ती ह्या ठिकाणी मेट्रो रेल्वे प्रकल्प काम सुरू असलेल्या ठिकाणी मेट्रो प्रकल्प काम करणारे अधिकारी व कर्मचारी ह्यांना मारहाण केली होती. त्या संदर्भात निगडी पोलिस स्टेशन ह्या ठिकाणी फौजदारी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्प काम सुरू असलेल्या ठिकाणी मेट्रो रेल्वे ह्यांनी खाजगी बाउन्सर नियुक्ती केली असून सदर बाउन्सर हे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले असून त्याचे चरीत्र पडताळणी प्रमाणपत्र नॉन क्रिमिनल दाखला पोलिस आयुक्त पिंपरी चिंचवड शहर ह्यांच्या मार्फत घेण्यात यावा. मेट्रोच्या सुपरवायझरने



एका ट्रक चालकासोबत मिळून मेट्रो साईटवरून २० लाखांचे लोखंड चोरी केले होते. याप्रकरणी दोघांना अटक करण्यात आली होती. ही घटना १० सप्टेंबर २०२४ ते २५ जानेवारी २०२५ या कालावधीत भक्ती-शक्ती ते खंडोबा माळ चौक यादरम्यानच्या मेट्रो मार्गावर घडली आहे. सुपरवायजर हरिश्चंद्र सुनील कुमार (रा. निगडी), ट्रकचालक महंमद अनिल पटेल (रा. मोशी) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी रवी रेडियार यांनी निगडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पिंपरी-चिंचवड शहरात पिंपरी ते निगडी या दरम्यान मेट्रो मार्गिकेचे काम सुरु आहे. या कामावरील साहित्यावर लक्ष ठेवण्यासाठी मेट्रोने फिर्यादी यांची अनंत स्कायइन्फ्राटेक एजन्सी नेमली आहे. या एजन्सी करून आरोपी हरिश्चंद्र याला सुपरवायजर म्हणून नेमण्यात आले होते. हरिश्चंद्र याने ट्रक चालक महंमद याच्यासोबत मिळून भक्ती-शक्ती चौक ते खंडोबा माळ चौक या दरम्यानच्या मेट्रो साईटवरून तब्बल २० लाख रुपये किमतीचे ४० टन लोखंड चोरी केले. मेट्रोच्या पाहणीमध्ये हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुळ ठेकेदार ह्याचे सुरक्षा रक्षक तैनात नसून त्या ठिकाणी उपठेकेदार ह्यांनी बोगस खाजगी ठेकेदार मार्फत सुरक्षा रक्षक व बाउन्सर तैनात करण्यात आले असून ते गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती असून त्या संदर्भात पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प अधिकारी श्रावण हर्डीकर तसेच इतर अधिकारी ह्यांनी ताबडतोब दखल घेऊन कारवाई करण्यात यावी अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे.

संपादकीय विशेष

# आणखी एक अर्थसंकल्प

गेल्या तिमाहीमध्ये देशाचा उत्पादनवृद्धीचा म्हणजेच जीडीपीचा दर 5.4 टक्क्यांपर्यंत खाली आला होता. भारतातील मध्यमवर्गाचा प्रचंड विस्तार झाला असून या वर्गाकडून बाजारपेठेतील वस्तूंची मागणी कमी नोंदवली गेली. साबण, तेल, पाव, अंडी, दूध अशा सर्व वस्तू महाग झाल्या आहेत. त्या परवडेनाशा झाल्याने एकूण मागणी घटली. त्यामुळे यावेळी अर्थसंकल्पातून मध्यमवर्गीयांवरील करांचे ओझे कमी केले जाण्याची शक्यता आहे. वार्षिक उत्पन्न 15 लाख रुपये असलेल्यांवरील कर कमी करण्याचा विचार केला जाऊ शकतो. शिवाय करदात्यांच्या हातात अधिक खर्च करण्यायोग्य पैसे शिल्लक रहावेत म्हणून मूलभूत सूटमर्यादा 50 हजार रुपयापर्यंत वाढवायला हवी. ज्येष्ठ नागरिकांसाठी करसवलतीची मर्यादा वाढवणे जरुरीचे आहे. तसेच प्राप्तिकर कायद्याच्या कलम 24 अंतर्गत गृहकर्जावरील व्याजावर असलेली दोन लाख रुपयांची सूट मर्यादा तीन लाख रुपयांपर्यंत वाढवण्यास हरकत नाही. कलम 80डी अंतर्गत 60 वर्षांपेक्षा कमी वयाच्या व्यक्तींना आरोग्य विम्याच्या प्रीमियमवर 25 हजार रुपये तर ज्येष्ठ नागरिकांना 50 हजार रुपयांची वजावट मिळते. ही मर्यादा अनुक्रमे 50हजार आणि 75 हजार रुपयांपर्यंत वाढवण्यास हरकत नाही. तसे झाल्यास सामान्यांचा आरोग्यावरील खर्चाचा ताण कमी होईल. सरकारने प्राप्तिकर अधिक सुटसुटीत गेला पाहिजे. मागच्या अर्थसंकल्पात सरकारने रोजगारासाठी प्रधानमंत्री योजना सुरू केली होती. या वेळच्या अर्थसंकल्पात देखील बेकारी कमी करण्यासाठी काही ना काही उपाय योजावे लागतील. अपेक्षित विकासदर साध्य न झाल्याने देशात रोजगारनिर्मितीचा वेगही मंदावला आहे.






अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेत येताच 'मेक अमेरिका ग्रेट' आणि 'अमेरिका फर्स्ट' अशा घोषणा दिल्या आहेत. ट्रम्प यांच्या दुसऱ्या पर्वात भारत-अमेरिका संबंध आणखी वरील टप्प्यावर पोहोचतील, अशी अपेक्षा भारतीय उद्योगपतींनी व्यक्त केली आहे. परंतु ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या मालावर सणसणीत कर किंवा शुल्क लादण्याची घोषणा केली आहे. त्याचा अमेरिकेत केल्या जाणाऱ्या भारताच्या निर्यातीला फटका बसू शकतो. मग भारतातील रोजगारावरही प्रतिकूल परिणाम होईल. हे विचारात घेऊन अर्थमंत्र्यांना अगोदर पूर्वतयारी करून ठेवावी लागेल. रोजगारनिर्मितीचा विचार करताना डिजिटल क्रांतीमुळे होणाऱ्या बदलांचा विचार करावा लागेल. या क्रांतीमुळे अकाउंटिंग, वित्तीय, कायदेशीर अशा अनेक व्यावसायिक सेवा दूर बसून करता येऊ लागल्या आहेत. बाहेरच्या देशांमधील अशी अनेक कामे भारतातून केली जातात. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये अर्थव्यवस्थेत नवनवीन क्षेत्रांमध्ये संधी निर्माण झाली आहे. जगामध्ये एकूण निर्यात उलाढालीच्या 42 टक्के वाटा हा सेवाक्षेत्राचा आहे. त्यामध्ये डीडीएस अर्थात डिजिटली डिलिव्हर्ड सर्व्हिसेसचा हिस्सा 56 टक्के आहे. येत्या पाच वर्षांमध्ये हा वाटा 66 टक्क्यांपर्यंत वाढणार आहे. एआय किंवा कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि ऑटोमेशनमुळे ही प्रक्रिया अधिक गतिमान होणार आहे. यापूर्वीच्या काळात आयटी आणि आयटीईएस क्रांतीमुळे करोडो लोकांना रोजगार मिळाला. युरोप-अमेरिकेमध्ये लाखो भारतीय या क्षेत्रात काम करत होते आणि आहेत. त्याचप्रमाणे भारतातूनही या सेवा दिल्या जात आहेत.

भारतातील औद्योगिक धोरणांचा भर मोठ्या कंपन्यांवर असतो. परंतु मध्यम आकाराच्या म्हणजेच शंभर ते एक हजार कोटी रुपये इतक्या वार्षिक उलाढालकक्षेत असलेल्या कंपन्यांमधून होणारी निर्यात ही जास्त आहे. जर्मनी, जपान, फ्रान्स, इटली या देशात या क्षेत्रातच जास्त प्रमाणात रोजगार तयार होतो. चीनने 'लिटल जायंट्स' या नावाने अशा मध्यम आकाराच्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित करून मोठी मजल मारली आहे. अशा कंपन्यांना संशोधन आणि विकासासाठी मदत करणे, अनुदान देणे या गोष्टी करणे आवश्यक आहे. चीनमध्ये ठराविक क्षेत्रात जागतिक कर्तबगारी सिद्ध करू शकणाऱ्या एक हजार मध्यम कंपन्यांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. या कंपन्यांचा ग्लोबल व्हॅल्यू चेन, म्हणजे जागतिक पुरवठा साखळीत ठसा उमटू शकेल. भारताने अशा प्रकारचा उपक्रम सुरू केल्यास फायदेशीर ठरेल. आज रिअल इस्टेट क्षेत्र प्रगतीशील सुधारणांची अपेक्षा करत आहे. त्यामुळे गृहखरेदीदार आणि उद्योगांना फायदा होऊ शकतो. या वर्षी, एकल-विंडो क्लिअरन्स आणि उद्योग परिस्थितीच्या सामान्य अपेक्षेपलीकडे मागणी आहे. रिअल इस्टेट क्षेत्राच्या म्हणण्यानुसार सरकारने गृहकर्जावरील व्याजाच्या पेमेंटसाठी कपात मर्यादित केली पाहिजे. आर्थिक वर्ष 2025-26 चा अर्थसंकल्प उपभोग मागणी आणि भांडवली खर्च वाढवून वित्तीय एकत्रीकरण फ्रेमवर्कवर लक्ष केंद्रित करणारा असायला हवा.

2021-22 च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात केंद्राने आर्थिक वर्ष 2025-26 पर्यंत वित्तीय स्थिती मजबूत करण्याचे लक्ष्य ठेवले होते. त्यानुसार राजकोषीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या (जीडीपी) 4.5 टक्क्यांवर आणण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. निश्चित लक्ष्यांचे पालन केल्याने आर्थिक आघाडीवर आत्मविश्वास निर्माण होतो. विविध पक्षांसाठी, विशेषतः गुंतवणूकदारांसाठी अर्थव्यवस्थेच्या वित्तीय स्थितीचे मूल्यांकन होणे महत्त्वाचे असते. यामुळे महागाई कमी होण्यासही मदत होते. येत्या अर्थसंकल्पात परवडणारी कर्जे आणि उत्पादन नवोपक्रमासाठी समर्थन वाढवून 'एसएमई'च्या सक्षमीकरणावर धोरणात्मक लक्ष केंद्रित केले जाईल, अशी शक्यता आहे. 'एसएमई' व्यवसायांसाठी मूल्य निर्माण करण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी मजबूत करणे महत्त्वाचे आहे. अर्थसंकल्प अशा उपायांना प्राधान्य देईल. त्यामुळे त्यांना ऑपरेशन्स वाढवण्यास, पर्यावरणास अनुकूल उपायांचा अवलंब करण्यास आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करण्यास 'एसएमई' व्यवसाय सक्षम होऊ शकतील. आगामी केंद्रीय अर्थसंकल्पात डॉक्टरांची संख्या वाढवण्यावर भर दिला जाऊ शकतो. कर्करोगासारख्या आजारांवर उपचार करणे खूप महागडे आहे. मोठ्या लोकसंख्येसाठी रुग्णालयांची संख्या खूपच कमी आहे. अशा परिस्थितीत सरकार या क्षेत्रावर लक्ष केंद्रित करू शकते. या निमित्ताने अर्थसंकल्पाच्या माध्यमातून सरकारला सामान्यजनांच्या आशा-अपेक्षांचा वेध घेता येणार आहे. त्यांना दिलासा देता येणार आहे. तसा तो दिल्यास अर्थसंकल्प अर्थपूर्ण ठरु शकेल.


# प्रगतीचे चित्र आणि वास्तव

**देशातील बँकांची नफ्याची कामगिरी सध्या वळणबिंदूवर असून २०२५- २६ मध्ये त्यांच्या नफ्याचे प्रमाण मंदावेल. वाढत्या थकित कर्जांमुळे त्यांचे उत्पन्नही घटेल, असा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज'ने आपल्या अहवालात व्यक्त केला आहे. कृषी, वनसंपत्ती, व्यवसाय, मासेमारी या क्षेत्रांचा विकास ४.७ टक्के गतीने होण्याची अपेक्षा होती. तो एक टक्क्याने घसरून ३.८ टक्के इतकाच होईल, असा ताजा अंदाज आहे.**

अहवाल

रा

हेमंत देसाई
ज्येष्ठ पत्रकार



भारतीय अर्थव्यवस्थेवर पुन्हा एकदा नरमाईचे मळभ आले आहे, असे दिसते. देशातील बँकांची नफ्याची कामगिरी सध्या वळणबिंदूवर असून २०२५-२६ मध्ये त्यांच्या नफ्याचे प्रमाण मंदावेल. वाढत्या थकित कर्जांमुळे त्यांचे उत्पन्नही घटेल, असा अंदाज 'इंडिया रेटिंग्ज' या संस्थेने आपल्या अहवालात व्यक्त केला आहे. गेल्या डिसेंबरमध्ये जीएसटीच्या संकलनातही उतरण आली. कृषी, वनसंपत्ती, व्यवसाय, मासेमारी या क्षेत्रांचा विकास ४.७ टक्के गतीने होण्याची अपेक्षा होती. तो एक टक्क्याने घसरून ३.८ टक्के इतकाच होईल, असा ताजा अंदाज आहे. उद्योगक्षेत्राचा विकासदर ९.५ टक्के अपेक्षित होता, तो प्रत्यक्षात ६.१० टक्के इतकाच असणार आहे. सेवाक्षेत्राची वाढदेखील अपेक्षित अशी नाही. भारताची चौफेर प्रगती सुरू असून देशात जणू सुवर्णयुग आले आहे, असा कितीही प्रचार केला, तरी वास्तव वेगळेच आहे. मुळात सरकारचा भांडवली खर्चच अपेक्षित प्रमाणात होत नाही, असे आढळले आहे. डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेच्या रोजगारनिर्मितीत अनपेक्षितपणे वाढ झाली आहे. त्यामुळे आता व्याजदरकपातीची गरज नसल्याने जगभरच्या बाजारात खळबळ माजली आहे. म्हणजेच यापुढे अमेरिकेतील म्युच्युअल फंड, वित्तसंस्था यांना मायदेशात गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भारतासह विकसनशील देशांमधील बाजारपेठांमध्ये भांडवल गुंतवणूक करण्याची गरज नाही. त्यातच देशांतर्गत अर्थव्यवस्था वाढीचा दर मागच्या चार वर्षातील सर्वात कमी, म्हणजे ६.४ टक्के राहील असा होरा आहे.

दरम्यान, भारतातील अनेक कंपन्यांच्या तिमाही कामगिरीने निराशा केली आहे. खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वधारून ८० डॉलर प्रति बॅरल दरावर गेल्या आहेत. डॉलरच्या तुलनेत रुपया 86 रुपयांच्या पार गेला आहे. अमेरिकेने रशियन तेलावर निर्बंध लादल्यानंतर, कच्च्या तेलाच्या किमती गेल्या तीन महिन्यांमधील विक्रम प्रस्थापित करत आहेत. अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या पहिल्या टर्ममध्ये भारताला अमेरिकन 'हार्ले डेव्हिडसन' मोटरसायकलवरील शुल्क हटवण्यास सांगितले होते. भारतात आयात होणाऱ्या अमेरिकन मालावर अवाजवी शुल्क लादले जाते, ही ट्रम्प यांची तक्रार आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात 200 अब्ज डॉलर्सचा व्यापार होतो. ट्रम्प यांनी अमेरिकेत आयात होणाऱ्या भारतीय मालावर अतिरिक्त कर लादल्यास, मोठे नुकसान होऊ शकते. त्याच वेळी खनिज तेलाचे दर भडकल्यामुळे त्याच्या आयातीसाठी आपल्याकडे डॉलरची मागणी वाढली आहे. आयातीसाठी जादा डॉलर मोजावे लागल्यामुळे व्यापारतूट फुगणार आहे. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत चालू खात्यावरील तूट विक्रमी अशा तीन टक्क्यांपर्यंत जाण्याची भीती आहे. भारत गरजेच्या 85 टक्के तेलाची आयात करतो. आयातीवरील खर्च जेवढा वाढतो, तेवढा विदेशी गंगाजळीवरील ताणही वाढतो.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीमधील भारताचा चलनसाठाही ४२ दशलक्ष डॉलरने घसरून, पाच अब्ज डॉलर इतकाच आहे. देशाच्या विकासात परकीय चलनाचे अनन्यसाधारण महत्त्व असते. देशात परकीय चलन किती आहे, यावरूनच रिझर्व्ह बँकेचे चलनविषयक धोरण ठरत असते. आपल्याकडे परकीय चलनाचा साठा जेवढ्या प्रमाणात असेल, तेवढ्या अधिक प्रमाणात रुपया इतर चलनांच्या तुलनेत मजबूत होतो. परकीय चलनाच्या साठ्यात घट झाल्यास रुपयाच्या मूल्यातदेखील घट होते. आपल्याकडे मोठ्या प्रमाणात विदेशी चलन असेल तर विदेशातून कोणतीही वस्तू आयात करताना समस्या उद्भवत नाहीत. विदेशी गंगाजळीची घागर भरलेली असेल, तर रुपया मजबूत होऊन महागाईही नियंत्रणात राहते. १९९० - ९१ मध्ये आठवडाभर पुरेल इतके विदेशी चलनही आपल्याकडे नव्हते. १९५७ - ५८ मध्येही भारतापुढे परकीय चलनाचे संकट निर्माण झाले होते; पण १९९१ मध्ये त्याची परिणती देशाच्या आर्थिक व्यवस्थापनाचाच बोजवारा उडण्यात होऊ लागली होती. नरसिंह राव सरकारमध्ये अर्थमंत्री झाले, तेव्हा डॉ. सिंग यांचे विनिमय दर नियंत्रणात आणण्यास प्रथम प्राधान्य होते. रुपया खूपच भडकला होता आणि



तो खाली आणणे आवश्यक होते. रुपयाचे अवमूल्यन करणे ही तेव्हा तरी भारतात राजकीय समस्या असे. कारण त्यामुळे लगेच 'देश परकीय शक्तींना विकला गेला आहे' अशी ओरड व्हायची. त्या वेळी राव सरकारकडे बहुमत नव्हते. सरकारने विश्वासदर्शक ठरावही मंजूर करून घेतला नव्हता. पण तोपर्यंत थांबता येणार नाही, असे डॉ. मनमोहनसिंग यांनी पंतप्रधान राव यांना सांगितले.

या वळणावर राष्ट्रपतींचा व मंत्रिमंडळाचा विरोध असूनही अधिकृत घोषणा न करता त्यांनी रुपयाचे २५ टक्क्यांनी अवमूल्यन करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आपला पहिला अर्थसंकल्प राजीव गांधी यांच्या प्रेरक स्मृतीला अर्पण करत डॉ. सिंग म्हणाले होते, 'अतिशय कठीण अशा सरत्या वर्षाने देशापुढे प्रचंड आव्हाने उभी करून काही धाडसी पावले उचलण्याची गरज स्पष्टपणे दाखवून दिली आहे. विदेशी चलनाच्या संकटामुळे टिकाऊ विकास कितपत होऊ शकेल, अशी समस्या निर्माण झाली आहे.' त्यावेळी नरसिंह राव सरकारने 'आपल्याकडे डॉलरचा साठा कमी असेल तर आयातीला कात्री लावा' असे पठडीबद्ध धोरण राबवले नाही. आयातीमध्ये कपात करण्याऐवजी, निर्यातविकासावर भर दिला गेला. रुपयाचे अंशतः परिवर्तन, आयात परवाना पद्धत रद्द करणे, बँकांच्या वैधानिक रोखता प्रमाणात घट, कंपन्यांना परदेशातल्या भांडवली बाजारात प्रवेश करण्यास मंजुरी, भारतीय शेअर बाजारात परकीय गुंतवणुकीला मान्यता, सेबीला जादा अधिकार, वित्तीय क्षेत्राच्या पुनर्रचनेबद्दलच्या नरसिंहम समितीच्या अहवालाची अंमलबजावणी, शेअरविक्रीच्या किमतीवरचे तसेच 'फेरा'वरचे निर्बंध हटवणे असे एकापाठोपाठ एक साहसी निर्णय घेण्यात आले. डॉ. सिंग यांनी देशाला बाजारचलित अर्थव्यवस्थेकडे नेताना कमालीची धडाडी दाखवली. परदेशी व्यापार, विदेशी गुंतवणूक आणि विनिमयदर व्यवस्थापन या तिन्हींबाबतच्या धोरणात त्यांनी मूलगामी बदल केले. त्यामुळे १९९२-९३ पासून देशाच्या विदेश व्यापार संतुलनात स्थैर्य निर्माण झाले.

दरम्यान, अमेरिकेच्या डोक्यावरचे कर्ज ३६ ट्रिलियन डॉलरच्या पुढे गेले आहे. हे प्रमाण त्यांच्या जीडीपीच्या १२५ टक्के आहे. पुढील दशकापर्यंत त्या देशाचे कर्ज ५४ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचेल, असा अंदाज आहे. या कर्जाच्या व्याजापोटी अमेरिकेला रोज दोन अब्ज डॉलर खर्च करावे लागतात; मात्र त्याच वेळी अमेरिकेची अर्थव्यवस्था अधिकाधिक सशक्त होत असून आणखी व्याजदर कपात होण्याची शक्यता मावळली आहे. अर्थव्यवस्थेत प्राण फुंकायचे असतात, तेव्हा व्याजदरांना कात्री लावून व्यापारी आणि उद्योजकांना स्वस्तात कर्जे उपलब्ध करून दिली जातात; पण डिसेंबर 2024 मध्ये अमेरिकेच्या रोजगारनिर्मितीत अनपेक्षितपणे वाढ झाली. त्यामुळे आता व्याजदर कपातीची गरज नसल्याने, जगभरच्या बाजारात खळबळ माजली आहे. अमेरिकी रोख्यांवरील परताव्याचा दरही वाढून पाच टक्क्यांपार गेला आहे. यावरून तेथे व्याजदरात अजिबातच घट होणार नसल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. म्हणजेच यापुढे अमेरिकेतील म्युच्युअल फंड, वित्त संस्थांना मायदेशात गुंतवणूक केल्यासही त्यावर चांगला परतावा मिळू शकेल. त्यासाठी त्यांना भारतासह विकसनशील देशांमधील बाजारपेठांमध्ये भांडवल गुंतवणूक करण्याची गरज नाही. एवढेच नव्हे तर, भारतात विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी गुंतवलेले भांडवल वेगाने माघारी घेऊन जाण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. विदेशी गुंतवणूकदारांनी जानेवारीतच आतापर्यंत सुमारे २२ हजार कोटी रुपयांतमधून अधिक समभागांची विक्री केली.

भारताच्या देशांतर्गत अर्थव्यवस्था वाढीचा दर मागच्या चार वर्षांमधील सर्वात कमी म्हणजे ६.४ टक्के राहील, असा अंदाज आहे. भारतातील अनेक कंपन्यांच्या तिमाही कामगिरीने निराशा केली आहे. त्यातच खनिज तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमती पुन्हा वधारून ८० डॉलरवर गेल्या. डॉलरच्या तुलनेत रुपया गेल्या सोमवारी ८६ च्या पार गेला. अमेरिकेच्या बाजारातील घडामोडींचे भारतात तीव्र पडसाद उमटतात. याचे कारण दोन्ही देशांचे आर्थिक संबंध पूर्वीपेक्षा घट्ट झाले आहेत. त्यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टीमध्ये दीड-पावणेदोन टक्क्यांची घसरण झाली. सुमारे ५०८ समभागांचे भाव त्यांच्या वार्षिक नीचांकाच्याही खाली कोसळले. परकीय गंगाजळी दहा महिन्यांच्या नीचांकी स्तरावर म्हणजे ६३४ अब्ज डॉलरवर आली. रिझर्व्ह बँकेकडून ठोस पावले उचलली जात नाहीत, तोपर्यंत ही घसरण सुरू राहील; पण घटलेली परकीय गंगाजळी पाहता रिझर्व्ह बँकेपुढे पर्यायही मर्यादितच आहेत.

---

रोजगारवाटा

## व्यवसाय सुरू करताना...

दोस्तांनो, सद्यस्थितीत नोकरीच्या क्षेत्रातील स्पर्धा बरीच वाढली आहे. शिवाय या क्षेत्रात आवश्यक त्या प्रमाणात संधी उपलब्ध होत नाही. या तसंच अन्य काही कारणांमुळे आजकाल स्वतंत्र व्यवसायाकडील कल वाढला आहे. मात्र व्यवसायाचा पाया रचताना काही चुका होऊ शकतात. म्हणूनच व्यवसाय सुरू करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...

✲ बरेच जण आपल्या उत्पादनाचं मार्केटिंग करत नाहीत. मात्र मार्केटिंगवर पैसे वाचवल्यामुळे तुमची प्रसिद्धी होऊ शकत नाही. सुरूवातीच्या टप्प्यात एकूण उत्पन्नाच्या १० ते २० टक्के रक्कम मार्केटिंगवर खर्च करायला हवी. थोडं सुस्थापित झाल्यावर हा खर्च पाच ते दहा टक्क्यांवर आणता येईल.



✲ उद्योजकांची टीम चांगली हवी. चुकीच्या लोकांची निवड केल्यामुळे तुमचं बरंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे गुणवान, कुशल आणि कल्पन लोकांची निवड करा. यामुळे तुमच्या व्यवसाय वृद्धीला गती मिळू शकेल.

✲ बरेच पण 'परफेक्शन'च्या मागे लागतात. एखादं ॲप तयार करताना बराच वेळ घालवतात. त्याऐवजी आपल्या उत्पादनाची गुणवत्ता सुधारण्यावर भर द्यायला हवा. उत्पादनाची गुणवत्ता सुधारली की तुमचं उत्पादन लोकप्रिय होईल.

खेचाखेची

## अशीही घाई

एकदा एक माणूस बसमध्ये उभा होता. त्या स्थितीत तो वारंवार आपल्या हातातील घड्याळाकडे पहात होता. बसमध्ये चार–पाच बाकं मोकळी असताना हा प्रवासी उभं राहून प्रवास करत असल्याचं पाहून कंडक्टर जवळ आला आणि म्हणाला, 'अहो, आपण उभे का? मोकळ्या सीटवर बसून घ्या ना?'

त्यावर प्रवासी म्हणाला, 'माझ्याकडे बसायला अजिबात वेळ नाही. लवकर जायचं आहे.'

## जीके टेस्ट

कोणी कलंदर चित्रांच्या माध्यमातून आपल्याला दिसलेला निसर्ग दाखवण्याचा प्रयत्न करतो. झारिया फोरमन या चित्रकर्तीनं ग्रीनलँडमधील एक नितांतसुंदर स्थळ आपल्या चित्रातून दाखवलं आहे. भटकंतीचं वेड असलेली ही चित्रकर्ती देशोदेशीच्या दुर्गम भागांमध्ये फिरते आणि तेथील अनोखा नजारा छायाचित्रीत करते. स्वस्थळी परतल्यावर त्यातील भावलेली छायाचित्र रंगांच्या सहाय्यानं रेखाटण्याचा तिचा प्रयत्न असतो. यासाठी ती कोणत्याही प्रकारच्या ब्रशचा अथवा अन्य उपकरणांचा आधार घेत नाही. केवळ रंग आणि बोटांच्या सहाय्यानं तिची ही चित्रसाधना सुरू असते.

---




राशीभविष्य

- **मेष** : ताप, आम्लपित्ताबाबत काळजी घ्यावी. खेळाडू, कलाकारांना संधी लाभतील. प्रवासात काळजी घ्या.
- **वृषभ** : नोकरी–व्यवसायात मनाजोगी प्रगती होईल. प्राप्तीचं प्रमाण वाढेल. स्पर्धांमध्ये उत्तम यश मिळेल.
- **मिथुन** : महत्त्वाची कामं होतील. पूर्वीच्या गुंतवणुकीतून लाभ होईल. नोकरीच्या अपेक्षित संधी लाभतील.
- **कर्क** : व्यवसायात अधिक प्राप्ती होईल. सरकारी कामं मार्गी लागतील. यंत्र, उपकरणं जपून हाताळावीत.
- **सिंह** : व्यवसायात नैराश्य वाटू लागेल. व्यवसायात मोठं यश मिळेल. सहल, करमणूक आदींचा लाभ होईल.
- **कन्या** : अपेक्षित सुवार्ता कानी येईल. मित्रमंडळींकडून उत्तम लाभ होईल. प्रवासात प्रकृतीस त्रास संभवतो.
- **तूळ** : व्यावसायिक येणी वसूल होतील. विवाहाच्या प्रयत्नातील विलंब दूर होईल. लहान मुलांची चिंता राहील.
- **वृश्चिक** : मुलाखतींमध्ये उत्तम यश मिळेल. व्यावसायिक कर्जाची परतफेड होईल. नातेवाईकांचा रोष संभवतो.
- **धनु** : व्यावसायिक कामांचा वेग वाढेल. कौटुंबिक बाबतीत सुवार्ता कानी येईल. मुलांचा उत्कर्ष साधू शकाल.
- **मकर** : अचानक धनलाभाचे योग आहेत. खेळाडू, कलावंतांना उत्तम लाभ होईल. पतप्रतिष्ठेत वाढ होईल.
- **कुंभ** : व्यवसायात मोठी गुंतवणूक होऊ शकेल. परिचयोत्तर विवाहाच्या संधी लाभतील. बाकी चिंता नसावी.
- **मीन** : प्रेम प्रकरणात मतभेद संभवतात. नोकरीत विरोधाला सामोरं जावं लागेल. विचारानं रहायला हवं.

सल्ला मोलाचा

## गेट रेडी फॉर किटी पार्टी

घरी किटी पार्टी असेल तर तयारी कशी करावी हे लक्षात येत नाही. सजावटीबरोबरच पार्टीमधल्या मेन्यूचंही प्लॅनिंग करुन ठेवावं. ही तयारी करता करता त्या दिवशी घालण्याच्या ड्रेसचा विचार करुन ठेवा. पार्टीमध्ये उठून दिसावं यासाठी काय करावं असा प्रश्न कोणाला पडला असेल तर बिचकू नका. काही उपायानं चेहऱ्याला त्वरित टवटवी मिळते. आपण पीठ मळतो त्याप्रमाणे केळी मळावीत आणि १०–१५ मिनिटं फ्रीजरमध्ये ठेवावं. १५ मिनिटांनी फ्रीजरमध्ये ठेवलेला केळ्याचा पॅक चेहरा आणि मानेवर १० मिनिटं लावून ठेवून टाकावा. बटाटे कापल्यावर त्यातून येणारा रस हातांवर लावावा. किचनमध्ये स्वयंपाक करताना हात चिकट आणि हळदीने भरलेले असतात. असं झालं तर तेथे बटाट्याचा रस कामी येतो. या रसामुळे हातांचा चिकटपणा जाण्यास मदत होते. सध्याचे दिवस थंडीचे आहेत. या दिवसात तुम्ही ब्लॅक लेगिंगबरोबर कोणत्याही गडद रंगाचा टॉप आणि स्वेटर तसेच स्टोलचा वापर करु शकता. चेहऱ्याला हलका मेकअप चांगला दिसतो. कीटी पार्टी असेल तेव्हा या छोट्या पण महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

## १ फेब्रुवारी

दिनविशेष

१९४२ : नार्वेमध्ये क्विस्लिंग याने जर्मनांच्या हातचं बाहुलं असणारं सरकार स्थापन केलं.
१९६४ : 'युनिट ट्रस्ट'ची स्थापना.
१९८६ : सुप्रसिद्ध अभिनेता बापूराव माने यांचे निधन.
२००३ : अंतराळवीर कल्पना चावलाचा मृत्यू.
२०१३ : महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी कायद्यात बदल करून तो सक्षम करण्याच्या वटहुकमाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली.

महत्त्वपूर्ण काही...

## द्रव स्फटिकांबाबतचं संशोधन

अमेरिकेतील आरसीए लॅबोरेटरीतील संशोधक रिचर्ड विल्यम्स यांनी १९६० च्या दशकात केलेल्या संशोधनात एक महत्त्वपूर्ण निष्कर्ष समोर आला. त्यानुसार द्रव स्फटिकांची दिशा ही त्यावर दिलेल्या विद्युतक्षेत्राच्या तीव्रतेनुसार बदलत असल्याचं आढळलं. या महत्त्वपूर्ण संशोधनामुळे आधीच ध्रुवीत असलेला प्रकाश या द्रव स्फटिकातून पाठवल्यास त्या स्फटिकांच्या दिशेनुसार प्रकाशाची तीव्रता बदलणं शक्य होणार होतं. म्हणजेच विद्युतक्षेत्राची तीव्रता कमी–अधिक करून प्रकाशाच्या ठिपक्यांची तीव्रता कमी–अधिक करणं शक्य होणार होतं. मात्र, यासाठी द्रव स्फटिकांचं तापमान उच्च ठेवावं लागत होतं. या संदर्भात विल्यम्स यांचे सहकारी जॉर्ज हाइलमायर यांनी महत्त्वाचं संशोधन केलं. त्यांनी नेहमीच्या तापमानाला वापरता येतील अशा द्रव स्फटिकांची निर्मिती केली. परिणामी यानंतरच्या काही काळातच कॅल्क्युलेटरवर या द्रव स्फटिकांचे पडदे दिसू लागले. पुढे कालांतराने संगणक आणि चित्रवाणीतील कॅथोड रे ट्युबची जागाही द्रव स्फटिकांवर आधारलेल्या, वीज वाचवणाऱ्या आणि कमी जाडीच्या द्रव स्फटिकांच्या पडद्यांनी घेतली.

आरोग्यमंत्र

## सडपातळ बांधा असुनही...

वाढत्या वजनामुळे अनेक विकारांना निमंत्रण मिळतं. त्यामुळे स्लीम असणं महत्त्वाचं असा अनेकांचा समज आहे. तो खरा असला तरी स्लीम व्यक्तिंनी कसाही आहार घेतल्यास, व्यायामाकडे दुर्लक्ष केल्यास फारसं बिघडत नाही, हा समज मात्र चुकीचा आहे. सडपातळ बांधा हे निरोगी असण्याचं लक्षण असतंच असं नाही. बारीक माणसांमध्येही आरोग्यविषयक समस्या उद्‌भवू शकतात.



✲ बारीक माणसांच्या शरीरात चरबीचं प्रमाण जास्त असू शकतं. बाहेरून बारीक दिसत असले तरी त्यांच्या शरीराच्या आतल्या भागात चरबी साठत जाते. विविध अवयवांच्या भोवती तसंच त्वचेच्या खालच्या भागात चरबी साठू लागते. स्थूल लोकांच्या तुलनेत बारीक माणसांच्या शरीरात या चरबीचं प्रमाण जास्त असतं.

✲ चुकीच्या जीवनशैलीमुळे बारीक लोकांना मधुमेह जडण्याची शक्यता जास्त असते. या लोकांनीही आहारावर नियंत्रण ठेवायला हवं.

✲ जाड किंवा निरोगी लोकांच्या तुलनेत बारीक लोक जास्त आळशी असू शकतात. बैठी जीवनशैली आणि जंक फूडचं अतिसेवन याला कारणीभूत ठरतं. जंक फूडचा त्रास होणार नाही हा समज चुकीचा आहे.

✲ बारीक लोकांच्या शरीरात अन्नातले पोषक घटक कमी प्रमाणात शोषले जातात. यामुळे चयापचयाची क्रिया मंदावते. यामुळे हृदयविकार आणि मधुमेहासारखे विकार होण्याची शक्यता वाढते.

✲ बारीक लोकांची प्रतिकारशक्ती इतरांच्या तुलनेत कमी असते. त्यामुळे बारीक म्हणजे निरोगी हा समज काढून टाकावा.

पंचांग

**शनिवार, १ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ३, नक्षत्र : पू. भाद्रपदा
चंद्रराशी : कुंभ , परिघ योग,
सूर्योदय : ७.१२, सूर्यास्त : ६.३१

फॉरवर्डस

मनातल्या गोष्टी कवितेतून ओठांवर येतात तेव्हा...

**हम जिसे छिपाते है**
**उम्रभर, बात बोल देती है।**
**शायरी भी क्या गजब**
**होती है, हर राज खोल देती है।**

वाचा तर खरं

आजकाल महागाईच्या जमान्यात बचतीचं महत्त्व आणखी वाढलं आहे. आपण बचतीसाठी अनेक प्रकारचं नियोजन करतो. पण केलेल्या नियोजनाची यशस्वी अंमलबजावणी होतेच असं नाही. मॉलमध्ये गेल्यावर तर जणू शॉपिंगचं व्यसन लागल्यासारखं वाटून जातं. काय खरेदी करावं याचं भान न राहिल्याने अनावश्यक वस्तूंची खरेदी केली जाते. मानसशास्त्रज्ञांनी खरेदीच्या या व्यसनावर उपाय सांगितला. तो म्हणजे नेहमी भरल्या पोटी खरेदीला जावं. उपाशीपोटी खरेदीला जाऊ नये. उपाशी असताना मनाची अवस्था संतुलित नसते. अशा वेळी अनावश्यक खरेदीचा धोका बळावतो.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

## At a Glance

### आरोग्य कर्मचा-यांच्या आरोग्य आणि सुरेक्षेला महापालिकेचे प्राधान्य



**पिंपरी**- शहराला स्वच्छ व सुंदर ठेवण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या आरोग्य विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांचे आरोग्य आणि सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका नेहमी प्राथमिकता देत असून वेळोवेळी त्यांच्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविले जातात, असे मत अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी व्यक्त केले.पिंपरी चिंचवड शहरामध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०२४ होणार आहे. या अनुषंगाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम हाती घेण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने कर्मचाऱ्यांना आरोग्य व सुरक्षेबाबत प्रशिक्षण देण्यासाठी पिंपळे गुरव येथील नटसम्राट निळू फुले रंगमंदिर येथे स्वच्छता क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उप आयुक्त सचिन पवार, आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे, सहाय्यक आरोग्य अधिकारी अंकुश झीटे, मुख्य आरोग्य निरीक्षक श्रीराम गायकवाड, सहाय्यक आरोग्य निरिक्षक शांताराम माने, शशिकांत मोरे यांच्यासह महापालिकेच्या ग, ड व ह क्षेत्रीय कार्यालयांमधील सफाई कर्मचारी उपस्थित होते.अतिरिक्त आयुक्त खोराटे म्हणाले, आरोग्य निरीक्षक व सफाई मित्र यांनी स्वच्छता करताना सुरक्षा साधनांचा वापर करावा. आरोग्याच्या चांगल्या सवयी अंगी आत्मसात कराव्यात, आरोग्याची वेळोवेळी तपासणी करावी., असे ते म्हणाले.

# ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त ७६ वृक्षांची लागवड

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त डिवाईन जैन ग्रुपतर्फे आयकर विभागाच्या कार्यालयात ७६ वृक्षांची लागवड करण्यात आली. प्रधान मुख्य आयकर आयुक्त रीना झा त्रिपाठी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचा मुख्य हेतू प्रजासत्ताक दिनाचा उत्सव निसर्गाच्या सान्निध्यात साजरा करणे हा होता. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी वृक्षारोपण हा महत्त्वाचा भाग आहे. केवळ वृक्षांची लागवड करून थांबणार नाही, तर त्यांच्या देखभालीची जबाबदारीही घेतली जाणार आहे.

ही वृक्षलागवड डिवाईन जैन ग्रुप व सेवायोग फाउंडेशनच्या समन्वयाने करण्यात आली. पर्यावरण संवर्धनासाठी केवळ वृक्षारोपण महत्त्वाचे नसून, त्यांचे योग्य प्रकारे संगोपन आणि संवर्धन होणेही तितकेच आवश्यक आहे. त्यामुळे या वृक्षांची जबाबदारी संस्थेने घेतली आहे.

कार्यक्रमास संग्राम गायकवाड (प्रधान आयकर आयुक्त), अमित बोबडे (आयकर आयुक्त, पुणे), सोमनाथ वाजळे (अतिरिक्त आयकर आयुक्त, पुणे), किरण शिंदे (उप आयकर आयुक्त, मुख्यालय, प्रशासन, पुणे), शेखर पवार (आयकर अधिकारी, मुख्यालय, प्रशासन, पुणे) व मान्यवर उपस्थित होते.

डिवाईन जैन ग्रुपचे अध्यक्ष संकेत शाह, भूषण कर्णावट, प्रियंका शहा, चेतन जैन, मेहुल शहा, हर्षल नवलक्खा, तनिष जैन, श्रेयांश पांडे व सेवायोग फाउंडेशनचे अक्षय कचरे, आदित्य ढवळे व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

या सर्वांच्या उपस्थितीत आणि सहकार्याने प्रजासत्ताक दिनानिमित्त पर्यावरण पूरक सामाजिक जबाबदारीचे भान ठेवत हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

आजच्या काळात वाढते प्रदूषण आणि पर्यावरणावर होणारा ताण लक्षात घेता, वृक्षारोपणासारखे उपक्रम गरजेचे आहेत. डिव्हाइन जैन ग्रुप आणि सेवायोग फाउंडेशनच्या पुढाकारामुळे निसर्गसंवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेले.भविष्यातही असेच सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्याचा संकल्प डिवाईन जैन ग्रुप ने केला आहे.



# नळ कनेक्शन तोडणीबाबतचा 'एसएमएस' फसवणूकीचा !!

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी** : चिंचवड शहरामध्ये सध्या ज्या नागरिकांची पाणीपट्टी थकीत आहे अशा मालमत्तेचे नळकनेक्शन तोडण्याची कारवाई सुरू आहे. महापालिकेच्या माध्यमातून याबाबत नागरिकांना थकीत पाणीपट्टी भरण्याचे वेळोवेळी 'एसएमएस' द्वारे व इतर माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे. परंतू, शहरात नागरिकांचे आज रात्री 9 वाजता नळकनेक्शन तोडण्यात येईल, अशा आशयाचे देवेश जोशी, महापालिका अधिकारी या नावाने व 9309445824/9325848115 या मोबाईल क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहनपर फसवणूक करणारा 'एसएमएस' पाठविण्यात येत आहे. असे 'एसएमएस' हे नागरिकांची फसवणूक करणारे असून याकडे नागरिकांनी दुर्लक्ष करावे. असे महानगरपालिकेकडून आवाहन करण्यात आले आहे.



चौकट – कोणत्याही लिंकद्वारे कोणतेही ॲप्लिकेशन मोबाईलमध्ये डाऊनलोड करु नका!

तुमच्या माहितीमध्ये बदल आहेत, तुम्ही माहिती बदल करण्यासाठी सदर ॲप्लिकेशन डाऊनलोड करण्यासाठीचे एसएमएस तुमच्या व्हाट्सअपवरती येत आहेत. तरी त्याप्रकारच्या लिंक, ॲप्लिकेशन डाऊनलोड न करता त्याकडे दुर्लक्ष करावे. आपणास आपल्या माहितीबाबत, पाणीपट्टीबाबत कोणत्याही प्रकारच्या शंका असल्यास महानगरपालिकेच्या ८८८८००६६६६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा. असे आवाहन करसंकलन विभागाद्वारे करण्यात आले आहे.

### नागरिकांनी 'फ्रॉड' एसएमएसकडे दुर्लक्ष करावे !

महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून पाणीपट्टी वसुलीची मोहिम सुरु करण्यात आली आहे. नागरिकांना करसंकलन विभागाकडून थकीत पाणीपट्टी भरण्याचे अधिकृत क्रमांक व सिस्टिमवरुन एसएमएस करण्यात येत आहेत. आपणास कधीही कोणत्याही मोबाईल क्रमाकांवरुन पाणीपट्टी भरण्याचे आवाहन करण्यात येत नाही. तरी नागरिकांनी अशा क्रमांकावरुन आलेल्या एसएमएस कडे दुर्लक्ष करुन आर्थिक फसवणूक होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**— अविनाश शिंदे, सहाय्यक आय़ुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका**

# विद्यार्थ्यांनो, दुपारी झोपायची सवय बंद करा-उद्योजक रामदास काकडे



**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी :** दहावीची परीक्षा ही एकूणच आयुष्यात अत्यंत महत्त्वाची, पुढील आयुष्याची दिशा ठरवणारी आणि यशाची पायाभरणी करणारी आहे. आपण कुठे कमी पडतोय, प्रत्येक विषयात कोणत्या प्रश्नात गुण कमी झाले आहेत, कुठली गोष्ट व्यवस्थित जमलेली नाही, याचे निरीक्षण करून शिक्षकांकडून शंकाचे निरसन करून घ्या. दुपारच्या वेळेत परीक्षा असल्याने दुपारी झोपायची सवय असलेल्यांनी ती आत्ताच बंद करा, म्हणजे परीक्षा कालावधीत दुपारी झोप येऊन त्याचा परीक्षेवर परिणाम होणार नाही. याबरोबरच आतापासूनच आपण परीक्षेमध्ये जो पेन, पेन्सिल वापरणार आहात, त्याने लिहायचा सराव करा, म्हणजे पेपर लिहायला सोपेपणा येईल. किमान दोन-तीन तास एका जागेवरून न हल्ल्याची सवय लावा, असा कानमंत्र प्रसिद्ध उद्योजक व इंद्रायणी विद्यामंदिर संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे यांनी विद्यार्थ्यांना दिला.

लायन्स क्लब ऑफ पुणे इनोव्हेशन, स्टेप्स फाउंडेशन व गुरुकुल फाउंडेशन यांच्या संयुक्तपणे ग.दि. माडगूळकर नाट्यगृह, आकुर्डी येथे तणाव विरहित दहावी बोर्डाच्या परीक्षेला विद्यार्थ्यांनी कसे सामोरे जावे, या हेतूने 'यशस्वी भव' या मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांशी हितगुज करताना रामदास काकडे बोलत होते. यावेळी लायन्स इंटरनॅशनलचे डिस्ट्रिक्ट 3234D2 चे उपप्रांतपाल ला. राजेश अग्रवाल, स्टेप्स फाउंडेशनचे संस्थापक संदेश मुखेडकर, गुरुकुल फाउंडेशनचे संस्थापिका नीलम कौशल, ज्येष्ठ उद्योजक शरदचंद्र धारूरकर, संजीवनी डिंबळे, ज्ञानसागर इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक प्रदीप रॉय, लायन्स इनोव्हेशन क्लबचे प्रेसिडेंट ला. गोपाळ बिरारी, प्रा. भक्ती मुखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. संतोष पाचपुते, प्रा. मनोज चौधरी, डॉ. शोभना पवार, प्रा. स्वाती विठ्ठळे, प्रा. नीलम कौशल, प्रा. ओमप्रकाश मारे, प्रा. संदेश मुखेडकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या मार्गदर्शन सत्राचे अध्यक्ष लॉयन संदीप पोलकम होते. यावेळी विजय शिनकर, सचिव किशोरी हरणे, खजिनदार एकनाथ चौधरी, प्रा. अश्विन गुडसूरकर, प्रा. दिपाली नारगुंडे, प्रा. सविता विभुते, प्रा. संदीप मोरे उपस्थित होते.

रामदास काकडे पुढे म्हणाले, की दहावीची परीक्षा देणारे विद्यार्थी आपले बालपण यशस्वी करून प्रौढावस्थेकडे मार्गक्रमण करण्याचा हा टप्पा आहे. जीवनातील पहिले पाऊल यशस्वी करण्यासाठी दहावीची परीक्षा ही महत्त्वाची आहे. इथूनच करिअरचे सर्व मार्ग खुले होतात.

# अनधिकृत बांधकामावर कारवाई

## नागरिक उतरले रस्त्यावर: वाहनांच्या रांगा लागल्याने वाहतूक कोंडी निर्माण

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी** : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली कुदळवाडीमध्ये अनधिकृत बांधकामाच्या कारवाईला नागरिकांचा प्रचंड विरोध होताना दिसत आहे. मुख्य रस्त्यावर कारवाई होत असल्याने रस्त्यावरती वाहनांच्या रांगा लागल्याने वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिक्रमण विभागाचे अधिकारी मनोज लोणकर यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कुदळवाडीमध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात येत आहे. मात्र, कारवाईला विरोध दर्शवत नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले आहेत.पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामावर कारवाईला नागरिकांचा प्रचंड विरोध होणे हे एक महत्त्वाचे समाजिक व प्रशासकीय प्रश्न आहे. अनधिकृत बांधकामाच्या कारवाईसाठी महापालिका नियमानुसार पाऊले उचलत असली तरी नागरिकांची प्रतिक्रिया त्यांच्यादृष्टीने महत्त्वाची असते. नागरिकांची बाजू समजून घेत, त्यांचा विरोध कमी करण्यासाठी संवाद आणि समजुतीचे वातावरण तयार करणे आवश्यक आहे.



# मलाबार गोल्ड अँड डायमंड्सकडून 'सॉलिटेअर वन'ची प्रस्तुती

**पिंपरी :** जगातील सर्वात मोठ्या आणि सर्वात विश्वासार्ह सोने आणि हिरेजडित दागिन्यांच्या किरकोळ विक्रेत्यांपैकी एक असलेल्या मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने, आंतरराष्ट्रीय प्रयोगशाळांनी प्रमाणित केलेल्या नैसर्गिक हिऱ्यांचा एक उत्कृष्ट संग्रह 'सॉलिटेअर वन'च्या प्रस्तुतीची आज अभिमानपूर्वक घोषणा केली. बॉलीवूड तारका आणि ब्रँड ॲम्बॅसेडर आलिया भट्टसह या नवप्रस्तुतीसाठी विशेष प्रसारमोहिम आखण्यात आली आहे. ज्यात अनमोल हिऱ्याचे कालातीत आकर्षण साजरे करण्यासह, जीवनातील मौल्यवान क्षणांना प्रकाशित करण्यारी क्षमता प्रदर्शित करण्यासह, या चमकदार रत्नांबद्दल प्रत्येक स्त्रीच्या मनांत असलेले अमीट प्रेम दाखविले गेले आहे. 'सॉलिटेअर वन' हे सॉलिटेअर दागिन्यांच्या अनुभवाला पुनर्परिभाषित करण्यासाठी सज्ज झाले आहेत, जे संपूर्ण देशात उपलब्धतेसह, आयुष्यभरासाठी मौल्यवान राहण्याचे वचन देणाऱ्या नैसर्गिक हिऱ्यांच्या उत्कृष्ट श्रेणीला प्रस्तुत करतात. ०.३० कॅरेटपेक्षा जास्त आकाराचा प्रत्येक हिरा आणि दागिन्यांचा प्रत्येक नग द्वि-स्तरीय प्रमाणन प्रक्रियेतून गेलेला असेल, याची खात्री करून आम्ही आमच्या ग्राहकांना सर्वोच्च गुणवत्ता प्रदान करतो. मलाबार समूहाचे अध्यक्ष, एमपी अहमद म्हणाले, "'सॉलिटेअर वन'च्या प्रस्तुतीसह, आम्ही केवळ नवीन संग्रहाच्या सादरीकरणापेक्षा बऱ्याच काही गोष्टींची सज्जता केली आहे. हा कालातीत सौंदर्य आणि प्रेमाच्या सामर्थ्याचा अजो़ड उत्सव आहे. या निमित्ताने संकल्पित मोहिमेमध्ये स्त्रियांच्या सॉलिटेअर्स हिऱ्यांशी खोल जुळलेल्या भावनिक संबंधांना दर्शविले गेले आहे, जे लालित्यासह शाश्वतता अशा दोन्ही क्षणांचे प्रतीक बनले आहे.

# आर्थिक नियोजन परिसंवाद आणि महिलांसाठी हळदीकुंकू

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी:** संकल्प लाडशाखीय वाणी समाज मंडळ मोशी व परिसरातर्फे महिलांसाठी हळदी-कुंकू व आर्थिक नियोजन परिसंवाद दिमाखात संपन्न झाला. वर्षातला पहिला गोडवा घेवुन येणारा हा सण म्हणजेच महिलांचा हळदी-कुंकू समारंभ.. २५ जानेवारी रोजी मोशी येथील भव्य दिव्य अश्या सिझन बान्क्वेट हॉल येथे मोठ्या उत्साहात हा कार्यक्रम पार पडला. सदर कार्यक्रमात महिलांमधील आपुलकी, सहकार्य आणि आनंद यांचा आविष्कार दिसून येत होता. या कार्यक्रमात महिलांनी परंपरागत वेश-भूषेसह नववारी साडी परिधान केलेली होती. हळदी कुंकू वाण म्हणून चांदीच्या कॉइनसह विविध वाण देण्यात आले. दुस-या सत्रात, संकल्प मंडळाच्या टॅग लाईनला अनुसरून संकल्प एकजूट प्रगतीचा ,समाज विकासाचा आणि सर्वांगीण विकास झाला पाहिजे असे वाटत असेल तर आर्थिक बचत व भविष्यातील संधी योग्य वेळी समजुन घेतल्या पाहिजेत, त्याच जनजागृतीच्या उद्दिष्टाने मंडळातर्फे हळदी-कुंकू सोबत आर्थिक नियोजन परिसंवाद केला. मार्गदर्शन करण्यासाठी आमंत्रित केले होते अमृतकर सर्व्हिसेसचे संचालक चंद्रकांतजी अमृतकर ( AIFS ) तसेच नमितजी स्वानि – रिजनल हेड, UTI AMC, Pune यांचे उपस्थित समाजबांधवांना शेअर्स, इक्विटी, स्टॉक, म्युच्युअल फंड इत्यादीचे मार्गदर्शन मिळाले.



# सुपरपाथ हिप रिप्लेसमेंट - डॉ. आशिष अरबत

**पिंपरी :** सुपरपाथ (सुप्राकॅप्सुलर पर्क्यूटेनियसली असिस्टेड टोटल हिप) हिप रिप्लेसमेंट सर्जरी ही सांधे बदलण्याच्या तंत्रांमध्ये एक महत्त्वपूर्ण प्रगती दर्शवते, जी कुल्ल्यांचा दुखावा आणि हालचालीं मध्ये अडचण येणाऱ्या व्यक्तींसाठी कमीत कमी छेदांसह शस्त्रक्रियेचा पर्याय देते. ही पद्धत स्नायू आणि मऊ ऊती टिकविण्यावर भर देतो, ज्यामुळे रुग्ण विनासायास बरे होऊ शकतो आणि शस्त्रक्रियेनंतरचे परिणाम सुधारतात. भारतात, जिथे वयस्कांची वाढती लोकसंख्या, बैठी जीवनशैली आणि संधिवात आणि एव्हस्कुलर नेक्रोसिस (एव्हीएन) सारख्या परिस्थितींमुळे कुल्ल्याच्या समस्या वाढत आहेत, तिथे हालचाल क्षमता पुनः साध्य करण्यासाठी आणि वेदना कमी करण्यासाठी सुपरपाथला एक मौल्यवान पर्याय म्हणून ओळखले जात आहे. ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेतील तज्ज्ञ डॉ. आशिष अरबत म्हणाले की सुपरपॅथ तंत्र हिप रिप्लेसमेंटमध्ये बदल घडवून आणते. त्याचा कमीत कमी आक्रमक दृष्टीकोन स्नायू आणि मऊ ऊतींचे रक्षण करते, ज्यामुळे लवकर बरे होतात, वेदना कमी होतात आणि हालचाल सुधारते. पीडित रुग्णांसाठी. एव्हीएन आणि संधिवात यांसारख्या हिप स्थितींपासून, सुपरपॅथ एक गेम चेंजर आहे स्वातंत्र्य आणि जीवनाची गुणवत्ता पुनर्संचयित करणे. राहुल, एक ३९ वर्षीय मर्चंट नेव्ही ऑफिसर आहे. त्याला दोन वर्षांपर्यंत बायलॅटरल एव्हीएन चा त्रास होत होता, ज्यामुळे त्याला मदतीशिवाय चालणे, उभे राहणे किंवा बसणे देखील अशक्य झाले होते. या दुखण्यामुळे त्याला शेवटी नोकरी सोडावी लागली. त्याच्या उजव्या कुल्ल्यासाठी सुपरपाथ प्रक्रिया करण्यात आली आणि दोन दिवसांनीच त्याला डिस्चार्ज देण्यात आला.

पान १ वरून

## जगभरात मराठी माणसांचे...

एका क्लिकवर मिळू शकेल. मराठी भाषा विभागाने हा प्रयोग करावा. एआयचा उपयोग करुन स्मॉल लॅग्वेज मॉडेल तयार करून, त्या माध्यमातून पुढच्या पिढी करता अभिजात साहित्य कसे पुढे घेऊन जाता येईल, याचा विचार करावा लागेल. असे ही ते म्हणाले.हाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये बोलण्यात येणाऱ्या भाषेचा आणि तिच्या वैशिष्ट्यांचा डिजिटल संग्रह तयार करण्याच्या उद्देशाने पुण्यातील डेक्कन कॉलेज अभिमत विद्यापीठ आणि राज्य मराठी विकास संस्थेने मराठी बोलींचे सर्वेक्षण केले असून, त्यातून पहिला मराठी भाषिक नकाशा तयार केला आहे. विश्व मराठी संमेलनाच्या व्यासपीठावर प्रकल्प प्रमुख डॉ. सोनल कुलकर्णी-जोशी यांनी या सर्वेक्षणाची वैशिष्ट्ये आणि मराठी भाषिक नकाशाचे सादरीकरण केले.

संमेलनाच्या उद्‌घाटनावेळी उदय सामंत म्हणाले, "सांस्कृतिक नगरी असलेल्या पुण्यात अभिजात दर्जा मिळाल्यानंतर विश्व मराठी संमेलन होत आहे. मराठी भाषा विभागाचा कार्यक्रम पुणेकरांनी उचलून धरला आहे. मराठी भाषेचे संवर्धन, प्रचार-प्रसार झाला पाहिजे, त्यासाठी मराठी ही शाळा-महाविद्यालयांपर्यंत पोहोचली पाहिजे. शोभा यात्रेत सात ते आठ हजार विद्यार्थी सहभागी झाले पाहिजे. युवा पिढीची जबाबदारी आहे, की मराठी टिकविणे आणि आक्रमणाचा आक्रमकतेने प्रतिकार केला पाहिजे. मराठी टिकविणाऱ्यांचा आदर्श हा दीपस्तंभाप्रमाणे ठेवला पाहिजे. पुढील वर्षी मालगुंड गावाला पुस्तकाच्या गावाचा दर्जा दिला जाईल. त्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल. महाराष्ट्रातील अशी गावे शोधली जातील, त्यामध्ये मराठी जतन-संवर्धन करणाऱ्या व्यक्तीचे गाव पुस्तकांचे गाव केले जाईल. महाराष्ट्रात प्रत्येक जाती-धर्माचा माणूस राहतो. प्रत्येक भाषकाचा आदर केला आहे. भाषेचा अनादर केलेला नाही. परंतु काही लोक जाणीवपूर्वक मराठी भाषा, माणसाला त्रास देण्याचे काम करत असतील, तर कठोर कायद्याद्वारे शासन झाले पाहिजे. मराठीचे अस्तित्व, अस्मिता टिकविण्याची कार्यवाही केली पाहिजे.मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला, त्याच वर्षी होणाऱ्या विश्व मराठी संमेलनात मराठी बोलींचे सर्वेक्षण आणि पहिला मराठी भाषिक नकाशा सादर करण्याची संधी ही आनंदाची बाब असल्याचे यावेळी सांगितले.

## विकसित भारत हेच आमचे ध्येय!

भारताच्या विकास प्रवासाच्या या अमृत काळाला नवीन ऊर्जा देत आहे. तिसऱ्या टर्ममध्ये, काम तिप्पट वेगाने केले जात आहे. आज, देशात मोठे निर्णय आणि धोरणे असाधारण वेगाने अंमलात आणली जात आहेत.

राष्ट्रपती म्हणाले की, तीन कोटी अतिरिक्त कुटुंबांना नवीन घरे देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी ५ लाख ३६ हजार कोटी रुपये खर्च करण्याची योजना आहे. आदिवासी समाजातील पाच कोटी लोकांसाठी धरती आबा आदिवासी ग्राम विकास अभियान सुरू करण्यात आले आहे. यासाठी ८० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत, ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या सहा कोटी ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य विमा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यांना दरवर्षी ५ लाख रुपयांचे आरोग्य विमा मिळेल.

## यंदा १०८ लाख क्विंटल साखरेचे कमी उत्पादन

हजार क्विंटल साखरेचे उत्पादन झाले होते. याबाबत वेस्ट इंडियन शुगर मिल्स असोसिएशनचे कार्यकारी संचालक अजित चौगुले म्हणाले, 'सुरुवातीच्या काळात पाऊस नव्हता. नंतर मोठ्या प्रमाणात पाऊस होऊन ऊसवाढीच्या काळात फटका बसला. परिणामी, उसाची वाढ खुंटली, जमिनीत ओलावा जास्त राहिल्याने उत्पादनात घट आली आहे. पुढील वर्षी मात्र अशी परिस्थिती नसेल. मुख्यत्वे हवामान बदलाचा यावर्षी फटका बसला आहे.'

गतवर्षीच्या तुलनेत गाळप आणि उत्पादनही घटले आहेच, त्याबरोबरच उसाची गुणवत्ताही खालावत चालली असल्याची शंका तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे सरासरी साखर उतारा ९.४९ टक्क्यांहून ८.९८ टक्क्यांपर्यंत साखरेचा उतारा खाली आला आहे. राज्यात सर्वाधिक १०.६३ टक्के उतारा कोल्हापूर विभागाचा आहे, तर नागपूर विभागात सर्वांत कमी हा ४.८४ टक्केच उतारा आहे.

## पोषण आहारात मसाले भात, व्हेज, अंडा पुलाव

तसेच 6 वी ते 8 वीच्या उच्च प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांसाठी 700 उष्मांक आणि 20 ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार, तसेच तांदळापासून बनवलेल्या पाककृतीनुसार पोषण आहाराचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येत होता. नव्या निर्णयानुसार विद्यार्थ्यांच्या पोषण आहारात व्हेजिटेबल पुलाव, सोयाबीन पुलाव, मसाले भात, मसुरी पुलाव, मटार पुलाव, मूग शेवगा वरण भात, मूगडाळ खिचडी, मोड आलेल्या मटकीची उसळ, चवळी खिचडी, अंडा पुलाव, चणा पुलाव, गोड खिचडी व नाचणी सत्त्व अशा 12 प्रकारच्या पाककृतींच्या समावेश करण्यात आला आहे.

## तोंडाला कुलूप लावण्याचा प्रकार!

झाली त्याचा निश्चितच फटका मला बसला आणि माझे मताधिक्य कमी झाले. परंतु तरीही मी ओबीसींच्या हक्कांसाठी लढत राहणार आहे. जरांगेंच्या आंदोलनामध्ये माझा वापर करून घेतला असे अनेकांना वाटते, परंतु छगन भुजबळ चा कोणीही वापर करू शकत नाही आणि मी माझा वापर कोणालाही करू देत नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## जीबीएसमुळे दगावला पहिला रुग्ण!

पुण्यात जीबीएसचे सर्वाधिक रुग्ण आढळले आहेत. पुण्यात सध्या जीबीएस बाधितांची संख्या १३० वर पोहोचली आहे. यातील ७३ जणांना रुग्णांचे अहवाल हे पॉझीटीव्ह आले आहेत. यातील २० रुग्ण हे व्हेंटिलेटरवर असल्याची माहिती आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली. पुण्यात गेल्या काही दिवसांपासून १५०० पेक्षा जास्त घराचं सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. त्यात गेल्या आठवड्यापासून रुग्णांची संख्या ही १०० च्या वर गेली आहे.

## मेट्रो आणखी होणार सुसाट; २७६ कि.मी. लांबीचा नवा प्रस्ताव

सहा नव्या बीआरटी मार्गिकांचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. यामध्ये रावेत ते राजगुरूनगर, गवळी माथा चौक ते शेवलेवाडी, रावेत ते तळेगाव दाभाडे, चांदणी चौक ते हिंजेवाडी, लोणी काळभोर ते कडेगाव आणि भुमकर चौक ते चिंचवड चौक या मार्गांचा समावेश आहे.



## मालमत्ता जप्तीची धडक मोहिम अभियान

# करसंकलन विभागाकडून आज करसंवादाचे आयोजन...

**राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पिंपरी** : करदात्यांच्या शंकाचे निरसनासाठी करसंकलन विभागाने करसंवाद उपक्रम सुरू केला. नागरिकांच्या मालमत्ताकराबाबतच्या शंका, प्रश्नांचा निपटारा होण्यासाठी शनिवार, दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी, ११.३० वाजता करसंवादाचे ऑनलाइन व ऑफलाइन स्वरूपात आयोजन केले असून नागरिकांनी त्यामध्ये सहभाग घेऊन प्रतिसाद द्यावा. असे आवाहन करसंकलन विभागाकडून करण्यात आले आहे.

नागरिक व अधिकारी यांच्यामध्ये थेटसंवाद असा उद्देश असलेल्या करसंवादामध्ये नागरिकांनी विचारलेल्या प्रश्नांबाबत विभागाकडून तत्काळ माहिती पुरविण्यात येईल. यामुळे नागरिकांनी महानगरपालिकेच्या यूट्यूब चॅनेल व सोशल मीडियावर अकाऊंटवर आपले प्रश्न विचारून आपल्या शंकाचे तात्काळ निरसन करावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

> पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाकडून शहरातील मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरण्याचे विविध माध्यमातून आवाहन करण्यात येत आहे. सध्या शहरातील थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्याची धडक मोहिम सुद्धा सुरू आहे. मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर वेळेत भरून मालमत्ता जप्तीची कारवाई टाळावी. आपल्या मालमत्तेबाबत कोणत्याही शंका असल्यास विभागाकडे मांडून त्याबाबत शंकाचे निरसन करून घ्यावे. याचसाठी शनिवारी करसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने करसंवादामध्ये सहभाग नोंदवून मालमत्ता जप्तीची धडक मोहिम व आदी अभियानाबाबत माहिती घ्यावी.
>
> **— अविनाश शिंदे,** सहाय्यक आयुक्त, करआकारणी व करसंकलन विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

At a Glance

### विदेशी गंगाजळीत ५.५७ अब्ज डॉलरची वाढ

**नवी दिल्ली :** रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी सांगितले की, २४ जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात भारताचा परकीय चलन साठा ५.५७४ अब्ज डॉलरने वाढून ६२९.५५७ अब्ज डॉलरवर पोहोचला आहे. गेल्या आठवड्यात देशाची एकूण संपत्ती १.८८८ अब्ज डॉलरने घसरून ६२३.९८३ अब्ज डॉलरवर आली होती.

### पाकिस्तानला ३५० अब्ज डॉलरची गरज

**नवी दिल्ली :** पाकिस्तानला २०२३ ते २०३० या कालावधीत हवामान बदलाचा सामना करण्यासाठी ३५० अब्ज डॉलर्सची गरज असल्याचे जागतिक बँकेने म्हटले आहे. 'ग्लोबल क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार पाकिस्तान सध्या जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वाधिक असुरक्षित देश आहे.

### मतदान सुरळीत होण्यासाठी उपाययोजना

**नवी दिल्ली :** दिल्ली विधानसभा निवडणूक सुरळीत पार पडण्यासाठी मतदाराभिमुख उपाययोजना करण्यात आल्याने ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सुमारे १ कोटी ५६ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी आर. एलिस वाझ यांनी दिली.

# आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर

## महागाईचा धोका कायम असल्याचे स्पष्ट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी शुक्रवारी (३१ जानेवारी) लोकसभेत आर्थिक वर्ष २०२४-२५ चा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. या अहवालाद्वारे चालू आर्थिक वर्षातील अर्थव्यवस्थेच्या कामगिरीचं मूल्यांकन केलं जातं. तसेच देशासमोरील आर्थिक आव्हानांची रूपरेषा संसदेत मांडली जाते. अर्थसंकल्प सादर करण्यापूर्वी अर्थव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी सरकारकडून वार्षिक दस्तऐवज सादर केले जातात, त्यालाच आर्थिक पाहणी अहवाल असं म्हटलं जातं. यंदा सादर केलेल्या अहवालानुसार आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढीचा दर हा ६.३ ते ६.८ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

आर्थिक पाहणी अहवाल मुख्य आर्थिक सल्लागारांच्या देखरेखीखाली तयार केला जातो. १९५०-५१ मध्ये सर्वात पहिल्यांदा आर्थिक पाहणी अहवाल सादर करण्यात आला होता. तेव्हा हा अहवाल अर्थसंकल्पाबरोबरच सादर करण्यात आला होता. पुढील १० वर्षे तीच पद्धत अवलंबली जात होती. मात्र, १९६० मध्ये यात बदल करण्यात आला. १९६० पासून आर्थिक पाहणी अहवाल अर्थसंकल्प सादर करण्याच्या आदल्या दिवशी मांडण्याची प्रथा सुरू झाली. उद्या म्हणजेच १ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण आर्थिक वर्ष २०२५-२६ साठीचा अर्थसंकल्प सादर करतील.

आर्थिक पाहणी अहवाल सादर करताना देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन म्हणाले, "देशांतर्गत अर्थव्यवस्थेची पायाभूत तत्त्वे मजबूत आहेत, विदेशी व्यापारातील समतोल, सुनियोजित वित्तीय एकत्रीकरण आणि खासगी क्षेत्रातील स्थिर मागणीचा विचार करता आर्थिक वर्ष २०२६ मध्ये विकासदर ६.३ ते ६.८ टक्क्यांच्या दरम्यान राहील. सर्वेक्षणाच्या कागदपत्रांनुसार, सर्व क्षेत्रांमध्ये चांगली कामगिरी दिसेल".



### २०२४-२०२५ च्या आर्थिक सर्वेक्षणातील ठळक मुद्दे खालीलप्रमाणे

- आर्थिक वर्ष २६ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था ६.३-६.८ टक्के दराने वाढेल, आर्थिक वर्ष २५ मध्ये ६.४ टक्के दराने वाढणार. भारताची आर्थिक मूलतत्त्वे कॅलिब्रेटेड राजकोषीय एकत्रीकरण, स्थिर वापरामुळे मजबूत.
- जागतिक प्रतिकूल परिस्थितींना तोंड देण्यासाठी धोरणात्मक, विवेकी धोरण व्यवस्थापन आणि देशांतर्गत आर्थिक मूलतत्त्वांना बळकटी देण्याची आवश्यकता असेल.
- जागतिक राजकीय आणि आर्थिक अनिश्चिततेमुळे महागाईचे धोके कायम आहेत.
- मोठा सार्वजनिक भांडवली खर्च आणि व्यवसाय अपेक्षा सुधारणेमुळे गुंतवणूक वाढण्याची अपेक्षा आहे.
- भारताला तळागाळातील संरचनात्मक सुधारणांद्वारे जागतिक स्पर्धात्मकता सुधारण्याची आवश्यकता आहे.
- ६४०.३ अब्ज डॉलर्सचे परकीय चलन, १०.९ महिन्यांच्या आयात आणि ९० टक्के बाह्य कर्जाची भरपाई करण्यासाठी पुरेसा आहे.
- व्यवसाय सुलभता २.० हा राज्य सरकारच्या नेतृत्वाखालील उपक्रम असावा जो व्यवसाय करण्याच्या असुविधेमागील मूळ कारणे दूर करण्यावर लक्ष केंद्रित करतो.
- भारताने निर्यात वाढवण्यासाठी आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आपले प्रयत्न दुप्पट करावेत. हे करण्याचा एक मार्ग म्हणजे आपल्या भूतकाळापेक्षा जगाच्या इतर भागांशी तुलना करून स्वतःला सिद्ध करणे.
- भारताला पुढील दोन दशकांत उच्च विकासासाठी पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक वाढवणे आवश्यक आहे.
- गुजरात, उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेश सारखी काही राज्येच त्यांच्या लोकांसाठी वाजवी उत्पन्न निर्माण करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रावरील त्यांच्या अवलंबित्वाचा फायदा घेऊ शकतील.
- सेवा-केंद्रित भारतीय अर्थव्यवस्था ऑटोमेशनला असुरक्षित आहे, भारताच्या आकारमानामुळे आणि तुलनेने कमी दरडोई उत्पन्नामुळे एआयचा प्रभाव वाढतोय.
- कॉर्पोरेट क्षेत्राला मोठ्या प्रमाणात सामाजिक जबाबदारी दाखवावी लागेल.
- हवामान-लवचिक पीक वाण विकसित करण्यासाठी, उत्पादन वाढविण्यासाठी आणि पिकांचे नुकसान कमी करण्यासाठी आवश्यक असलेल्या डाळी, तेलबिया, टोमॅटो, कांद्याचे उत्पादन वाढवण्यासाठी संशोधन करावे लागेल.
- २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्यासाठी भारताला सुमारे एक किंवा दोन दशकांपर्यंत सरासरी ८ टक्के आर्थिक वाढ करावी लागेल.
- आवश्यक वाढ साध्य करण्यासाठी गुंतवणूक ३१ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांनी वाढली पाहिजे.
- सुधारणांवर लक्ष केंद्रित करणे, आर्थिक धोरण आता पद्धतशीर नियंत्रणमुक्तीवर असले पाहिजे.
- उत्पादन क्षेत्र विकसित करणे आवश्यक आहे. उत्पादन क्षेत्राला पुढे नेणे आणि एआय, रोबोटिक्स आणि बायोटेक्नॉलॉजी सारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानात गुंतवणूक करणे गरजेचे.

### २०४७ पर्यंत विकसित भारत बनण्याचं स्वप्न पूर्ण करणं अवघड?

- भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत म्हणजेच २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचं ध्येय केंद्रातील मोदी सरकारने ठरवलं आहे. मात्र त्यासाठी पुढील दिड-दोन दशके स्थिर किमतींवर सरासरी ८ टक्के विकासदर राखणं आवश्यक आहे. मात्र सद्यस्थिती पाहता ते फारच आवघड दिसत आहे. केंद्र सरकारचं उद्दीष्ट कितपत व्यवहार्य ठरेल हे जागतिक आर्थिक व राजकीय परिस्थितीवर अवलंबून असेल.

## यमुनेच्या विषारी पाण्यावरून राजकारण सुरूच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** दिल्लीत यमुनेच्या विषारी पाण्यावरून भाजप आणि आप यांच्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेला राजकीय संघर्ष अजूनही सुरूच आहे. दरम्यान, आम आदमी पक्षाचे (आप) राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी यावर मोठे विधान केले आहे. यावेळी त्यांनी,"यमुनेच्या विषारी पाण्याबाबत हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्या माध्यमातून भाजप धोकादायक खेळ खेळत आहे." असा गंभीर आरोप त्यांनी केला.

आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्री भगवंत मान, मुख्यमंत्री आतिशी आणि इतर पक्ष नेत्यांसह आज निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना भेटण्यासाठी जाणार आहेत. त्यापूर्वी केजरीवाल यांनी, 'हरियाणा सरकारने पाठवलेल्या पाण्यात अमोनियाची पातळी शुक्रवारी कमी झाली." असे म्हटले. ते म्हणाले, "शुक्रवारी (३१ जानेवारी) यमुनेच्या पाण्यात टीडीएस २.०१ मिलीग्राम/लीटर झाला आहे. त्यामुळे जलसंयंत्रे आता काम करू लागली आहेत. यमुनेत अमोनियाचे प्रमाण ७.८ मिलीग्राम असल्याचेही स्पष्ट झाले होते."

अरविंद केजरीवाल ते पुढे "आज ज्या पद्धतीने अमोनियाची पातळी कमी झाली आहे, त्यावरून हे स्पष्ट होते की जर हरियाणाने ठरवले असते तर अमोनियाची पातळी इतकी वाढली नसती. अशा परिस्थितीत, निवडणूक आयोग भाजप आणि हरियाणा सरकारशी बोलण्याऐवजी, मला एक नोटीस पाठवली जात आहे." मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांच्याविरुद्ध एफआयआर दाखल करण्याऐवजी मला नोटीस पाठवण्यात आली आहे. निवडणूक आयोग हे एक शूटिंग मॅनेजर आहे." असेदेखील त्यांनी यावेळी म्हटले.

## चंदीगड महापौरपद भाजपकडे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** हरियाणा आणि पंजाबची राजधानी असलेल्या चंदीगडमधील महापौरपदाच्या निवडणुकीत आम आदमी पक्ष (आप) आणि काँग्रेस आघाडीस बहुमत असूनही पराभव पत्करावा लागला आहे. महापौरपदाची निवडणूक भाजपने जिंकली असून हरप्रीत कौर बाबला महापौरपदी निवडून आल्या आहेत.

चंदीगडमधील महापौर निवडणुकीत काँग्रेस आणि आप आघाडीच्या उमेदवार प्रेमलता यांना पराभव पत्करावा लागला आहे. बहुमत असूनही आप - काँग्रेस आघाडीचा महापौरपदाच्या निवडणुकीत पराभव भाजपने स्वबळावर निवडणूक लढवली होती आणि महापौरपदासाठी हरप्रीत कौर बाबला यांना उमेदवारी दिली होती. महापौर निवडणुकीत काँग्रेस आणि आपच्या तीन नगरसेवकांनी बंडखोरी केली आणि त्यांनी क्रॉस व्होटिंग केले, ज्याचा फायदा भाजपला झाला आणि बाबला महापौरपदाची निवडणूक जिंकल्या. वरिष्ठ उपमहापौरपदाच्या निवडणुकीत काँग्रेसने विजय मिळवला आहे. काँग्रेसचे उमेदवार जसबीर सिंग बंटी यांनी भाजपच्या उमेदवार बिमला दुबे यांचा पराभव केला. येथे भाजपला १७ आणि काँग्रेसला १९ मते मिळाली.

# पंतप्रधान मोदींनी दिले सकारात्मक संदेश

## मध्यमवर्गीय तसेच करदात्यांना सूट मिळणार?

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** १८ व्या लोकसभेच्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात तिसऱ्यांदा भाजपाप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं (एनडीए) सरकार आलं असून नव्या सरकारचा पहिला अर्थसंकल्प उद्या (१ फेब्रुवारी) सादर केला जाणार आहे. तत्पूर्वी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सत्राला संबोधित केलं. तसेच यावेळी देशाचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी चालू आर्थिक वर्षाचा आर्थिक पाहणी अहवाल सादर केला. त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या एका वक्तव्याने देशातील मध्यमवर्गीयांचे व करदात्यांचे कान टवकारले आहेत. मोदी यांच्या वक्तव्याने मध्यमवर्गीयांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. कारण मोदी यांनी बोलता बोलता मध्यमवर्गीय जनता व करदात्यांना अर्थसंकल्पाद्वारे सूट मिळण्याचे संकेत दिले आहेत.

अर्थसंकल्पीय अधिवेशनासाठी संसदेत दाखल झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, "मी लक्ष्मीमातेला नमस्कार करतो. आपल्या संस्कृतीत अशा प्रसंगी देवी लक्ष्मीचं स्मरण केलं जातं, तिला नमन केलं जातं. मी लक्ष्मीमातेकडे प्रार्थना करतो की देशातील गरीब व मध्यमवर्गावर तिची कृपादृष्टी राहो". मोदींच्या या वक्तव्याचा कराशी (टॅक्स) संबंध जोडला जात आहे.

### मध्यमवर्गाच्या अपेक्षा वाढल्या

- अर्थसंकल्पीय धिवेशनात मांडल्या जाणाऱ्या देशाच्या अर्थसंकल्पात प्राप्तिकरासंदर्भात म्हणजेच इन्कम टॅक्सबाबत नव्या घोषणा होण्याची शक्यता असते. यंदाच्या अर्थसंकल्पात नोकरदार वर्गासाठी कोणत्या नव्या घोषणा होणार? प्राप्तिकर कमी होणार किंवा वाढवले जाणार याबाबत काय तरतूद केली जाईल? याबाबत मोठी उत्सुकता पाहायला मिळत आहे. सध्या जुन्या व नवीन अशा दोन प्रणालींपैकी एका व्यवस्थेची प्राप्तिकर भरणा करण्यासाठी निवड नोकरदार वर्गाला करावी लागत आहे. यावेळी प्राप्तिकराच्या स्लॅब्समध्ये मोठे बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मध्यमवर्गाला तशीच अपेक्षा आहे. त्यानुसार करपात्र उत्पन्नाची मर्यादा थेट ८ किंवा १० लाखांपर्यंत वाढवी जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. यातून नोकरदार वर्गाला, मध्यमवर्गीय जनतेला मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. दुसऱ्या बाजूला प्राप्तिकर भरणा करण्यासाठी २५ टक्क्यांची नवी श्रेणी प्रस्तावित केली जाऊ शकते. त्यात १५ ते २० लाखांच्या उत्पन्नावर २५ टक्के कर लागू होण्याची शक्यता आहे. सध्या १५ लाखांवरील उत्पन्नावर ३० टक्के कर लागू केला जातो.

## पूंछ येथे दहशतवाद्यांशी चकमक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**श्रीनगर :** जम्मू-काश्मीरमधील पूंछ येथे सुरक्षा दलाचे जवान आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. यामध्ये सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार केले आहे. गुरुवारी संध्याकाळी दहशतवाद्यांचा एक गट नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता, असे सांगण्यात येत आहे.

जम्मू-काश्मीरमधील पूंछ येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांना ठार मारले. काल म्हणजेच गुरुवारी संध्याकाळी दहशतवाद्यांचा एक गट नियंत्रण रेषा ओलांडून भारतीय हद्दीत प्रवेश करण्याचा प्रयत्न करत होता, असे सांगण्यात येत आहे. परंतु सुरक्षा दलांनी सीमेपलीकडून होणारी ही घुसखोरी उधळून लावली आणि तिन्ही दहशतवाद्यांना ठार मारले.

प्रत्यक्षात, पूंछमधील नियंत्रण रेषेवरील खरमल भागात तैनात असलेल्या लष्करी जवानांना काही हालचाल दिसली. घुसखोरीची शक्यता लक्षात येताच, सैनिकांनी जवळच्या सुरक्षा चौक्यांना सतर्क केले आणि दहशतवादी दिसताच त्यांच्यावर गोळीबार करण्यात आला. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षा दलांनी या चकमकीत आतापर्यंत तीन दहशतवाद्यांना ठार मारले आहे आणि परिसरात अजूनही मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू आहे. परिसरात अजूनही मोठ्या प्रमाणात शोध मोहीम सुरू आहे.

# बँकिंग क्षेत्रात आजपासून हे बदल

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**नवी दिल्ली :** फेब्रुवारीचा पहिला दिवस खास असणार आहे, कारण या दिवशी अर्थमंत्री निर्मला सीतारामन अर्थसंकल्प सादर करतील. याशिवाय प्रत्येक महिन्याप्रमाणे या महिन्यातही काही नियम आणि बदल होणार आहेत. यामध्ये बँकिंग बदलांचाही समावेश आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून बँकिंग व्यवस्थेत मोठे बदल केले जाणार आहेत. अशा स्थितीत काही खातेदारांना नव्या व्यवस्थेला सामोरे जावे लागणार आहे.

वास्तविक, स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक आणि कॅनरा बँक या प्रमुख बँकांमध्ये बँकिंग सेवा बदलतील. नवीन नियमांचा उद्देश डिजिटल बँकिंगला प्रोत्साहन देणे तसेच बँकिंग फसवणुकीपासून संरक्षण करणे हा आहे. जाणून घेऊया १ फेब्रुवारीपासून कोणते ५ बँकिंग नियम बदलणार आहेत?

### एटीएममधून पैसे काढण्यासाठी शुल्कात बदल

- १ फेब्रुवारी पासून एटीएममधून पैसे काढण्यासाठीच्या शुल्कात बदल होऊ शकतो, जो वाढू शकतो. नियमांनुसार, तुम्ही एटीएममधून दर महिन्याला फक्त ३ वेळा मोफत पैसे काढू शकता. मात्र, त्यानंतर प्रत्येक व्यवहारासाठी २५ रुपये शुल्क आकारले जाईल. यापूर्वी २० रुपये शुल्क आकारले जात होते.

**व्याज दर बदल :** बचत खात्यांवर जास्त व्याजाचा लाभ स्टेट बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँकेसह इतर बँका देऊ शकतात. १ फेब्रुवारीपासून बचत खात्यावरील व्याजदर ३ टक्क्यांवरून ३.५ टक्के केले जाण्याची शक्यता आहे.


**किमान शिल्लक मध्ये बदल :** १ फेब्रुवारीपासून किमान शिल्लक रकमेत बदल होणार आहे. अशा स्थितीत खातेदारांना बचत खात्यात अधिक किमान रक्कम ठेवावी लागेल. यापूर्वी खातेदारांनी स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये किमान ३,००० रुपये ठेवणे आवश्यक होते. त्याच वेळी, आता किमान शिल्लक वाढवून ५,००० रुपये होणार आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या ग्राहकांसाठी, त्यांच्या खात्यातील किमान शिल्लक रक्कम १,००० रुपयांवरून ३,५०० रुपये केली जाईल.

### डिजिटल बँकिंग सेवा -

- १ फेब्रुवारीपासून डिजिटल बँकिंग सेवांमध्येही बदल होणार आहेत. ऑनलाइन आणि मोबाइल बँकिंगशी संबंधित सुविधांचा विस्तार केला जाईल. व्यवहार सुरक्षित आणि जलद बनवून नवीन सेवा जोडल्या जाऊ शकतात. डिजिटल पेमेंट करून अधिक कॅशबॅकचा लाभ मिळवू शकतात.

## सुटकेचा आनंद...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**इस्रायल** ७ ऑक्टोबर २०२२ रोजी हमास या दहशतवादी संघटनेने इस्रायलच्या नागरिकांचे अपहरण केले होते, त्यातील काही ओलिसांची सुटका करण्यात आल्यानंतर, त्यांच्या कुटुंबियांना मोठा आनंद झाला.

### तीन आमदारांनी दिला पक्षाचा राजीनामा

## विधानसभा निवडणुकीपूर्वी आम आदमीला धक्का

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** दिल्ली विधानसभा निवडणुकीपूर्वी आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. मतदानाच्या पाच दिवस आधी पक्षाच्या तीन आमदारांनी राजीनामे दिले आहेत. पक्षाने या तिन्ही आमदारांचे तिकीट कापले होते, त्यामुळे त्यांच्यात नाराजी होती. राजेश ऋषी, नरेश यादव आणि रोहित कुमार महरौलिया या पक्षाच्या तीन आमदारांनी शुक्रवारी आपल्या राजीनाम्याची घोषणा केली.

जनकपुरीमतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेले राजेश ऋषी यांनी आम आदमी पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वासह सर्व पदांचा राजीनामा दिला आहे.

अरविंद केजरीवाल यांना पाठवलेल्या राजीनाम्यात राजेश ऋषी यांनी आरोप केला आहे की, पक्ष आपली मूलभूत तत्त्वे सोडून भ्रष्टाचारात बुडाला आहे. संतोष कोळी यांच्या बलिदानाला अन्यायकारक वागणूक देण्यात आली, असेही त्यांनी लिहिले आहे. संतोष कोळी यांच्या मारेकऱ्याला तिकीट देण्यात आले, हा कार्यकर्त्यांचा विश्वासघात आहे. पक्षातील घराणेशाहीचा आरोपही त्यांनी केला आहे.

# अर्थसंकल्पापूर्वी शेअर बाजाराची जोरदार उसळी

अर्थ

**अर्थसंकल्पापूर्वी भारतीय शेअर बाजार शुक्रवारी चांगलाच उसळला. निर्देशांक ७४० अंकांनी वाढून बंद झाला. निफ्टीने २३,५०० चा टप्पा पार केला. सलग चौथ्या दिवशी निर्देशांक आणि निफ्टी वाढीसह बंद झाले आहेत. त्यामुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांच्या संपत्तीत एका दिवसात सुमारे ६.२६ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ब्रॉडर मार्केटमध्येही हिरवळ होती. बीएसईचा मिडकॅप निर्देशांक १.७६ टक्क्यांनी व स्मॉलकॅप निर्देशांक १.८३ टक्क्यांनी वाढून बंद झाला. सर्व क्षेत्रीय निर्देशांकही आज हिरवे राहिले. आजच्या व्यवहारादरम्यान भांडवली वस्तूंच्या समभागांमध्ये सर्वाधिक वाढ दिसून आली. याशिवाय तेल आणि वायू, पॉवर, रियल्टी, कंझ्युमर ड्युरेबल्स आणि युटिलिटी शेअर्सचे निर्देशांकही २% पेक्षा जास्त वाढीसह बंद झाले.

व्यवहाराच्या शेवटी, बीएसई सेन्सेक्स ७४०.७६ अंकांनी वाढून ७७,५००.५७ वर बंद झाला, तर निफ्टी २५८.९० अंकांच्या वाढीसह २३,५०८.४० वर बंद झाला.




### गुंतवणूकदारांनी ६.२६ लाख कोटी कमावले

- बीएसई वर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल गुरुवारी वाढून ४२४.१३ लाख कोटी रुपये झाले, जे त्याच्या आधीच्या ट्रेडिंग दिवशी ४१७.८७ लाख कोटी रुपये होते. अशा प्रकारे, सूचीबद्ध कंपन्यांचे मार्केट कॅप सुमारे ६.२६ लाख कोटी रुपयांनी वाढले. दुसऱ्या शब्दांत, गुंतवणूकदारांच्या संपत्तीत सुमारे ६.२६ लाख कोटी रुपयांची वाढ झाली आहे.

### या समभागांमध्ये सर्वाधिक वाढ -

- सेन्सेक्सच्या ३० पैकी २४ समभाग हिरव्या रंगात म्हणजेच वाढीसह बंद झाले. यामध्ये लार्सन अँड टुब्रोच्या शेअर्समध्ये सर्वाधिक ४.३१ टक्के वाढ झाली आहे. यानंतर नेस्ले इंडिया, इंडसइंड बँक, टायटन आणि टाटा मोटर्स २.७३ टक्क्यांपासून ते ४.२५ टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले.

## उजनी धरणात वाळू माफियांवर मोठी कारवाई



**इंदापूर :** जिल्हा प्रशासनाच्या मदतीने इंदापूर तालुक्याचे तहसीलदार जीवन बनसोडे व इंदापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सूर्यकांत कोकणे यांच्या नेतृत्वात महसूल व पोलीस प्रशासन यांच्या संयुक्त पथकाने उजनी जलाशयात इंदापूर तालुक्यातील पळसदेव येथून कळाशी पर्यंत पाठलाग करून वाळू माफियांच्या तीन बोटीं पकडल्या व त्या सर्व बोटी बुडवून नष्ट केल्या. सदर कारवाई मध्ये इंदापूरचे निवासी नायब तहसीलदार अविनाश डोईफोडे, इंदापूर मंडळ अधिकारी श्याम झोडगे, माळवाडी मंडळ अधिकारी औदुंबर शिंदे, पळसदेव मंडळ अधिकारी विठ्ठल पवार, लोणी देवकर मंडळ अधिकारी विश्वनाथ ढवणे ग्राम महसूल अधिकारी अशोक पोळ, नानासाहेब खताळ, कपिल थोरात, प्रफुल व्यवहारे, सूर्यकांत मोटे, प्रताप गायकवाड, महसूल सेवक घनश्याम सोनवणे, तहसील शिपाई संग्राम बंडगर, पोलीस पाटील सुनील राऊत, प्रदीप भोई, अरुण कांबळे, विजयकुमार करे व पोलीस कर्मचारी लक्ष्मण सूर्यवंशी व नंदू जाधव यांनी सहभाग घेतला.

# मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करा

## अजित पवार यांचे आदेश : पालखी मार्गावरील अपघातांची संख्या चिंताजनक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आळंदी-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गाच्या कामावरून रणकंदन पाहायला मिळाले. पुरंदर-हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी हडपसर-सासवड-जेजुरी रस्त्याच्या कामांवर होत असलेल्या अपघातांवरून आक्रमक पवित्रा घेतला. अखेर पालकमंत्री अजित पवार यांनी ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले. जिल्हा नियोजन समितीची बैठक विधानभवन पुणे येथे गुरुवारी पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या वेळी जिल्ह्यातील आमदार, खासदार व सर्व विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या वेळी आमदार विजय शिवतारे यांनी बैठकीत मांडलेली आकडेवारी पाहून पालकमंत्री अजित पवार देखील अवाक झाले. आ. शिवतारे म्हणाले, पालखी महामार्गावर दिवे घाटापासून निरापर्यंत मागील दीड वर्षात १३७ अपघात झाले असून, यात १०१ लोक मृत्युमुखी पडले. तर १३३ जबर जखमी झाले आहेत.

महामार्गाच्या ठेकेदाराने सुरक्षाविषयक उपाययोजना न करता प्रचंड निष्काळजीपणाने काम चालविले आहे. अनेक ठिकाणी दिशादर्शक व माहितीदर्शक फलक लावलेले नाहीत. त्यामुळे वाहनांचे जबर अपघात होत आहेत. गेल्या काही दिवसांत बेलसर फाटा, ढुमेवाडी, दिवे परिसरात मोठे अपघात होऊन जवळपास ७ ते ८ जण दगावले आहेत.


बेलसर फाट्यावर मृत्युमुखी पडलेल्या तिघांची व्यथा शिवतारे यांनी या वेळी सभागृहात मांडली. ती ऐकताच पालकमंत्री अजित पवार यांनी तत्काळ पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांना ठेकेदारावर सदोष मनुष्यवधाचे गुन्हे दाखल करावेत, असे आदेश दिले.

राष्ट्रीय महामार्ग विभागाचे प्रकल्प संचालक संजय कदम हे देखील शिवतारे यांच्या कचाट्यातून सुटले नाहीत. कदम हे बेजबाबदार अधिकारी असून, अशा पद्धतीने वागाल तर तुमच्याही कुटुंबाचे नुकसान झाल्याशिवाय राहणार नाही, अशा शब्दांत शिवतारे यांनी सुनावले. या वेळी संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्यात येणार असल्याची माहिती केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आपल्याला दिल्याचे खासदार सुप्रिया सुळे यांनी सभागृहात सांगितले.

## सायल रहेमान शेख सीएची परीक्षा उत्तीर्ण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** सायल रहेमान शेख या युवतीने कठोर परिश्रम घेऊन सि.ए.ची परिक्षा उत्तीर्ण झाली आहे.



तिच्या या यशाबद्दल माळेगांव व परिसरात तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अत्यंत सर्वसामान्य कुटुंबातील सायल रहेमान शेख हिचे वडील किराणा दुकान व थोडी शेती करुन आपला उदरनिर्वाह चालवत आहेत, तर आई गृहिणी आहे. तिचे शालेय शिक्षण ज्ञानदीप बालक मंदिर, एसएसएम हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय माळेगांव येथे झाले, तर बारावी ह्युम मेकहेनरी स्कूल व क्लाईन मेमरी स्कूल बिबवेवाडी तर एसपी कॉलेज पुणे येथे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. तिच्या यशासाठी आई शरीफा शेख, वडील रहमान शेख, विक्रमसिंह राजे जाधवराव, योगेंद्रसिंह, विरेंद्र सिंह, अ‍ॅड.सोनाक्षी, डॉ. नेहा जाधवराव व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## गावाचा सन्मान म्हणजे सर्वोच्च सन्मान




**शिक्रापूर :** शिक्षकांच्या कार्यामुळे गावामध्ये गावाने केलेला सन्मान हा हृदयस्पर्शी आणि सर्वात मोठा सर्वोच्च सन्मान असून, त्या सन्मानाची तुलना आकाशा पेक्षा उंच वाटून जास्त वाटते, तसेच या सन्मानामुळे शिक्षकांना काम करण्यात दहा हत्तीचे बळ मिळते, असे गौरवोद्गार प्राचार्य अनिल साकोरे यांनी व्यक्त केले. केंदूर येथील स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर संचलित सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज या शाळेला शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा या उपक्रमांतर्गत शाळेला तालुका स्तरावर द्वितीय क्रमांक मिळून दोन लाखांच्या बक्षिसास शाळा पात्र झाल्याने शाळेचे प्राचार्य व सर्व शिक्षकांचा ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी प्राचार्य अनिल साकोरे बोलत होते. सरपंच प्रमोद पऱ्हाड, उपसरपंच शालन भोसुरे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे विभागीय सदस्य राम साकोरे, माजी सरपंच सूर्यकांत थिटे, अमोल थिटे, सुनिल थिटे सोसायटीचे चेअरमन अभिजित साकोरे, माजी उपसरपंच भरत साकोरे, भाऊसाहेब थिटे, मंगेश भालेकर, सामाजिक कार्यकर्ते उमेश साकोरे, शाळा व्यवस्थापन समितीचे तज्ञ संचालक श्रीहरी पऱ्हाड, ज्ञानेश्वर थिटे, बन्सी पऱ्हाड, बाळासाहेब साकोरे यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक राम साकोरे यांनी केले, तर माजी उपसरपंच भरत साकोरे यांनी आभार मानले.

# आदिवासी पिकवतात विदेशी भाजीपाला

## आइसबर्ग (लेट्युस), रेड कॅबेज, ब्रोकोली, झुकिनी यांचे पिक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** आंबेगावच्या पश्चिम आदिवासी भागात भात हे प्रमुख पिक आहे. अलिकडच्या काळात आदिवासी शेतकरी भात, हरभरा, नाचणी, वरई या पारंपारिक पिकांव्यतिरिक्त वेगवेगळी पिके घेवू लागला आहे.

तळेघर ता. आंबेगाव येथील सखुबाई भागुजी पारधी यांनी आपल्या शेतात परदेशी भाजीपाला आइसबर्ग (लेट्युस), रेड कॅबेज, ब्रोकोली, झुकिनी ही पिके घेतली असून या पिकांची वाढ चांगली झाली आहे. बहुतांश परदेशी भाज्यांचे उत्पादन थंड हवामानातच चांगल्या प्रकारे होत आहे. त्यामुळे भिमाशंकर परिसरात पोषक वातावरण असल्याने यावर्षी प्रायोगिक तत्वावर परदेशी भाजीपाला लागवड केल्याचे प्रयोग यशस्वी ठरला आहे.

या परदेशी भाज्या ह्या बहुतांश वेळी कच्च्या स्वरुपात म्हणजेच सॅलड म्हणूनच खाण्यासाठी वापरल्या जातात. सध्या शहरामधील हॉटेल्समध्ये या परदेशी भाज्यांचा वापर होतो. तसेच पिज्जा, बर्गर मध्ये आइसबर्ग (लेब्लुस) या भाजीचा मोठ्या प्रमाणात वापर होतो.



तळेघर (ता. आंबेगाव) येथील सखुबाई पारधी यांनी पिकविलेला परदेशी भाजीपाला.

"परदेशी भाजीपाल्यांची ५ गुंठे क्षेत्रात लागवड केली असून रोपे व ठिबक सिंचनासाठी १० हजार रुपये, शेणखत, मल्चिंग पेपर, बेड तयार करणे व बुरशीनाशक औषधांचा खर्च ७ हजार रुपये असा एकूण १७ हजार रुपये खर्च आला आहे. पिकवलेला सर्व भाजीपाला पुणे येथील एका हॉटेलला पाठविला जातो. परदेशी भाजीपाल्याचे उत्पादन चांगले मिळत असून उत्पन्नही चांगले मिळते. त्यामुळे हा प्रयोग यशस्वी झाला आहे."

- सखुबाई भागुजी पारधी, तळेघर ता. आंबेगाव.

• झुकीनी - ही एक पौष्टिक दाट भाजी आहे जी, आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स प्रदान करते. यामध्ये कॅलरी कमी आणि पाण्याचे प्रमाण जास्त आहे. झुकीनी ब्लॉसम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या झुकीनी वनस्पतीची फुले देखील खाण्यायोग्य आहेत.

• ब्रोकोली - हे कोबीवर्गीय पीक असून त्यामध्ये उच्च तंतुमय पदार्थ, पुरेशी जीवनसत्वे आणि उष्मांक कमी असल्यामुळे ब्रोकोलीला पोषणमुल्यांचा मुकुटमणी असे म्हटले जाते. ब्रोकोली ही एक पौष्टिक भाजी असुन ब्रोकोली उच्च रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग यासारख्या रोगांवर गुणकारी अशी औषधी वनस्पती आहे. बर्गर, पॅटीस, सॅलड व सुपमध्ये मोठ्या प्रमाणात वापर होतो.

• आइसबर्ग लेट्युस - पाने अतिशय पातळ, कुरकुरीत, चवीने गोडसर व रसाळ असतात. लेट्युसमध्ये फॉस्फरस, सोडियम, गंधक, मॅग्नेशियम आदी खनिजे भरपूर प्रमाणात असतात. • रेड कॅबिज - लाल पानकोबीमध्ये विविध प्रकारचे पोषक आणि जीवनसत्त्वे असतात. आवश्यक घटकांमध्ये थायमिन, राइबोफ्लेविन, कॅल्शियम, मँगनीज, मॅग्नेशियम, लोह, पोटॅशियम, व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन के, आहारातील फायबर आणि बी जीवनसत्त्वे यांचा समावेश आहे.

## आंबेगाव तालुक्यातील शैक्षणिक गुणवत्ता चांगली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रांजणी :** शिक्षकांनी शाळा राबवत असलेले विद्यार्थ्यांचे नाविन्यपूर्ण उपक्रम व विविध गुणदर्शन कार्यक्रम गावातील ग्रामस्थांना दाखवून शाळेच्या मदतीसाठी आवाहन करावे. शंभर दिवस कृती कार्यक्रम, सखी सावित्री समिती, कार्यालयाचे सुशोभिकरण,अभिलेखांचे वर्गीकरण, जुन्या वस्तूंचे निर्लेखन, शालेय उपक्रम पीपीटी बनवून शालेय रेकार्ड अद्ययावत ठेवावे. तालुका शिक्षण विभागाने आराखडा बनवला असून प्रत्येक शाळेत सीसीटीव्ही बसवले जाणार आहेत. शिक्षक हे अध्यापनाचे दर्जेदार काम करत असल्याने आंबेगाव तालुक्यातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे," असे प्रतिपादन पंचायत समिती आंबेगावचे गटशिक्षणाधिकारी जीवन कोकणे यांनी केले.

पोखरी (ता. आंबेगाव) येथील पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालयात 'जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,पुणे' आणि 'जिल्हा परिषद पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा प्राथमिक शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या मार्गदर्शनाखाली तळेघर बीटमधील राजपूर, गोहे बुद्रुक व पोखरी केंद्रातील पंच्याऐंशी प्राथमिक शिक्षकांची शिक्षण परिषद नुकतीच संपन्न झाली. यावेळी शिक्षकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. शिक्षणविस्तार अधिकारी प्रेमलता साळुंखे,प्राचार्य शशिकांत साळवे, केंद्रप्रमुख लहू घोडेकर, वसंत गेंगजे, नयना चौधरी, शिक्षक पतसंस्था सभापती संजय केंगले, संचालक शंकर गवारी आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. प्रास्ताविक केंद्रप्रमुख लहू घोडेकर यांनी केले तर आभार शिक्षक विजय डोके यांनी मानले.

## रस्ते अपघातातील अपघातग्रस्तांना मदत करा



**बारामती :** रस्ते अपघातातील अपघातग्रस्तांना मदत करा, जीवनदूत बना, वाहन चालवितांना वाहतुकविषयक नियमांचे पालन करावे तसेच स्वयंशिस्त ही महत्वाची बाब असून त्याचे पालन करुन वाहन चालविल्यास अपघाताचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असे प्रतिपादन 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने आयोजित 'रस्ता सुरक्षा अभियान-२०२५' समारोप समारंभाच्या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे, मोटार वाहन निरीक्षक बजरंग कोरवले, सहायक मोटार वाहन निरीक्षक हेमलता मुळीक हर्षदा खारतोडे, रिक्षा चालक मालक संघटनेचे अध्यक्ष प्रशांत सातव, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सचिन गाडेकर, प्रा. डॉ. अशोक काळंगे आदी उपस्थित होते. यावेळी पाटील यांच्या हस्ते रस्ते सुरक्षा जनजागृतीच्या अनुषंगाने घेण्यात आलेल्या चित्रकला व निबंध स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण तसेच रस्ता सुरक्षा संबंधित विविध कार्यक्रमात उस्फूर्तपणे सहभागी झालेल्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी वाहन वितरक, पत्रकार, मोटार ड्रायव्हिंग स्कूल संघटनेचे पदाधिकारी, बारामती बुलेट क्लब व रेसिंग क्लबचे सदस्य, अग्निशमन विभागाचे अधिकारी, महाविद्यालयीन कर्मचारी व विद्यार्थी आदी उपस्थित होते.

## दूध व्यवसाय आर्थिक संकटात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** विधानसभा निवडणुका झाल्यानंतर सरकारने दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिले जाणारे सात रुपये अनुदान पूर्णपणे बंद केल्याने दूध व्यवसाय आर्थिक संकटात सापडला आहे. दूध व्यवसायाला सरकारने भरीव मदत केल्यावरच दूध व्यवसाय सावरेल, अन्यथा दूध व्यवसाय ग्रामीण भागाचा आर्थिक कणा तुटण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सरकारने दूध व्यवसायवाढीसाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन दूध उत्पादक शेतकऱ्यांनी सरकारला केले आहे.

राज्य सरकारने निवडणुकीच्या आधी दुधाला ३.५ आणि ८.५ एसएनएफला ३० रुपये लिटर दर व लिटरला ५ रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर हा निर्णय बदलून ३.५ आणि ८.५ एसएनएफला २८ रुपये दर व ७ रुपये अनुदानाचा निर्णय घेतला. हे अनुदान नोव्हेंबरपर्यंतच होते. सद्य:स्थितीत दुधाला लिटरला २८ रुपये मिळणारा दर ३० रुपये झाला असला, तरी पशुखाद्याचे दर गगनाला भिडले आहेत. पशुकांडीच्या दरामध्ये याअगोदरच वाढ झाली असून, आता भुश्याचे दर १३० ते १४० रुपयांनी वाढले आहेत. त्यामुळे दूध उत्पादक शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे.

एका बाजूला चाऱ्याचा भाव देखील मोठ्या प्रमाणात वाढला असून, इतरही खर्च मोठ्या प्रमाणामध्ये वाढला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे हा दूध व्यवसाय करायचा कसा? हा प्रश्न शेतकऱ्यांना भेडसावत आहे. दरम्यान, दुधामध्ये भेसळीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. या भेसळखोरांना आवर घातली नाही आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही.

## रस्ता गेला खड्डयात...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**लोणी-धामणी** लोणी ते मंचर (ता. आंबेगाव ) या रस्त्यावर लोणी लगत व जारकरवाडी येथील भोजनधरा लगत जागोजागी खडे पडले असून, काही ठिकाणी रस्ता उघडायला सुरुवात झाली आहे.

## आंबेगाव पठारचे तळजाईमाता आणि सासवडचे मेघमल्हार भजनी मंडळ प्रथम

# चंदूकाका जगताप यांच्या पुण्यस्मरणानिमित्त भजन स्पर्धा संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** सहकारमहर्षी चंदूकाका जगताप यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त माजी आमदार संजय जगताप यांच्या आयोजनातून आणि सासवड सांस्कृतिक मंडळ व बोपगाव भजनी मंडळ यांच्या संयोजनातून येथील संत सोपानकाका महाराज समाधी मंदिराच्या प्रांगणात दोन दिवस भजन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे बक्षीस वितरण गुरूवारी झाले. यामधे खुल्या गटात आंबेगाव पठारच्या तळजाईमाता महिला भजनी मंडळाने, तर बाल गटात सासवडच्या मेघमल्हार बाल भजनी मंडळाने प्रथम क्रमांक पटकाविला. ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

चंदूकाका जगताप यांच्या कुटुंबीयांच्या वतीने आणि सनदी अधिकारी राजेंद्रबापू जगताप व पुरंदर हवेलीचे आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. बाल गटामध्ये उत्कृष्ट गायक म्हणून नादब्रह्म बाल भजनी मंडळ खळद, उत्कृष्ट मृदुंग वादक प्रेमराज भजनी मंडळ फुरसुंगी, उत्कृष्ट हार्मोनियम वादक बाल भजनी मंडळ पवारवाडी यांना देण्यात आला. खुल्या गटामध्ये उत्कृष्ट तबला वादक सिद्धेश्वर भजनी मंडळ नायगाव, उत्कृष्ट हार्मोनियम वादळ अष्टविनायक




सासवड (ता. पुरंदर) भजन स्पर्धेतील विजेत्यांना राजवर्धिनी जगताप आणि मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

भजनी मंडळ आंबेगाव पठार, उत्कृष्ट गायक म्हणून विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळ एखतपूर यांना पुरस्कार देण्यात आले. संगित विशारद ज्ञानेश्वर ढवळे, तबला अलंकार सतिश काळे यांनी स्पर्धांचे परीक्षण केले. सुप्रसिद्ध निवेदक महेश राऊत यांनी सोहळ्याला साजेसे निवेदन केले. तबला विशारद अमोल बेलसरे, संगीत अलंकार ऐश्वर्या कामठे, तात्यासाहेब फडतरे यांच्या गायनाने समारोप झाला.

### वारकरी संप्रदायाला प्रोत्साहन

● चंदुकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आमदार संजय जगताप यांनी राबविलेल्या उपक्रमामुळे सांप्रदायिक चळवळीला बळ, उत्तम व्यासपीठ मिळाले. भजनी मंडळांना सात वर्षांत हार्मोनियम, पकवाज, तबला, वीणा, टाळ, सतरंजी तसेच सकल गाथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी, सोपानदेवी, अभंगाचे वितरण करण्यात आले आहे. यामुळे नवीन पिढीही या संप्रदायाकडे वळत आहेत. याबद्दल संजय जगताप यांचे परीक्षक सतिश काळे व ज्ञानेश्वर ढवळेंनी कौतुक केले.

विजेते संघ अनुक्रमे पुढीलप्रमाणे - खुला गट - तळजाईमाता महिला भजनी मंडळ आंबेगाव पठार, कानिफनाथ भजनी मंडळ बोपगाव, संत ज्ञानेश्वर भजनी मंडळ हांडेवाडी, सदगुरू कृपा महिला भजनी मंडळ शेवाळेवाडी आणि नादब्रह्म महिला भजनी मंडळ खळद.

बाल गट - मेघमल्हार बाल भजनी मंडळ सासवड, प्रेमराज बाल भजनी मंडळ फुरसुंगी, श्री शिवाजी इंग्लिश मीडियम बाल भजनी मंडळ सासवड, श्रुतीनंदन बाल भजनी मंडळ सासवड आणि नवखंडेनाथ बाल भजनी मंडळ गराडे. दोन्ही गटांतील विजेत्यांना अनुक्रमे ११, ९, ७, ५ आणि ३ हजार रुपये रोख, प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह तसेच सहभागी संघांना ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या माध्यमातून सोपानदेवी ग्रंथ, अभंग देण्यात आले. याप्रसंगी प्रदीप पोमण, प्रकाश पवार, म्हस्कू दळवी, वसंतराव शिंदे, अजित जगताप, शरदचंद्र जगताप, सुनिता कोलते, अंकुशराव जगताप, आनंदराव घोरपडे, डॉ विनायक खाडे, सुधाकर गिरमे, महादेव टिळेकर, अनिल उरवणे, सतिश शिंदे, हरीभाऊ शिंदे, बापू दळवी, संभाजी काळाणे, स्वाती होले, विठ्ठल मोकाशी, रविंद्र पवार, नंदकुमार जगताप, चेतन महाजन, मिनल कुंभारकर उपस्थित होते.

#रा

» Selected

## ऊस पाचट व्यवस्थापन करण्याचे आवाहन



**बारामती :** शेतकऱ्यांनी उसाचे पाचट न जाळता त्याचे व्यवस्थापन करावे, यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब आणि जमिनीची सुपीकता वाढ होण्यासोबतच जमिनीचा पोतही सुधारण्यास मदत होते, त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी ऊस पाचट व्यवस्थापन करावे, असे आवाहन कृषी विभागाच्यावतीने करण्यात आले आहे. कुरणेवाडी येथे 'क्रॉपसॅप'अंतर्गत आयोजित ऊस पीक शेतीशाळा आयोजित करण्यात आली. यावेळी वडगाव निंबाळकर कृषी पर्यवेक्षक प्रताप कदम, कृषी सहाय्यक प्रवीण गायकवाड, शेतकरी तानाजी पवार, पांडुरंग काळभोर, दत्तात्रय काळभोर, संजीवन सावंत, बाळासाहेब कोकरे, चंद्रशेखर पवार, छाया पवार ,जागृती सावंत, शिवाजी तावरे, कांतीलाल शिंदे, मयूर शेडगे आदी शेतकरी उपस्थित होते. कदम म्हणाले, उसाची तोडणी झाल्यानंतर उसाचे पाचट कुट्टी करावी. उसाचे बुडक्यावरील पाचट बाजूला सारून बुडके छाटणी करावी. त्यानंतर दहा लिटर पाण्यामध्ये दहा ग्रॅम बाविस्टिन याची फवारणी करून घ्यावी. प्रती हेक्टरी 80 किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट, पाचशे किलो शेणखतामध्ये दहा किलो पाचट कुजविणारे जिवाणू मिसळून घ्यावे जेणेकरून पाचट लवकर कुजेल आणि त्याचा लाभ होईल, असे असे आवाहन कदम यांनी केले.

# भाडेवाढ विरोधात रास्ता रोको

## एसटीची १५ टक्के दरवाढ मागे घेण्याची उबाठाची मागणी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**खेड :** सरकारने एसटीबस प्रवासात केलेली सुमारे १५ टक्के दरवाढ तात्काळ मागे घ्यावी, या मागणीसाठी शिवसेना (उबाठा) गटाच्या वतीने राजगुरूनगर येथे पुणे नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतृत्व आमदार बाबाजी काळे यांनी केले.

राज्य सरकारने एसटी बस प्रवास दरांत १५ टक्के भाडेवाढ केली आहे. ती सर्वसामान्य नागरीकांना न परवडणारी आहे. एकीकडे महागाईला तोंड देत असताना आता सरकारने १४.९७ टक्के दरवाढ केली आहे. याचा राज्यातील ग्रामीणभागातीळ जनतेवर मोठा आर्थिक ताण येणार आहे. राज्यभर या दरवाढीचा निषेध केला जात आहे. ही पठाणी दरवाढ सर्वसामान्य माणसाला परवडणारी नाही, असे आमदार बाबाजी काळे यांनी म्हटले आहे.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड, तालुकाप्रमुख रामदास धनवटे, महिला जिल्हा संघटक विजयाताई शिंदे, माजी तालुका प्रमुख सुरेश चव्हाण, महिला आघाडी तालुकाप्रमुख उर्मिला सांडभोर ग्राहक संरक्षण कक्ष जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब ताये, युवा सेनेचे मृण्मय काळे, बी के कदम, शहर प्रमुख संतोष उर्फ पप्पु राक्षे, राहुल मलघे, चैतन्य गायकवाड, पूनम पोतले, सुदाम कराळे, किरण गवारे, गणेश नाणेकर, मंगेश पऱ्हाड,सरपंच माऊली कड, राजु चौधरी, विश्वास नेहरे, सुभाष कदम, सचिन राक्षे, निलेश वाघमारे,दिपक कांबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक नागरिक जेष्ठ महिला उपस्थित होत्या.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, एसटी बस मधून सुविधा मिळत नाही. खिळखिळ्या बसने सर्वसामान्य नागरिक प्रवास करीत आहेत. बस स्थानकांमध्ये सौयी सुविधा मिळत नाहीत.तरीही ग्रामीण भागातील नागरिक विद्यार्थी एसटीने प्रवास करीत आहे असे असताना सरकारने जुजबी १५ टक्के भाडेवाढ केली आहे.

ही भाडेवाढ चुकीची आहे सर्वसामान्य माणसाला ती न परवडणारी आहे. सरकारने भाडेवाढ तात्काळ मागे घ्यावी. एसटीचा प्रवास सर्वसामान्य माणसाला सुखकर करावा. यावेळी विजया शिंदे, रामदास धनवटे,अशोक खांडेभराड यांनी मनोगत व्यतक केले. मागण्यांचे निवेदन खेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रभाकर मोरे याना देण्यात आले. दरम्यान वाहतूक कोंडी झाली. चक्का जॅम मुळे प्रवाशाना काही काळ वाहनामध्ये अडकून पडावे लागले. आंदोलनानंतर पोलिसांनी वाहतूक सुरळीत केली.

## शिक्षक पतसंस्था, संचालकपदी भानुदास हंबीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**कारेगाव :** शिरुर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालक पदी भानुदास ज्ञानोबा हंबीर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्ह्यातील अग्रगण्य असणारया शिक्षक पतसंस्थेच्या तज्ज्ञ संचालक पदावर पीएमश्री शिरूर नगरपरिषद शाळेतील आदर्श शिक्षक हंबीर यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली. रिक्त झालेल्या संचालक निवडीसाठी एकमेव अर्ज आल्याने हंबीर यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करण्यात आले. या वेळी पतसंस्थेच्या सभापती शर्मिला निचित, सचिव रामचंद्र नवले, विजय गोडसे, संतोष विधाटे, शिवाजी वाळके, म्हतारबा बारहते, चंद्रकांत खैरे, संदिप थोरात, अंजली शिंदे, मानसी थोरात यांच्यासह संचालक मंडळ उपस्थित होते.

## प्रथमेश मोरे जेजुरी भूषण पुरस्काराने सन्मानित



**जेजुरी :** मां साहेब प्रतिष्ठान जेजुरी आयोजित शालेय मल्हार महोत्सव कार्यक्रमात संगीत सम्राट किताब विजेते, प्रसिद्ध सेक्सोफोन वादक प्रथमेश राजेंद्र मोरे यांना जेजुरी भूषण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. माँ साहेब प्रतिष्ठान जेजुरीच्या वतीने कलावंताची नगरी असलेल्या जेजुरी नगरतील शालेय मुलांच्या सुप्त कलागुणांना संधी देण्यासाठी सलग ३२ व्या वर्षी शालेय सांस्कृतिक मल्हार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी देश विदेशात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जेजुरी शहरातील व्यक्तींना जेजुरी भूषण पुरस्कार प्रदान केला जातो. यंदाचा पुरस्कार जेजुरी येथील खंडोबा देवाचे मानकरी,सनई चौघडा वादक,व संपूर्ण देशभर सेक्सोफोन वादनात नाव लौकीक मिळविलेले प्रथमेश मोरे यांना माजी आमदार प्रकाश देवळे यांच्या हस्ते जेजुरी भूषण पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. या महोत्सवाचे आयोजन मां साहेब प्रतिष्ठानचे डॉ प्रसाद खंडागळे,गणेश जगताप,नितीन राऊत,प्रकाश खाडे,डॉ नितीन केंजळे,प्राचार्य बाळासाहेब झगडे,गिरीष महामुनी,पुष्कर खाडे, अजय पठाण आदींनी केले.

# वकील संघटनेचा निषेध मोर्चा

## तहसील कार्यालयातील अधिकाऱ्याची अरेरावी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** खेडचे निवासी नायब तहसीलदार यांनी केलेले बेजबाबदार वक्तव्य आणि गैरवर्तणूकीच्या विरोधात खेड वकील बार असोशिएशनच्या वतीने प्रांत अधिकारी, खेड तहसीलदार कार्यालयावर गुरुवारी निषेध मोर्चा काढण्यात आला. तहसील कार्यालया बाहेर जोरदार घोषणा देण्यात आल्या.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, वकील संघटनेचे जेष्ठ सदस्य अँड. विलास काळे आणि निवासी नायब तहसीलदार मदन जोगदंड यांच्यात चार दिवसांपूर्वी हमरीतुमरी झाली होती. पोलिसांना बोलावण्यात आले होते.

दोन्ही बाजूकडून पोलिसात जाण्यापर्यंत वाद झाला होता. या घटनेनंतर वकील संघटना आक्रमक झाली. यापूर्वीही खेडचे प्रांत कट्यारे, तहसीलदार बेडसे यांच्या कामकाजाच्या विरोधात वकिलांमध्ये नाराजी होती. त्यावेळीही निषेध मोर्चा काढण्यात आला होता. त्यानंतर तहसीलदार ज्योती देवरे यांच्यात आणि वकिलांसोबत वादावादी झाली होती.

आताही वकील आणि निवासी नायब तहसीलदार यांच्यात संघर्ष झाला. निषेध मोर्चा काढून महसुली न्यायालयामध्ये दि.३० व ३१ जानेवारी २०२५ रोजी असा दोन दिवस कामकाजावर वकिलांनी बहिष्कार टाकण्यात आला.निवासी नायब तहसीलदारांचे तात्काळ निलबंन करावे. निलंबन कारवाई न केल्यास तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्याचा इशारा खेड वकील बार असोसिएशनच्या वतीने देण्यात आला. मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार मनीषा खैरे यांनी स्वीकारले. या निषेध आंदोलनात खेड बार असोसिएशनचे अध्यक्ष रोहिदास टाकळकर, ज्येष्ठ विधीज्ञ अॅड पोपटराव तांबे पाटील , अॅड विलास काळे यांच्या सह सर्व पदाधिकारी सदस्य सहभागी झाले होते.

## श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथे बैलगाडा शर्यतींचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आंबेगाव :** श्री गणेश जयंती उत्सवानिमित्त श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथे शनिवार, दि. १ फेब्रुवारी रोजी समाजप्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे कीर्तन होणार आहे. तर २ फेब्रुवारीला बैलगाडा शर्यतींचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती श्री स्वयंभू मोरया देवस्थान ट्रस्टच्या वतीने देण्यात आली आहे.

श्री स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती देवस्थान श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथे श्री गणेश जयंती उत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. १ रोजी पहाटे पूजा, अभिषेक व आरती होणार आहे सकाळी नऊ वाजता हारतुरे व मांडव डहाळे मिरवणूक काढण्यात येणार आहे.

अग्रभागी लेझीम पथक असणार आहे सकाळी १० ते १२ या वेळेमध्ये समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज देशमुख यांचे देवजन्माचे कीर्तन होणार असून त्यानंतर भाविकांना महाप्रसाद दिला जाणार आहे दुपारी भजनाचा कार्यक्रम व त्यानंतर ढोल झांज पथक व बाल वारकऱ्यांच्या साथीमध्ये श्रींच्या प्रतिमेची मिरवणूक काढली जाणार आहे.

सायंकाळी सात वाजता महाआरती व त्यानंतर स्वर मल्हार हा गाण्यांचा कार्यक्रम होणार आहे. २ फेब्रुवारी रोजी निमंत्रित बैलगाड्यांच्या भव्य शर्यती होणार आहेत. त्यासाठी १ लाख ९० हजार रुपये रोख, चार मोटरसायकल, दोन सोन्याच्या अंगठ्या, दोन फ्रिज, दोन टीव्ही, असे बक्षीस विजेत्या बैलगाडा मालकांना दिले जाणार आहे.

## सर्वांच्या सहभागाने सामाजिक कार्य उंचवावे



**इंदापूर :** राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे राष्ट्रीय सेवा योजना व कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर , कला ,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय भिगवन आणि श्रीमती रत्नप्रभादेवी पाटील महाविद्यालय बावडा यांच्या संयुक्त विद्यमाने बिजवडी ता. इंदापूर येथे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे दि. २४ ते ३० जानेवारी दरम्यान आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या समारोपप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भिगवण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव वाळुंज यांनी हे मत व्यक्त केले. युथ फॉर डिजिटल भारत , युथ फॉर डिजिटल लिटरसी हा उद्देश घेऊन शिबिरात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले . मुंबई येथे राष्ट्रीय सेवा योजना आरडी परेडसाठी भिगवण महाविद्यालयाची विद्यार्थिनी प्रियंका चव्हाण हिची निवड झाली होती, तिचा सत्कार या वेळी मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. सूत्रसंचालन इंदापूर महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. पुरुषोत्तम साठे यांनी केले. तर आभार बावडा महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. तयाजी लोंढे यांनी आभार मानले. कार्यक्रमाधिकारी प्रा. उत्तम माने, प्रा. मनीषा गायकवाड, प्रा. धन्यकुमार माने, प्रा. सागर गुजराथी यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रयत्न केला.

## श्रीजाणाई देवी मंदिराचे काम पूर्णत्वास

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या श्रीखंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता श्रीजाणाई देवीच्या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम पूर्णत्वास आले आहे. नूतन मंदिरात देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण विधी १६ फेब्रुवारीपासून सुरू होणार असल्याचा निर्णय जेजुरीकर ग्रामस्थांच्या बैठकीत घेण्यात आला.

तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीचे श्रद्धास्थान व जागृत दैवता जाणाई देवीचे मंदिर ऐतिहासिक होळकर तलावाकाठी असून हे मंदिर जीर्ण झाल्याने २०१७ मध्ये जेजुरीकर ग्रामस्थांच्या वतीने लोक सहभागातून मंदिराच्या जिर्णोद्धारास सुरुवात करण्यात आली. अतिशय रेखीव दगड वापरून भव्य स्वरूपात मंदिर उभारण्यात आले आहे. या मंदिरासाठी सुमारे चार कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. यासाठी जेजुरीकर नागरिक, जाणाई देवी भक्त व श्री मार्तंड देवसंस्थानने उचलला आहे. देवसंस्थानच्या माध्यमातून सुमारे दीड कोटी रुपये मंदिरासाठी देण्यात आले.

या बैठकीत दिनांक १६ फेब्रुवारी रोजी जाणाई देवीच्या नवीन मूर्तीची जेजुरी शहरातून पारंपरिक पद्धतीने मिरवणूक, दि १७ रोजी वास्तू शांत, दि १८ रोजी गणेश पूजन, नवग्रह पूजन, चंडीयाग, कुमारिका पूजन, दि १९ रोजी लघुरुद्र, श्री मल्हारी सहस्त्रनाम याग, दि २० रोजी देवीच्या मूर्तीला स्नान,अभिषेक महापूजा व दि २१ रोजी मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना व कलश रोहण, महाप्रसाद आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## जीर्णोद्धार पूर्ण...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



जेजुरी

जेजुरी नगरीची ग्रामदेवता श्रीजाणाई देवीच्या मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम पूर्णत्वास आले आहे.

## पाचर्णे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा सर्वांगिण विकास

# लोकसहभागातून जिल्हा परिषद शाळेचा कायापालट

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा म्हटले कि मोडकळीस आलेल्या इमारती, भौतिक व शैक्षणिक सुविधाचा अभाव आणि एक किंवा दोन शिक्षक यांच्यावर विदयार्थ्यांना शिकविण्याचा असणारा मोठा ताण, परंतु शिक्षकांची दूरदृष्टी आणि स्थानिक ग्रामस्थांचा लोकसहभाग यामुळे करडे येथील पाचर्णे वस्तीवरील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे रुपडेच (कायापालट) अवघ्या काही महिन्यातच बदलले असल्याचे दिसून आले.

पाचर्णे वस्ती येथील शाळा ही शैक्षणिक व भौतिक आणि गुणवत्तेपासून वंचितच होती, परंतू गुणवत्तेचा कळस गाठलेली शाळा कर्डेलवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत केलेल्या काम व अनुभवाच्या जोरावर मे २०२३ मध्ये कर्डेलवाडी येथील शाळेच्या शिक्षिका बेबीनंदा सकट यांनी पाचर्णेवस्ती शाळेच्या मुख्याद्यापिका म्हणून पदभार स्वीकारला.त्यावेळी या शाळेचा पट अवघा दहा होता.एक शिक्षक व केवळ दहा विद्यार्थी असलेली ही शाळा केव्हाही बंद पडेल यामुळे ही शाळा घेऊ नका असा सल्ला सकट यांना अनेक जणांनी दिला. पालक व स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेऊन शाळेचे रुपडे पालटण्याचा



पाचर्णे वस्ती, ता.शिरुर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे रुपडे लोकसहभागातून पालटले आहे. छाया : पोपट पाचंगे, कारेगाव.)

निर्णय घेतला.येथील उद्योजक सागर पाचर्णे, सागर बेंडभर, बाळराजे ठेमेकर, राहुल पाचर्णे, प्रकाश पाचर्णे,कैलास पाचर्णे यांनी अनेक होतकरु तरुणांना हाताशी धरुन त्यांच्या मदतीने शाळेचे रंगरुप बदलायला सुरुवात केली.

ग्रामपंचायतीच्या माध्यमातून परसबाग,कट्टे,व्यासपीठ, पेव्हिंग ब्लॉक बसवून शाळेचा परिसर अद्ययावत केला.अश्विनी लंघे यांच्या विशेष प्रयत्नांतून आयटीसी कंपनीने स्वछतागृह बांधून दिले. तसेच हॅन्ड वॉश स्टेशन,शुद्धपेय जल मशीन आणि सोलर सिस्टीम, वृक्षारोपनासाठी झाडे इ.मदत मिळाली. दरम्यानच्या काळात कल्याणी टेक्नो फोर्ज कंपनीने डिजीटल वर्गासाठी ५५ इंची टिव्ही, लॅपटॉप, शालेय फर्निचर पुरवले. शाळेचा लोकसहभाग दीड वर्षात वीस लाखांच्या घरात पोहोचला आहे. बघता बघता आज शाळा परिपूर्ण झाल्याने पालक व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त व्यक्त केले. माजी ग्रामपंचायत सदस्या पुष्पा नंदकिशोर रोडे यांनी ३० हजार रुपये किंमतीचे गेट नुकतेच बसवून दिले. तर प्रकाश पाचर्णे यांनी परसबागेसाठी काळी माती पुरवली.यावर्षी मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत या शाळेने शिरुर तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवून एक लाखाचे बक्षीस मिळवले आहे. अंगणवाडी सेविका मंदा श्रीमंत,शुभांगी इसवे व सहकारी शिक्षक संभाजी जगताप, दत्तात्रय सकट आणि केंद्रप्रमुख .संपत वाळके यांचे सहकार्य मिळत आहे.

### गुणवत्ता वाढीसाठी उपक्रम

● कर्डेलवाडी शाळेच्या धर्तीवरच या शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विविध उपक्रम हाती घेतले. लोकसहभागातून शाळा समृद्ध होऊ शकते याचे उदाहरण पाचर्णे वस्तीची शाळा आहे. ही शाळा गुणवत्तेच्या बाबत राज्य पातळीवर नेण्याचा आमचा मानस असल्याचे मुख्याध्यापिका बेबीनंदा सकट यांनी सांगितले.

#रा

## फंडू एसएमएस

घडी घडी सेल्फी लेने वाली
लडकियों के मोबाईल
कुछ टाईम बाद खुद ही
बोलते हैं... चलो मुंह
बनाओ, सेल्फी लेनी है!

एक बार याद करके तो
देखो... एक बार पुकार
के, कॉल करके दो देखो,
अगर हम ना आए तो समझ
लेना... हम सो गए हैं और
फोन सायलेंट पर है!

अल्फाज तय
करते है फैसले
किरदारों के...
उतरना दिल में है
या दिल से
उतरना है...

# नकारात्मक विचार येतात...



**लाईफ गुरू**

मी २० वर्षांचा तरूण आहे. शालेय जीवनापासूनच मी अभ्यासात हुशार आहे. पण सध्या माझं अभ्यासावरचं लक्ष उडालं आहे. मनात सतत नकारात्मक विचार येतात. आयुष्यात काहीच करू शकणार नाही, असं सतत वाटत राहतं. सगळं सोडून दूर कुठे तरी जावं, असं वाटू लागलं आहे. मी काय करू?

**उत्तर:** मित्रा, अभ्यासावरचं लक्ष उडण्यामागचं कारण तू स्पष्ट केलेलं नाही. तुला अपयश आलं आहे का? असं असेल तर यामुळे घाबरून जाऊनकोस. आयुष्यात कसोटीचे प्रसंग येत राहतात. त्याला पर्याय नाही. नकारात्मकता दूर ठेवण्याचा प्रयत्न कर. अभ्यासाकडे लक्ष दे. प्रश्नाच्या मुळाशी जाण्यासाठी समुपदेशकाची मदत घे. आयुष्यात कधी कधी नैराश्याचे प्रसंग येतात. हेच प्रसंग आपल्याला सक्षम बनवत असतात, पारखत असतात. त्यामुळे मनाला कणखर बनव आणि अभ्यासात मन रमव. आवडीच्या गोष्टी कर. मित्रांसोबत थोडा वेळ घालव. यामुळे तुझ्या मनावरचं मळभ दूर होईल.



**तो मोटिव्हेशनल स्पीकर आहे. आयआयटी इंजिनिअर आहे. इतकंच नाही, तर तो गातो, गिटार वाजवतो आणि पोहतोसुद्धा. सर्वसामान्य ऑलराउंडर मुलगा हे करू शकतो. पण, जन्मत:च अपंग असलेल्या शिवम पोरवालने स्वत:च्या मेहनतीने आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वत:चं जग निर्माण केलं .**

# जग शिवमचं...

**अचिव्हर**

शिवम पोरवाल फोकोमेलिया सिंड्रोम हा विकार घेऊनच जन्मला. हा विकार झालेल्या व्यक्तीला हात, पाय नसतात किंवा ते कार्य करत नाहीत. त्याच्या उजव्या हाताला तीनच बोटं आहेत तर डाव्या हाताचा अंगठा पहिल्या बोटाशी जुळलेला आहे. आजही तो गुडघ्यांवर चालतो. पण परिस्थितीपुढे त्याने हार मानली नाही. जन्म झाल्यानंतर ही अवस्था बघून त्याला मारून टाकण्याचा सल्ला अनेकांनी दिला. त्याला बघण्यासाठी लोक लांबून येत असत. त्याची मस्करी करत. सहानुभूती दाखवत पण सुरूवातीपासूनच शिवमने संघर्षाची तयारी केली होती. त्याने सर्वसामान्य मुलांसारखं जगण्याचं आव्हान स्वीकारायचं ठरवलं. तो मध्य प्रदेशमधल्या माहिदपूर या छोट्याशा गावी एकत्र कुटुंबात रहात होता. त्याचे वडिल पानाच्या ठेल्यावर काम करत असत. त्यांना महिन्याला अवघे १०० रूपये मिळत असत. इतर मुलांप्रमाणे तो शारीरिक कामं करू शकत नसला तरी नव्या गोष्टी झटपट शिकून घेत असे. प्रत्येक गोष्ट तो अगदी मनापासून करत असे. शिवमचा हाच गुण ओळखून वडिलांनी त्याला शिक्षण द्यायचं ठरवलं. शिक्षणामुळेच तो स्वावलंबी आणि सक्षम बनू शकेल, असं त्यांना वाटायचं. शाळेत असताना शिक्षकांना त्याचं कौतुक होतं पण, इतर मुलं त्याची मस्करी करत असत. सुरूवातीला तो हिंदी माध्यमात शिकला. त्यानंतर त्याला इंग्रजी माध्यमात घालण्यात आलं. इथेही स्वत:च्या बुद्धीच्या जोरावर त्याने नाव कमावलं. वडिलांनी त्याला स्कूटर आणून दिली. त्यामुळे तो एकट्याने प्रवास करू लागला. या घटनेने त्याच्या आयुष्याला नवं वळण मिळालं.

शिवमला सतत काही तरी नवं करायला आवडतं. तो पोहायला शिकला. प्रशिक्षकांनी त्याची पॅराऑलिम्पिकसाठी तयारी करून घेतली. त्याने गेट परीक्षा दिली. त्याला आयआयटी पाटणामध्ये प्रवेश मिळाला. त्याने बीएसएनएलमध्ये टेलिकॉम ऑफिसर म्हणून कामाला सुरूवात केली. आज तो कॉम्प्युटर इंजिनिअर, प्रोग्रामर आहे. मोटिव्हेशनल स्पीकर म्हणून तो भाषणं देतो. त्याला पोहता येतं, गाता येतं. तो कविता करतो. तो गिटार वाजवायला शिकला आहे. आशा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्याने सगळं मिळवलं आहे. इतरांसाठी आशास्थान बनण्याचा त्याचा मानस आहे.

# फंडे सेफ बायकिंगचे



**बायकिंग**

दोस्तांनो, मोटरसायकल कितीही आकर्षक वाटत असली तरी चार चाकी गाड्यांइतकी सुरक्षित नसते. झिप झॅप झूम... करत वाहतुकीतून वाट काढताना थ्रीलिंग वाटतं खरं! पण ते जीवघेणं तर ठरत नाही ना, याचा विचार व्हावा. बाईकवरून वाऱ्याच्या वेगावर स्वार व्हायला छान वाटतं. पण बाईक घसरली तर सुरक्षा मिळत नाहीं. तुम्ही स्वत: सुरक्षित राहायला हवंच. शिवाय इतरांच्या सुरक्षेचा विचारही करायला हवा. यासाठीच्या काही टिप्स...

बाईकचे लायसन्स मिळवण्यासाठी आधी ती आपल्याला यायला हवी. त्यामुळे आधी बाईक नीट शिकून घ्या. बाईक चालवण्याचं तंत्र शिकवणारे क्लासेस असतात. आपल्या सुरक्षेसाठी काय करायचं, याचे धडेही अशा ठिकाणी दिले जातात. नवी बाईक घ्यायची तर अशा क्लासेसना जाता येईल.

* दोस्तांनो, शॉर्टस आणि साध्या चपला घालून बाईक चालवणारे बरेचजण दिसतील. पण बाईक चालवताना सुरक्षा मिळावी, यासाठी कपडेही तसेच हवे. म्हणून अनेकजण लेदरचा वापर करताना दिसतात. लेदर जॅकेट्स आणि पँट्स घातल्याने बाईक घसरली तरी थोडी सुरक्षा मिळू शकते.
* बाईक चालवताना पायांनाही सुरक्षा मिळायला हवी. त्यामुळे बूट योग्य पद्धतीचे हवेत. बाईकचं गियर बदलताना पायांचा वापर केला जातो. फ्लिपफ्लॉपमुळे पाय घसरू शकतो. पायांना स्थैर्य देणारे शूज घाला.
* मोटरसायकल चालवणं एक कला आहे. इतर प्रत्येक कलेप्रमाणे ती नीट यायला हवी. यासाठी बाईक चालवायला नीट शिकून घ्यायला हवं.
* बाईक चालवताना गाणी ऐकणं, फोनवर बोलणं, इकडे तिकडे बघणं असं काहीही नको. आसपास काय चाललंय, याकडे नीट लक्ष द्या. आजूबाजूच्या वाहतुकीचा अंदाज घ्या. वाहतुकीच्या वेगानुसारच बाईक हाका. तुमचं संपूर्ण लक्ष बाईकवर केंद्रीत करा.

# फूड केमिस्ट होण्यासाठी...


**फ्युचर ऑप्शन्स**

आपण खात असलेलं अन्न दर्जेदार आणि सकस असायला हवं. या अन्नामुळे शरीराचं कोणतंही नुकसान होऊनये, असा आपला प्रयत्न असतो. अन्न दर्जेदार आहे किंवा नाही हे फूड केमिस्ट ठरवतात. खाण्या-पिण्याची आवड असेल तर तुम्हीही हे क्षेत्र निवडू शकता. रसायनशास्त्र, विज्ञान आणि अन्न अशा तिन्हींमध्ये रस असेल तर तुम्ही फूड केमिस्ट म्हणून स्वत:चं करीअर घडवू शकता. लोकांना सकस आणि उत्कृष्ट अन्न मिळावं, अशी तुमची इच्छा असेल तर हे क्षेत्र तुमच्यासाठी अगदी योग्य आहे. अन्न आणि अन्नातले घटक आरोग्यादायी असावेत, यावर फूड केमिस्टचा भर असतो. हुशारी आणि भावनिक स्थैर्य या दोन्ही गोष्टी या क्षेत्रातल्या



करीअरसाठी गरजेच्या आहेत. फूड केमिस्टला बरंच संशोधन करावं लागतं. त्यांना प्रयोगशाळांमध्ये काम करावं लागतं. या क्षेत्रात येण्यासाठी संवादकौशल्य गरजेचं आहे. आपलं संशोधन, निष्कर्ष इतरांपर्यंत पोहोचवण्याची कला तुमच्याकडे असायला हवी. कारकिर्दीत किती उंची गाठायची आहे यावरून या क्षेत्रातलं शिक्षण ठरतं. शिक्षण जेवढं जास्त तेवढ्या संधीही जास्त मिळतात. या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी रसायनशास्त्र, फूड केमिस्ट्री आणि बायोलॉजी या विषयांचा पाया भक्कम असायला हवा. रसायनशास्त्र, फुड केमिस्ट्री, फार्मास्युटिकल केमिस्ट्री किंवा फूड सायन्स या विषयांमध्ये पदवी मिळवून पुढे जाता येईल. या क्षेत्रासाठी उमेदवाराकडे सामाजिक दृष्टीकोन असणं महत्त्वाचं आहे.

# एक्सिपरिमेंट्स विथ परफ्युम्स



**ग्रूमिंग**

मित्रांनो, तुमच्या वॉर्डरोबमध्ये एखादा परफ्युम असेलच. परफ्युममुळे मस्त वातावरण तयार होतं. यार-दोस्तांची मैफल जमली असेल तर परफ्युम मस्टच. डेटवर जाताना तर परफ्युम शिंपडायलाच हवा. पेहरावाप्रमाणे परफ्युमही मिक्स अँड मॅच करता येतो. परफ्युम वापरतानाही निरनिराळे प्रयोग करता येतात. हे नेमकं कसं साधायचं हे जाणून घेऊया.

* कपड्यांवर सौम्य परफ्युम शिंपडता येईल. तर शरीरावर थोडं उग्र वासाचं परफ्युम चालून जाईल. एकाच वेळी ही दोन्ही परफ्युम्स कॅरी करता येतील. कपड्यांवरचा परफ्युम उडून गेला तरी शरीरावरचा सुगंध दरवळत राहील.
* एकाच वेळी वेगवेगळ्या कंपन्यांची परफ्युम्स शिंपडल्याने सगळ्याचा पार विचका होऊ शकतो. डोकं दुखायला लागतं. त्यामुळे एकाच प्रकारचा सुगंध असलेल्या दोन परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करा.
* परफ्युम्सचं कॉम्बिनेशन करताना तुम्ही कल्पकता वापरू शकता पण, वुडी, फ्लोरल, फ्रेश आणि सिट्रस अशा सुगंधांमध्ये प्रयोग करा.
* परफ्युम्सचं लेअरिंग करताना थोडी काळजी घ्यायला हवी. एखादा परफ्युम कपड्यावर शिंपडल्यावर वेगळा वास येऊ शकतो तर शरीरावरचा वास वेगळा असू शकतो. त्यामुळे कोणता वास जास्त चांगला वाटेल, हे आधी ठरवा.
* परफ्युमचा वास जास्त काळ टिकवून ठेवायचा असेल तर ते शिंपडण्याआधी चांगलं बॉडी लोशन किंवा सुगंधी तेलाने शरीराला मसाज करा.

# घुमना भी, फिटनेस भी



**भटकंती**

दोस्तांनो, भटकंतीला गेल्यावर फिटनेसकडे थोडं दुर्लक्षच होतं. रूटीनमधून ब्रेक घेतल्याने मग सगळं कसं अगदी निवांत असतं. त्यामुळे व्यायामाला आपोआप सुटी मिळते. खादाडीही जरा जास्तच होते. मग काय वजन वाढतं. पण, भटकंतीदरम्यानही तुम्ही फिटनेस जपू शकता.

* नव्या वातावरणाचा आनंद लुटताना शारीरिक हालचालही करा. दररोज काही तरी ठरवा. सायकल भाड्याने घ्या. सायकल चालवत निसर्गाचा आनंद लुटा. जिने चढा. शक्य तितकं चाला, हायकिंग करा. जवळच्या बागेत फेरफटका मारा.
* नव्या ठिकाणी चालत फिरण्यासारखी मजा नाही. या निमित्ताने स्थानिक संस्कृती जवळून पाहता येते. शहरात चालत भटकंती करा.
* साईटसीईंगला निघण्याआधी थोडा व्यायाम करा. यानंतर हेल्दी ब्रेकफास्ट घ्या. यामुळे तुम्ही दिवसभर ताजेतवाने राहू शकाल. व्यायामामुळे तुमच्या कॅलरी खर्च होतील. दिवसभर उत्साह वाटेल.
* तिकिटांच्या खरेदीसाठी किंवा पर्यटनस्थळी रांग लावावी लागत असेल तर फक्त उभे राहू नका. थोडं जॉगिंग करा. पोट आत घेऊन दीर्घ श्वसन करा. हातापायांचे व्यायामही करता येतील. लोकांनी थोडं विचित्र नजरेने पाहिलं तरी काळजी करू नका. यामुळे तुम्हाला खूप उत्साही वाटेल.

# कडकी लागलीये?



**मनी मॅनेजमेंट**

दोस्तांनो, खिशात कितीही पैसा खुळखुळत असला तरी कडकीची वेळ कधीतरी येतेच. पैशांची तंगी जाणवत असताना काही सुचतच नाही. कधी पगार उशीरा होतो तर कधी कर्जाचे, क्रेडिट कार्डाचे हप्ते फेडण्याच्या नादात हातात काहीच उरत नाही. अशा वेळी कोणाकडून पैसे उधार तरी घ्यावे लागतात किंवा आहे त्यातूनच भागवावं लागतं. या परिस्थितीत पैसा कसा वापरायचा? जाणून घेऊ. पैसा नसेल तर सवलतींचा शोध घ्यायला सुरूवात करा. बाय वन गेट वन फ्री, ५० टक्के डिस्काउंट अशा योजना असतात. सुपरमार्केट, हायपरमार्केटमध्ये अशा सवलती वर्षभर सुरू असतात. कपडे सेलमधून घ्या. ऑनलाईन शॉपिंगवर बऱ्यात सवलती असतात. सणावारी अशा साईट्स योजना जाहीर करतात. तेव्हा खरेदी करा आणि पैसे वाचवा. वर्तमानपत्रासोबत येणारी डिस्काउंट कुपन्स जपून ठेवा.

* रेडी टू ईट फूडच्या किंमती बऱ्याच असल्याने पैसा खर्च होतो. यातून पोषणमूल्यंही मिळत नाहीत. त्यामुळे थोडा फार स्वयंपाक शिका. आमटी भात, मुगाच्या डाळीची खिचडी असे पदार्थ बनवता येतील. यामुळे बाहेरील पदार्थासाठी खर्च होणारे बरेच पैसे वाचतील.
* किराणाच्या किंमती सतत कमी-जास्त होतात. दर कमी झाले की वर्षभराचं सामान भरून ठेवा.
* क्रेडिट कार्डामुळे खर्च भरपूर वाढतो. त्याऐवजी डेबिट कार्ड वापरा. यामुळे जितके पैसे आहेत तेवढाच खर्च होईल.

**स्मार्ट गॅझेट**

## वायफाय कनेक्ट होत नाही?

आता टीव्हीही स्मार्ट झाला आहे. टीव्ही वायफायशी कनेक्ट करून विविध ॲप्स डाउनलोड करता येतात. मात्र कधीकधी स्मार्ट टीव्हीला कनेक्ट केलेलं वायफाय डिसकनेक्ट होतात आणि ते पुन्हा कनेक्ट करताना बऱ्याच अडचणी येतात. अनेकदा हार्डवेअरशी संबंधित समस्येमुळे काही समस्या उद्भवू शकतात. वायफाय अन्य डिव्हाइसशी कनेक्ट करून बघा. अन्य डिव्हाइसशी राउटर कनेक्ट झाल्यास तुम्ही राउटर टीव्हीशी पुन्हा जोडून घ्या. स्मार्ट टीव्हीमध्ये इंटरनेट कनेक्शन तपासण्यासोबतच त्यातील समस्यांचं निराकरण करण्याचा म्हणजेच ट्रबलशूटचा पर्यायही मिळतो. यासाठी टीव्हीच्या सेटिंग्जमध्ये जाऊन नेटवर्क सेटिंग्जचा पर्याय निवडा. इथे नेटवर्क स्टेटस दिसेल. तुम्ही टीव्ही रिबूट करण्याचा पर्याय निवडू शकता. कोणताही उपाय कामी न आल्यास फॅक्टरी रिसेट हा अंतिम पर्याय निवडून बघा.



**स्मार्ट टिप्स**

## फोन चार्ज करताय?

स्मार्टफोनची बॅटरी लो होऊ लागल्यानंतर आपल्या हृदयाची धडधड वाढू लागते. मग मिळेल त्या ठिकाणी स्मार्टफोन चार्जिंगला लावला जातो पण सार्वजनिक ठिकाणी स्मार्टफोन चार्ज करणं धोक्याचं ठरू शकतं. तुमच्या फोनमधला सगळा डाटा हॅक होऊ शकतो. ऑथेंटिक ८ नावाच्या सिक्युरिटी फर्मने हा दावा केला आहे. सार्वजनिक ठिकाणचं चार्जिंग सॉकेट हॅक केलेलं असू शकतं. अशा सॉकेटमुळे तुमच्या स्मार्टफोनचा सगळा डाटा लीक होऊ शकतो. तुमचे मेल्स, मेसेजेस, अकाउंट नंबर सगळं हॅकर्सपर्यंत पोहचू शकतं. त्यामुळे सार्वजनिक ठिकाणी फोन चार्जिंगला लावण्यासाठी दहा वेळा विचार करा.



**सोशल मिडिया**

## धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

ऑनलाईन शॉपिंग ही आता सर्वसामान्य बाब बनली आहे. विविध साईट्वरून ऑनलाईन खरेदी केली जाते. मात्र अशा पद्धतीने खरेदी करताना फसवणूक होण्याची शक्यता असते. म्हणूनच प्रत्येक पाऊल जपून टाकायला हवं. सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

**ॲप वर्ल्ड**

## व्हॉट्स ॲप मेमरी खातंय?

व्हॉट्स ॲपमुळे तुम्हाला स्टोरेजची समस्या भेडसावतेय का? व्हॉट्स ॲपवर येणारे व्हिडिओ तसंच फोटोज गॅलरीत सेव्ह होत असल्यामुळे फोन मेमरी फुल होते. यामुळे फोन स्लो होतो. हे ओव्हरलोडिंग तुम्ही टाळू शकता. यासाठी व्हॉट्स ॲपच्या फाईल्स मोबाईलमधली किती जागा व्यापत आहेत हे आधी जाणून घ्या. यासाठी व्हॉट्स ॲपच्या सेटिंग्जमध्ये जा. स्टोरेज अँड डाटा ऑप्शनवर क्लिक करा. इथे मॅनेज स्टोरेज पर्यायावर क्लिक करून फोन मेमरीची माहिती मिळवता येईल. व्हॉट्स ॲप मीडिया डिलिट करण्यासाठी मॅनेज स्टोरेजवर लार्जर दॅन ५ एमबीवर क्लिक करा. इथून नको असणाऱ्या मीडिया फाईल्स सिलेक्ट करून डिलिट करता येतील. यासोबतच ऑल फाईल डिलिटचा पर्यायही आहे.





**शार्दूल ठाकूरची वादळी खेळी**

**मुंबईच्या संघाने रणजी करंडक स्पर्धेत शेवटच्या साखळी सामन्यात मेघालय संघाविरुद्ध मजबूत पकड घेतली आहे. शार्दूल ठाकूरने ( Shardul Thakur) पहिल्या डावात हॅटट्रिकसह मेघालयला धक्के देताना त्यांचा पहिला डाव ८६ धावावंर गुंडाळला. त्यानंतर सिद्धेश लाड, आकाश आनंद यांच्या शतकाच्या जोरावर पाचशेहून अधिक धावांची आघाडी घेतली आहे. गोलंदाजीत कमाल करणारा शार्दूल फलंदाजीत पुन्हा एकदा चमकला, परंतु त्याचे शतक थोडक्यात हुकले. शार्दूलच्या ४, मोहित अवस्थीच्या ३, सिलव्हेस्टर डिसुजाच्या २ आणि शाम्स मुलानीच्या १ विकेटच्या जोरावर मुंबईने मेघालयचा पहिला डाव ८६ धावांवर गुंडाळला. प्रत्युत्तरात मुंबईचा सलामीवीर आयुष म्हात्रे ( ५) व भटकळ ( २८) हे स्वस्तात बाद झाले. त्यानंतर सिद्धेश लाड व अजिंक्य रहाणे या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी ३२७ चेंडूंत १९६ धावांची भागीदारी केली.**

# पुरुष आणि महिला हॉकी संघांची घोषणा

## ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : देविंदर, प्रियांकाकडे कर्णधारपद

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** उत्तराखंडमध्ये होणाऱ्या 38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी हॉकी महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघांचे कर्णधारपद अनुक्रमे आंतरराष्ट्रीय देविंदर वाल्मिकी आणि प्रियांका वानखेडे हिच्याकडे सोपविण्यात आले आहे. दोन्ही संघांच्या उपकर्णधारपदी अनुक्रमे अनिकेत गुरव आणि भावना खाडे यांची निवड करण्यात आली आहे.

हॉकी महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि आयपीएस (एडीजी फोर्स वन, महाराष्ट्र पोलीस) कृष्ण प्रकाश यांनी मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम, नेहरूनगर येथे वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज भोरे यांच्या उपस्थितीत 18 सदस्यीय संघांची घोषणा केली आणि दोन्ही संघांना शुभेच्छा दिल्या.

हॉकी स्पर्धा 4 ते 14 फेब्रुवारी 2025 या कालावधीत होतील. महाराष्ट्र पुरुष संघाचा ब गटात समावेश असून सलामीची लढत 5 फेब्रुवारीला तामिळनाडू विरुद्ध सुरुवात होईल, त्यानंतर उत्तर प्रदेश (6 फेब्रुवारी), उत्तराखंड (8 फेब्रुवारी) आणि हरियाणाविरुद्ध (10 फेब्रुवारी) सामने होतील.

महिलांचा ब गटात समावेश असून सलामीचा सामना यजमान उत्तराखंडविरुद्ध (5 फेब्रुवारी) होईल. त्यानंतर महाराष्ट्र संघ झारखंड (7 फेब्रुवारी), मिझोराम (9 फेब्रुवारी) आणि मणिपूर (10 फेब्रुवारी) संघाशी दोन हात करेल.

**महाराष्ट्राचे संघ -**

पुरुष संघ: शिवरतन रसाळ (गोलकीपर), योगेश बोरकर, निखिल परदेशी, गणेश पाटील, व्यंकटेश देवकर, राहुल शिंदे, सचिन कोळेकर, रईस मुजावर, रोहन पाटील, व्यंकटेश केंचे, तालेब शहा, अनिकेत गुरव (उपकर्णधार), हरीश शिंदगी, दर्शन गावकर, धैर्यशील जाधव, देविंदर वाल्मिकी (कर्णधार), आदित्य लाळगे, किरण मोहिते (गोलकीपर).

**प्रशिक्षक:** विक्रम पिल्ले, सहाय्यक प्रशिक्षक: सागर कारंडे. व्यवस्थापक: मुथन्ना बी. के.

**महिला संघ:** दीक्षिता वझेल (गोलकीपर), सशिप्रभा चतुर्वेदी, निक्कू गुर्जर, भाग्यश्री शिंदे, भावना खाडे (उपकर्णधार), दुर्गा शिंदे, शालिनी साकुरे, मोनिका तिर्की, अश्विनी कोळेकर, काजल आटपाडकर, योगिता बोरा, ऐशकान, प्रियंका सिंग, प्रियंका वानखेडे (कर्णधार), मनश्री शेडगे, हिमांशी गावंड, सानिका माने, सायली वझाडे (गोलकीपर).

**प्रशिक्षक:** सागरसिंग ठाकूर, सहाय्यक प्रशिक्षक: रीता जैनवाल. व्यवस्थापक: वैशाली सुल सोनवार, फिजिओ: अमिषा सरवदे.

## नील देसाई, आराध्या मेंडकेपाटील यांना विजेतेपद



**पुणे :** पुणे मेट्रोपॉलिटन जिल्हा टेनिस संघटना(पीएमडीटीए) यांच्या तर्फे पीएमडीटीए मानांकन वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनल पुणे ब्रॉन्झ सिरिज टेनिस २०२५ स्पर्धेत नील देसाई, आराध्या मेंडकेपाटील यांनी आपापल्या गटातील प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून विजेतेपद संपादन केले. वेलिंग्टन कॉलेज इंटरनॅशनल येथील टेनिस कोर्टवर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत मुलांच्या गटात दुसऱ्या मानांकित नील देसाई याने जैनम कुवडचा ४-२, ४-२ असा सहज पराभव करून विजेतेपदाचा मान पटकावला. याआधीच्या उपांत्य फेरीच्या लढतीत जैनम कुवडने अकराव्या मानांकित विराज खानविलकरचा ७-४ असा तर, दुसऱ्या मानांकित नील देसाईने तिसऱ्या मानांकित पार्थ दाभीकरचा ७-१ असा पराभव करून अंतिम फेरीगाठली. मुलींच्या गटात अंतिम लढतीत आराध्या मेंडकेपाटील हिने कनिष्का नारूकाचा ४-२, १-४, ५-३ असा तीन सेटमध्ये पराभव करून विजेतेपद पटकावले. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना करंडक व प्रशस्तिपतर्क अशी पारितोषिके देण्यात आली.

## सांघिक विभागात एम्फसिस संघाला विजेतेपद



**पुणे :** शारदा इरेक्टर्स प्रायव्हेट लिमिटेडने पुरस्कृत केलेल्या आणि पुणे जिल्हा आंतर कचेरी क्रीडा संघटनेने आयोजित केलेल्या पुणे जिल्हा आंतर कचेरी टेबल टेनिस स्पर्धेतील सांघिक विभागात एम्फसिस संघाने विजेतेपद मिळविले तर वैयक्तिक गटात ओंकार जोग हे दुहेरी मुकुटाचे मानकरी ठरले. महिलांच्या विभागात उज्वला गायकवाड यांनी अजिंक्यपद पटकाविले. ही स्पर्धा शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे आयोजित करण्यात आली.एम्फसिस संघाने अंतिम फेरीत एच ई एम आर एल डीआरडीओ संघाचा ३-० असा पराभव केला. महिलांच्या एकेरीत गायकवाड (जीएस लॅब) यांनी अग्रमानांकीत रेणुका कोल्हे (इन्फोसिस) यांना १३-११,३-११,११-२,११-६ असे पराभूत केले. प्रौढांच्या गटात अव्वल मानांकित ओंकार जोग (केएसबी) यांनी स्वानंद बेडेकर (एशियन पेंट्स) यांच्यावर १०-१२,११-७, ११-७,१२-१० अशी मात केली. त्यांनी पुरुषांच्या एकेरीत शुभंकर रानडे (आरडीसी) यांचा ८-११,१२-१० ,११-६,११-६ असा पराभव केला. पारितोषिक वितरण समारंभ ज्येष्ठ क्रीडा संघटक अरविंद नातू ,आशिष बोडस, मधुकर लोणारे, सुरेंद्र देशपांडे, स्मिता बोडस, मनीषा बोडस यांच्या हस्ते झाला.

## रिंकू सिंग झाला फिट!

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**नवी दिल्ली :** भारत विरुद्ध इंग्लंड संघात टी२० मालिकेतील चौथा सामना पुण्यातील महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन स्टेडियम, गहुंजे येथे शुक्रवारी (३१ जानेवारी) खेळवण्यात येणार आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी महत्त्वाचा आहे.

दरम्यान, चौथ्या सामन्यापूर्वी भारताला एक आनंदाची बातमी मिळाली आहे. भारताचा मधल्या फळीतील फलंदाज रिंकू सिंग फिट झाला आहे. पहिल्या सामन्यानंतर पाठीतील वेदनेमुळे तो दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यासाठी उपलब्ध नव्हता, असं बीसीसीआयकडून सांगण्यात आलं होतं. आता तो चौथ्या सामन्यासाठी उपलब्ध असल्याचे भारताचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोईशेट यांनी स्पष्ट केले आहे. तसेच तो चौथ्या सामन्यात खेळू शकतो असे संकेतही दिले आहे.

डोईशेट यांनी सांगितले आहे की त्याची प्रगती चांगली होत आहे आणि बीसीसीआयची मेडिकल टीम त्याच्यावर लक्ष ठेवून आहे. तो दुसऱ्या आणि तिसऱ्या सामन्यासाठी उपलब्ध नव्हता. तो आता फिट असून चौथा सामना खेळण्यासाठी सज्ज आहे.

## सिद्धांत साळुंखे, निधी खिंवसरा यांना विजेतेपद

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या आयोजित पीडीसीसी 13वर्षाखालील मुले व मुली निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत सिद्धांत साळुंखे, निधी खिंवसरा यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

मिलेनियम नॅशनल स्कूल, कर्वेरोड येथील हॉल मध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत 13 वर्षाखालील मुलांच्या गटात नवव्या फेरीत पहिल्या पटावरील लढतीत सिद्धांत साळुंखेने अमेय चौधरीला बरोबरीत रोखले व 8 गुणांसह विजेतेपद पटकावले. तर, आदित्य जोशीने मार्मिक शहाचा पराभव करून 7गुण(42बुकोल्स) सरासरीच्या जोरावर दुसरे स्थान मिळवले. श्लोक माळी याने ओम रामगुडेला बरोबरीत रोखले व 7गुण(41बुकोल्स) सरासरीच्या जोरावर तिसरे स्थान पटकावले. मुलींच्या गटात सातव्या फेरीत निधी खिंवसरा हीने स्पृहा कमलापुरेला नमवून 6.5गुण व 30.75 बुकोल्स सरासरीच्या जोरावर पहिला क्रमांक पटकावला. चतुर्थी परदेशीने मेहर शहाला पराभुत करून 6.5गुण व 24.75 बुकोल्स सरासरीच्या जोरावर दुसरा क्रमांक मिळवला. ओवी पावडे हीने शालवी चासकरचा पराभव करून 5गुण व 19.5 बुकोल्स सरासरीच्या जोरावर तिसरे स्थान पटकावले. स्पर्धेतील विजेत्यांना करंडक व रोख रकमेची पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय मास्टर अभिषेक केळकर, पीडीसीसीचे खजिनदार चंद्रकांत मोकाशी यांच्या हस्ते करण्यात आले.

# 'सिंहगड इन्स्टिट्युटस' मध्ये ७६ वा प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

■ **राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क**

**पुणे :** 'सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटीच्या वडगाव, आंबेगाव, वारजे, कोंढवा, एरडंवणे, नऱ्हे आणि लोणावळा या शाखांमध्ये ७६ वा गणतंत्र दिवस मोठ्या थाटामाटात पार पडला.

सिंहगड इन्स्टिट्युटच्या वारजे शाखेतील ध्वजारोहण संस्थापक अध्यक्ष प्रो. एम. एन. नवले यांच्या हस्ते झाले आणि वडगाव शाखेचे ध्वजारोहण संस्थेच्या संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले यांच्या हस्ते झाले. त्यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अनेक मान्यवर उपस्थित होते, राष्ट्रगीताने ध्वजाला मानवंदना देऊन 'बाईक रॅली'ने कार्यक्रमाला सुरूवात झाली. विद्यार्थ्यांनी केलेले ध्वजसंचलन नेत्रदिपक ठरले.

वडगाव, आंबेगाव, वारजे, कोंढवा, एरडंवणे, नऱ्हे आणि लोणावळा शाखांच्या विविध क्षेत्रात यशस्वीरीत्या मानांकन मिळविलेल्या विद्यार्थ्यांना सिंहगड इन्स्टिट्युटचे संस्थापक अध्यक्ष प्रो. एम. एन नवले, संस्थापक सचिव डॉ. सुनंदा नवले यांच्या हस्ते बक्षिस वितरण करुन सन्मानित करण्यात आले. त्यानिमित्त विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने 'विविधतेत एकता' या विषयातंर्गत विविध राज्यातील सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक परंपरेची झलक दाखविली.

नर्सरीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला ' मिले सूर मेरा तुम्हारा' या नृत्यातून बालचमुंनी एकतेचा संदेश दिला आणि शेतकरी, आर्मी, पोलीस व सैनिक हे देशाचे महत्वाचे खांब आहेत हे नृत्यनाटिकेतून अधोरेखित केले. कोळी, पंजाबी, गोवन, राजस्थानी आणि लावणी नृत्याद्वारे भारताची अखंड परपंरा विद्यार्थ्यांनी सादर केली.

'योग' हा जीवनाचा अविभाज्य अंग बनतो आहे, देशापरदेशात त्याचे महत्व वाढते आहे. त्याचे नेत्रदिपक प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी सादर केले. तर महाराष्ट्राची परपंरा जपणारे संगीत नृत्य व वाद्य या सगळ्यांचा मेळ जमविणारे लेझीम विद्यार्थ्यांनी सादर करुन कार्यक्रमाची सांगता केली.











